




# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, गुरुवार २३ एप्रिल २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०







# गवई 'चमत्कारी' दरबारात

## माजी सरन्यायाधीशांची बागेश्वर धामला सहकुटुंब भेट



**भोपाळ/वृत्तसंस्था :** भारताचे माजी सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनी मध्यप्रदेशातील प्रसिद्ध आणि तितक्याच वादग्रस्त बागेश्वर धामला सहकुटुंब भेट दिली आहे. त्यांच्या या भेटीमुळे महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीत आणि राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. गवई यांनी पत्नी तेजस्विनी आणि मुलगा ज्योतिरादित्य यांच्यासह बागेश्वर बालाजीचे दर्शन घेउन धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांचा आशीर्वाद घेतला.

गवई कुटुंबाने बागेश्वर धामवर विधिवत पूजन करून देशाच्या प्रगतीसाठी प्रार्थना केली. यावेळी त्यांनी धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्याशी धार्मिक आणि सामाजिक विषयांवर सविस्तर चर्चा केली. गवई यांनी धामातील कॅन्सर रुग्णालय, गुरुकुल आणि संस्कृत शिक्षणाच्या उपक्रमांची पाहणी करून त्यांचे कौतुक केले. सनातन संस्कृती बळकट करण्यासाठी असे उपक्रम महत्त्वाचे आहेत असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.माजी सरन्यायाधीशांच्या या भूमिकेवर काँग्रेस नेते आणि पुरोगामी कार्यकर्ते युवराज मोहिते यांनी अत्यंत कडक शब्दांत टीका केली आहे. ते म्हणाले की गवई ज्या सनातन संस्कृतीचे गोडवे गात आहेत, ती संस्कृती असती तर ते आज सरन्यायाधीश झाले नसते. त्यांना हे पद केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि संविधानामुळे मिळाले आहे. मोहिते यांनी पुढे संताप व्यक्त करताना म्हटले की, ज्या बाबासाहेबांच्या नावावर गवईंनी पदे उपभोगली, त्याच विचारांना तिलांजली देउन ते एका भोंदू बाबाच्या चरणी जात आहेत. बागेश्वर शास्त्रींच्या चमत्कारांचा अनेकदा पर्दाफाश झाला असतानाही एका सर्वोच्च घटनात्मक पदावर राहिलेल्या व्यक्तीने तिथे जाणे, हा संविधानाचा आणि आंबेडकरी चळवळीचा अपमान आहे.

**विरोधाभास आणि चर्चा-** एकीकडे महाराष्ट्रात अंधश्रद्धा निर्मूलनाचा लढा तीव्र असताना, दुसरीकडे माजी सरन्यायाधीशांनी अशा प्रकारे धार्मिक व्यासपीठावरून सनातन धर्माचे समर्थन केल्याने नवा वाद निर्माण झाला आहे. याप्रकरणी माजी न्यायमूर्ती गवई यांची काय अधिकृत भूमिका असेल, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

**बाबाच्या ➪(पान २ वर)**

# मराठा आरक्षण उपसमिती बरखास्त करा

## मुख्यमंत्र्यांकडे कुणबी मंत्रालय स्थापन करण्याची मागणी करणार-जरांगे पाटील

**मुंबई/प्रतिनिधी :**मराठा आणि कुणबी मंत्रालय स्थापन करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार असल्याची माहिती मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी दिली. मराठा समाजाच्या पूर्णवेळ कामासाठी स्वतंत्र मंत्रालय गरजेचं आहे. मराठा समाजाच्या सुखदुःखाकडे लक्ष देणे उपसमितीचे काम आहे. मात्र, उप समितीचे नेमकं काम काय कळत नाही? सातारा समितीचा अहवाल घ्यायचा कधी? असा सवाल जरांगेंनी केला. मराठवाड्यात मराठा समाजाची एक बैठक लावायला विखे पाटलांकडे वेळ नाही, उपद्रवी विदूषक लोकांसाठी त्यांच्याकडे वेळ आहे, असा खोचक टोला देखील त्यांनी विखेंना लगावला. मराठा आरक्षण उपसमिती बरखास्त करा असे म्हणत अध्यक्षपदावरुन विखे पाटलांनी नाव घालवल्याचे जरांगे म्हणाले.



मराठा आरक्षण उप समितीच्या कामावरून मनोज जरांगे पाटील नाराज आहेत. सातारा गॅझेटला आठ महिने उलटून गेले आणखी किती दिवस वाट पाहायची? असा सवाल मनोज जरांगे पाटील यांनी केला. मराठा आरक्षण उपसमिती बरखास्त करा अशी थेट मागणी मनोज जरांगे पाटील यांनी केली आहे. मराठा आरक्षण उपसमितीच्या अध्यक्ष पदावरुन विखे पाटील नाव करतील असं वाटत होतं मात्र त्यांनी नाव घालवलं, असा थेट हल्लाबोल जरांगे पाटील यांनी चढवला. मराठा समाजाच्या हक्क आणि प्रश्नासाठी स्वतंत्र मराठा आणि कुणबी मंत्रालय स्थापन करा अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे करणारा अस जरांगे पाटील म्हणाले. उपसमितीने मराठा समाजाच्या सुखदुःखाकडे लक्ष द्यायचं असतं मात्र त्या साठी त्यांच्याकडे वेळ नाही विदूषकी लोकांसाठी त्यांच्याकडे वेळ आहे. सातारा गॅजेट साठी आठ महिने उलटून गेले आणखी किती दिवस वाट पाहायची असा सवाल करत जरांगे पाटील यांनी विखे पाटलांवर निशाणा साधला. मराठा समाजाच्या प्रश्नांकडे उपसमिती दुर्लक्ष करत असल्याचाही त्यांनी आरोप केला. धाराशिव येथे भीम जयंती कार्यक्रमासाठी आले असता त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी मराठा आरक्षणावर भाष्य केले. तसेच मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर जोरदार टीका केली. शेतकऱ्यांच्या पोरांची लग्न व्हायची असतील तर शेतीतून उत्पन्न निघण्याची गरज आहे. त्यासाठी पाणी गरजेचं आहे. सरकारच्या हलगर्जीपणामुळे शेतकरी मरत आहेत. पोरांनीही कष्ट करण्याची गरज आहे, उद्योगधंद्याकडे वळायला हवं असे जरांगे म्हणाले. घरात खायला नाही तर कोण पोरगी देणार तुम्ही कष्ट करा, उद्योग धंद्याकडे वळा. आळशी पणा सोडला पाहिजे कष्ट करायला हवं शेतीतून खूप पैसा आहे असे जरांगे म्हणाले. काम करायचं नसेल तर लग्नाचं काय सांगू असे म्हणत जरांगे पाटलांनी लग्नाळू तरुणांना सल्ला दिला.

# ७ दहशतवाद्यांना शिक्षा

**बंगळूरू/वृत्तसंस्था :** २०२३ च्या बंगळूरू तुरुंग कट्टरतावाद प्रकरणात एका महत्त्वपूर्ण निकालात, एनआयए विशेष न्यायालयाने सूत्रधार टी. नसीरसह सात




आरोपींना दोषी ठरवले आहे. सर्व दोषींना सात वर्षांच्या सक्त कारावासाची आणि ४८,००० रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. या प्रकरणात टी. नसीर व्यतिरिक्त सय्यद सुहेल खान, मोहम्मद उमर, झाहिद तबरेज, सय्यद मुदस्सिर पाशा, मोहम्मद फैसल रब्बानी आणि सलमान खान यांना शिक्षा सुनावण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हे प्रकरण लष्कर-ए-तोयबाशी संबंधित एका दहशतवादी कटाशी निगडित आहे, हे बंगळूरच्या परप्पना अग्रहारा मध्यवर्ती कारागृहात रचण्यात आला होता. या कटात, भारतातील दहशतवादी कारवायांमध्ये वापरण्यासाठी कारागृहात कैद असलेल्या तरुणांना ओळखणे, त्यांची भरती करणे, त्यांना प्रशिक्षण देणे आणि कट्टरपंथी बनवणे यांचा समावेश होता.

**बंगळूरु मध्ये दहशतवादी हल्ल्याची तयारी-** आरोपी बंगळूरु मध्ये दहशतवादी हल्ला करण्याची आणि बंदी घातलेल्या संघटनेचा भारतविरोधी अजेंडा पुढे नेण्याच्या नियोजनात होते. काही गुन्हेगारांकडून शस्त्रे, दारुगोळा आणि डिजिटल उपकरणे जप्त केल्यानंतर, बंगळूरु सेंट्रल क्राइम ब्रँचने जुलै २०२३ मध्ये हा गुन्हा दाखल केला होता. नंतर हा तपास एनआयएकडे हस्तांतरित करण्यात आला.

# मालेगाव बॉम्बस्फोट खटल्यातील 4 आरोपींची निर्दोष मुक्तता!

**मुंबई/प्रतिनिधी :** २००६ मधील बहुचर्चित आणि संवेदनशील असलेल्या मालेगाव साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातील चार आरोपींना मुंबई उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला आहे. पुराव्यांच्या अभावामुळे या चौघांविरुद्धचे दोषारोप न्यायालयाने रद्द केले असून, त्यांना या प्रकरणातून मुक्तकरण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे संबंधित आरोपींवरील खटल्याची प्रक्रिया आता संपुष्टात आली आहे.८ सप्टेंबर २००६ रोजी मालेगावमध्ये शब-ए-बारातच्या दिवशी मशिदीजवळ भीषण साखळी बॉम्बस्फोट झाले होते. या दुर्दैवी घटनेत ३७ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला होता, तर शेकडो लोक गंभीर जखमी झाले होते. सुरुवातीला या प्रकरणाचा तपास एटीएसकडून करण्यात आला होता आणि त्यात ९ जणांना अटक करण्यात आली होती. त्यानंतर सीबीआयनेही या तपासाला दुजोरा दिला होता. मात्र, नंतरच्या काळात एनआयएकडे हे प्रकरण



सोपवण्यात आले होते.

**यांची झाली मुक्तता-** उच्च न्यायालयाने ज्या चार आरोपींवरील दोषारोप रद्द केले आहेत, त्यात लोकेश शर्मा, धन सिंह, राजेंद्र चौधरी आणि मनोहर नरवारिया यांचा समावेश आहे. याआधीही याच प्रकरणातील ११ जणांना पुराव्याअभावी न्यायालयाने दोषमुक्त केले होते. आता या चौघांविरुद्धचे आरोपपत्रही न्यायालयाने रद्द केल्याने त्यांच्या सुटकेचा मार्ग मोकळा झाला आहे.

**निर्णयावर प्रश्न उपस्थित-** न्यायालयाच्या या निर्णयामुळे आता तपास यंत्रणांसमोर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणातील अन्य आरोपी नूरुल हुदा याने या निर्णयावर प्रश्न उपस्थित केले असून, आता एनआयए या निर्णयाविरुद्ध पुन्हा दाद मागणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अद्याप तपास यंत्रणेकडून यावर कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेली नाही. २००६ च्या या बॉम्बस्फोटातील पीडितांसाठी आणि न्यायव्यवस्थेसाठी हा एक अत्यंत महत्त्वाचा आणि मोठा कायदेशीर टप्पा मानला जात आहे.

# खरगेना निवडणूक आयोगाची मोठी कारवाई, 24 तासांत मागवले उत्तर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासंदर्भात आक्षेपार्ह विधान केल्यानंतर काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लीकार्जून खर्गे यांची अडचण वाढली आहे. या प्रकरणाची दखल घेत निवडणूक आयोगाने बुधवारी (२२ एप्रिल २०२६)



त्यांना नोटीस बजावली असून, २४ तासांच्या आत स्पष्टीकरण मागवले आहे. खर्गे यांच्या या विधानानंतर, भाजपही आक्रमक झाला आहे.

**भाजपच्या तक्रारीनंतर आयोगाची कारवाई** - भाजपच्या तक्रारीनंतर निवडणूक आयोगाने ही कारवाई केली आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण, संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू आणि कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांच्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाने निवडणूक आयोगाची भेट घेउन याप्रकरणी तक्रार दाखल केली होती. काँग्रेस अध्यक्षांच्या वादग्रस्त विधानावर कडक कारवाई करण्याची मागणी या शिष्टमंडळाने केली होती. यानंतर आयोगाने हे पाउल उचलले. मल्लिकार्जुन खर्गे यांनी मंगळवारी चेन्नई येथे एका पत्रकार परिषदेत बोलताना एआयएडीएमकेवर टीका करतानाच आपला मोर्चा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे वळवला आणि पंतप्रधान मोदींचा उल्लेख 'दहशतवादी' असा केला होता. त्यांच्या या विधानानंर, मोठा वाद निर्माण झाला. भाजपने या विधानाचा तीव्र निषेध केला असून, हा केवळ पंतप्रधान मोदींचाच नाही तर देशातील १४२ कोटी भारतीयांचा अपमान असल्याचे भाजपने म्हटले आहे. खर्गे यांनी आपल्या विधानावर नंतर स्पष्टीकरण दिले असले तरी, यावरून पेटलेले राजकीय युद्ध अद्याप थांबताना दिसत नाही. आता खर्गे निवडणूक आयोगाला काय उत्तर देतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## ऊन्हाच्या तीव्र झळा

# ऊभ्या दुचाकीने अचानक घेतला पेट; नागरिकांची होरपळ

**अकोला/प्रतिनिधी :** विदर्भातील तापमानात चांगलीच वाढ झाली. उन्हाच्या तीव्र झळा बसत आहेत. जगात सर्वाधिक तापमानाचे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अकोल्यात उन्हाच्या लाटेत नागरिकांची होरपळ होते. वाढते तापमान आता वाहनांसाठी सुद्धा धोकादायक ठरत आहे. शहरातील उमरी भागात उभ्या दुचाकीने पेट घेतल्याची घटना बुधवारी दुपारी घडली. दुचाकी क्षणार्धात आगीच्या भक्ष्यस्थानी सापडली. अकोला जिल्ह्याला दरवर्षी उन्हाळ्यात तप्त उन्हाचे चटके सहन करावे लागतात. उन्हाळ्यात तापमानात कमालीची वाढ होते. जिल्ह्यात दरवर्षी तापमानाचे विक्रम रचले जातात. देशातच नव्हे तर जगातील सर्वाधिक उष्ण शहर म्हणून अकोला पुढे आले आहे. या उन्हाळ्यात देखील अकोला जागतिक पातळीवर सर्वाधिक उष्ण शहर ठरले. एप्रिल महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासून तप्त उन्हाच्या झळा बसण्यास सुरुवात झाली. दुपारच्या सुमारास शहरातील रस्ते निर्मनुष्य होतात. शहरात उष्माघातामुळे एकाचा बळी देखील गेला. काही दिवसांपूर्वी वातावरणात थोडा बदल झाला होता. शहरात काही काळ ढगाळ वातावरण निर्माण होते. मात्र, त्याचा तापमानावर परिणाम झालेला नाही. तापमानाचा चढता आलेख कायमच आहे.

**उभी दुचाकी अन् अचानक घेतला पेट** -जिल्ह्यात वाढलेल्या तापमानाचा फटका आता वाहनांना बसण्यास सुरुवात झाली. शहरातील उमरी भागात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर मुख्य मार्गावर बुधवारी दुपारी एक दुचाकी उभी होती. त्या दुचाकीने अचानक पेट घेतला. काही क्षणात आगीने रौद्ररुप धारण केले. संपूर्ण दुचाकी आगीच्या भक्ष्यस्थानी सापडली.

➪(पान २ वर)

# कल्पना अशोक खरातच्या अडचणीत वाढ

## अटकपूर्व जामीन अर्ज न्यायालयाने फेटाळला

**मुंबई/प्रतिनिधी :**भोंदू अशोक खरातची फरार पत्नी कल्पना खरात हिने वकिलांमार्फत अटकपूर्व जामिनासाठी दाखल केलेला अर्ज जिल्हा व सत्र न्यायालयाने फिर्यादी व आरोपींचे वकील तसेच पोलिसांचा युक्तिवाद ऐकून घेत फेटाळला. त्यामुळे कल्पना खरातच्या अडचणीत वाढ झाली आहे. शिर्डीतील चार एकर भूखंड खरेदीप्रकरणी जमीन व्यवहाराच्या नावाखाली कोट्यवधींची फसवणूक व सावकारकीच्या कायद्यानुसार रावसाहेब गोंदकर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार भोंदू अशोक खरात, त्याची पत्नी कल्पना खरात व इतर ३ अशा एकूण ५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



कल्पना खरात ही शिर्डीतील गुन्ह्यात आरोपी असून तिने राहाता सत्र न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. फिर्यादीचे वकील शुभम गोंदकर, सरकारी वकील सतीश पानगव्हाणे तसेच बचाव पक्षाचे वकील प्रशांत गिरी यांनी न्यायालयात युक्तिवाद केला. बचाव पक्षाचे वकील गिरी यांनी सांगितले की, रावसाहेब गोंदकर यांच्या जमीन खरेदीसंदर्भातील कोणत्याही बैठकीत कल्पना खरात उपस्थित नव्हत्या.

त्यामुळे अशोक खरात यांच्या कथित कृत्यांसाठी त्यांच्या पत्नीला जबाबदार धरता येणार नाही तसेच कल्पना खरात यांच्या बँक खात्यांचा वापर पतीकडून होत असल्याने आर्थिक व्यवहार त्यांच्या माहितीत होतेच असे म्हणता येणार नाही. त्यांच्या पतीविरुद्धच्या आरोपात कल्पना खरातचा सहभाग नाही. कुटुंबाची जबाबदारी, मुलांचे संगोपन आणि पोलिसांना आवश्यक कागदपत्रे आधीच उपलब्ध असल्यामुळे कोठडीची गरज नसल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच तपासात सहकार्य करण्याची आणि रोज हजेरी लावण्याची तयारी दर्शवली.

राहुरी पोटनिवडणुकीच्या मतदानासाठी प्रशासन सज्ज

सरकारी पक्षाने मात्र या दाव्यांना विरोध करताना सांगितले की, पॉवर ऑफ अटर्नी करताना कल्पना खरात स्वत? उपस्थित होत्या. संबंधित कागदपत्रांवर त्यांच्या स्वाक्षऱ्या, अंगठ्याचे ठसे आणि छायाचित्रे आहेत. याशिवाय व्याज व्यवहारात २ टक्के रक्कम त्यांना देण्याचा उल्लेख असल्याने त्यांना व्यवहाराची माहिती नव्हती हा दावा ग्राह्य धरता येत नाही, तसेच सावकारकी परवान्याबाबत प्रश्न उपस्थित करत मृत जितेंद्र शेळके यांच्या साक्षीचाही संदर्भ दिला.

फिर्यादी रावसाहेब गोंदकर यांचे वकील शुभम गोंदकर यांनी नोंदणीकृत मुखत्यारपत्र आणि विविध माध्यमांतून झालेल्या आर्थिक व्यवहारांचा दाखला देत कल्पना खरात यांचा सहभाग असल्याचे सांगितले. पत्नीच्या खात्याचा पतीकडून वापर होणेही गैर असल्याचे त्यांनी नमूद केले. तपास अधिकारी निवांत जाधव यांनी न्यायालयात सांगितले की, कल्पना खरात कोणतीही नोकरी करत नसतानाही त्यांच्या खात्यातून सुमारे ७ कोटी रुपयांचे व्यवहार झाले आहेत. या रकमेचा स्रोत तपासणे आवश्यक आहे. तपासात ५७ मालमत्ता समोर आल्या असून त्यापैकी सुमारे ४० टक्के मालमत्ता कल्पना खरात यांच्या नावावर असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे त्यांना व्यवहाराची माहिती नसल्याचा दावा ग्राह्य धरता येणार नाही असे त्यांनी

➪(पान २ वर)

# शाळांच्या 'दुकानदारी'ला लगाम

## विशिष्ट दुकानांतून खरेदीची सक्ती केल्यास कारवाई; शिक्षण विभागाचे निर्देश जारी



**मुंबई/प्रतिनिधी :** सीबीएसई शाळांचे सत्र सुरू होताच शालेय साहित्य खरेदीची लगबग वाढली आहे. दादर, अंधेरी, बोरिवलीतील पुस्तक बाजारात एप्रिल महिन्यात पालकांची मोठी गर्दी दिसत आहे. वह्या, पुस्तके, गणवेश खरेदीसाठी पालकांची धावपळ सुरू आहे. नवीन सत्रामुळे मागणी वाढल्याने दरांमध्येही चढउतार जाणवत आहे. अनेक खासगी शाळांकडून विशिष्ट दुकानांची यादी देउन त्याच ठिकाणाहून साहित्य खरेदी करण्याची सक्ती केली जाते. अन्यत्र

➪(पान २ वर)







# तब्बल 150 वर्षानंतर जगावर 'एल निनो'चे संकट

## मोठ्या नैसर्गिक आपत्तीचे संकेत; भारतावर होणार मोठा परिणाम

**न्यूयॉर्क/नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** यंदा संपूर्ण जग एका मोठ्या भीषण संकटाच्या उंबरठ्यावर उभा आहे. एक अत्यंत वाईट बातमी समोर आली आहे. १८७७-७८ मध्ये अशीच घटना घडली होती, ज्या घटनेने संपूर्ण जगात हाहाकार उडाला होता, त्याची पुनरावृत्ती २०२७ मध्ये घडू शकते असा अंदाज तज्ज्ञांकडून वर्तवण्यात आला आहे. मोठ्या नैसर्गिक आपत्तीचे संकेत मिळत आहेत.

जगभरातील हवामान तज्ज्ञांकडून यंदाच्या मान्सूनबाबत धडकी भरवणारा अंदाज वर्तवण्यात आला आहे. यंदाच्या मान्सूनवर अल निनोचे सावट आहे. यंदाचा अल निनो एवढा शक्तिशाली आहे की, यापूर्वी अशी घटना १८७७ मध्ये घडली होती. १८७७ मध्ये संपूर्ण जगात भीषण दुष्काळ पडला होता, त्या वर्षभरात दुष्काळामुळे अनेक लोकांचे मृत्यू झाले. त्यानंतर पुन्हा अशा कोणत्याही दुष्काळाची नोंद झाली नाही. मात्र यावर्षी तशाच स्वरुपाच्या अल निनोचा प्रभाव पावसावर पडण्याचा अंदाज जगभरातील हवामान तज्ज्ञांकडून वर्तवण्यात आला आहे.

प्रशांत महासागरच्या पृष्ठभागाचं तापमान झपाट्याने वाढत आहे.



त्यामुळे यंदाच्या मान्सूनवर अल निनोचा तीव्र प्रभाव पहायला मिळू शकतो असा इशारा हवामान तज्ज्ञांकडून देण्यात आला आहे. यावर्षीचा अल निनो हा मेगा किंवा सुपर असू शकतो, अशी माहिती देखील हवामान तज्ज्ञांकडून देण्यात आली आहे. अल निनोची सुरुवात ही प्रशांत महासागरात होते, मात्र त्यानंतर त्याचा प्रभाव हा हळूहळू संपूर्ण जगावर पडतो. यंदा भारत, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आणि मध्य अफ्रिका तसेच अमेझानचं संपूर्ण जंगल अल निनोच्या प्रभावाखाली येणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे जगावर मोठे संकट निर्माण झाले आहे.

**भारतावर काय परिणाम?**

यंदा देशात मान्सूनचे प्रमाण कसे राहणार? याबाबत भारतीय हवामान खात्याकडून पहिला अंदाज वर्तवण्यात आला आहे. हवामान खात्यानं वर्तवलेल्या अंदाजामुळे चिंता वाढली आहे. यंदा भारतासह राज्यातील मान्सूनवर अल निनोचं सावट असणार आहे. याचा मोठा फटका हा पावसाला बसू शकतो. अल निनोमुळे ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात पावसाचे प्रमाण कमी राहणार आहे. दरम्यान संभाव्य अल निनोच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून तयारीला सुरुवात झाली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर दोन दिवसांपूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाची बैठक बोलावली होती. या बैठकीत संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना करण्यात आल्या आहेत.

# लाईफ डेव्हलपमेंट सोसायटीचा 'अमरावती भूषण पुरस्कार -२०२६' सोहळा थाटात

## डॉ. नरोटे, पीआय चव्हाण, पत्रकार तायडे, ॲड. प्रीती रेवणे सन्मानित



-विविध क्षेत्रातील ५० नामवंत व्यक्तींच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव

**अमरावती/प्रतिनिधीः-** विविध क्षेत्रातील प्रतिभावंतांचा-नामवंतांच्या गौरव करून त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा सन्मान करण्याच्या उद्देशाने लाईफ डेव्हलपमेंट सोसायटी अमरावतीचा 'अमरावती भूषण पुरस्कार - २०२६' चा दिमाखदार सोहळा मंगळवार दिनांक २१ एप्रिल रोजी जिल्हा क्रीडा संकुल च्या भव्य प्रांगणात मोठ्या थाटात पार पडला. या सोहळ्यामध्ये विविध क्षेत्रातील ५० नामवंत व्यक्तींना 'अमरावती भूषण पुरस्कार - २०२६, देऊन मोठ्या सन्मानाने गौरविण्यात आले.

जेष्ठ समाजसेवक चंद्रकुमार उर्फ लप्पीसेठ जाजोदिया यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या पुरस्कार वितरण सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून विद्याभारती शैक्षणिक मंडळ अमरावती चे सचिव डॉ.अशोकसिंह चव्हाण, जेष्ठ समाजसेवक सुदर्शन जैन , सिटी न्यूज चॅनेल चे प्रबंध संपादक डॉ. चंदू सोजतिया, कॉटन किंग प्रतिष्ठान अमरावतीचे संचालक अमोल चवणे, सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल अमरावतीचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.अमोल नरोटे, पोलीस आयुक्तालय शहर गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण तसेच एल.डी.एस. अमरावतीचे अध्यक्ष श्वेतकुमार , स्वागताध्यक्ष डॉ. नरेंद्र गुलदेवकर , निमंत्रक अजय शृंगारे आदी मान्यवर उपस्थित होते.

सर्व प्रथम गणेश वंदना व महाराष्ट्र गीत तसेच मान्यवरांचे हस्ते दीपप्रज्वलन करून सोहळ्याला सुरुवात झाली.

आपल्या प्रास्ताविकामधे एल.डी.एस. अमरावतीचे अध्यक्ष श्वेतकुमार यांनी सांगितले कि, लाईफ डेव्हलपमेंट सोसायटी अमरावती ही एक एनजीओ संस्था असून गत ३५ वर्षापासून समाज उत्थानासाठी अविरतपणे काम करीत आहे. सेवा आणि संधी निर्माण करण्याबरोबरच समाजाच्या जडणघडणीसाठी चांगल्या पद्धतीने काम करणाऱ्या प्रत्येक माणसात प्रेरणा निर्माण व्हावी, यासाठी संस्थेचा नेहमी पुढाकार राहणार असल्याचे श्वेतकुमार यांनी सांगितले.

तसेच जेष्ठ समाजसेवक सुदर्शन जैन यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना सांगितले कि, अमरावती शहराला संत, महंत , थोर महापुरुष यांच्या कार्याचा व विचाराचा वारसा लाभला आहे. त्यांच्या विचारातून आज खऱ्या अर्थाने अमरावतीची सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्यिक, क्रीडा विकास अशी सर्वांगीण जडण घडण झाली आहे. हाच वारसा पुढे नेण्यासाठी शहरातील नामवंत व्यक्ती व संस्था, यांचे मोठे योगदान आहे, त्यांनी चांगली कामगिरी केली आहे. त्यामुळे त्यांना या कामांसाठी आधिकाधिक प्रोत्साहित करण्यासाठी पुरस्कार देणे व त्यांचा सन्मान करणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य असल्याचे जैन म्हणाले.

तसेच डॉ. चंदू सोजातीया म्हणाले, पुरस्कार मिळणे म्हणजे आपल्या कार्याचा शेवट नाही, तर हीच खरी नव्या जोमाने काम करण्याची सुरुवात व ऊर्जा आहे. आपल्या अध्यक्षीय भाषणात चंद्रकुमार उर्फ लप्पीसेठ जाजोदिया यांनी सांगितले कि, मनुष्याचे जीवन हे कर्ममय आहे. जीवनात आल्यानंतर चांगले कर्म करून इतरांचे कल्याण व समाधान चिंतने हीच खरी सेवा आहे. मनुष्याला समाजाप्रति काही देणे लागते म्हणून चांगले कर्म, सेवाभाव व मानवता जपली तर निश्चितच त्यांचे फळ चांगले मिळणार असल्याचे सांगून त्यांनी सर्व पुरस्कार्थींना शुभेच्छा प्रदान केल्या.

तदनंतर अमरावती भूषण पुरस्कार वितरणाला सुरुवात झाली, ज्यामध्ये वैद्यकिय क्षेत्रातून डॉ. अमोल नरोटे, ललीता अटाळकर, डॉ. छाया सं. थोरात, डॉ. ज्योती राठोड, तसेच पोलीस सेवा करिता संदीप प्र. चव्हाण, प्रवीण आखरे, राजकारण क्षेत्रातून ॲड. प्रीती ह.रेवणे ( शिक्षण सभापती मनपा ) गिता बा. लिंगायत (नगराध्यक्ष चिमुर) , स्नेहा आशिष लुल्ला ( विधी सभापती मनपा)त्याचबरोबर पत्रकारिता क्षेत्रातून अनिल मुणोत (संपादक प्रेरणापुंज) , शुभम बायस्कर ( एनडीटीव्ही मराठी ), शशांक लावारे ( ईटीव्ही मराठी), नयन मोंढे ( दै. विदर्भ मतदार ), अमित तायडे (वृत्त संपादक आरसीएन डिजिटल न्यूज), तसेच शिक्षण क्षेत्रातून डॉ. नितीन मांडवगडे, डॉ. शिवाजी कुचे, प्रा.भाग्यश्री प्र. कांबळे, वैशाली वि. हांडा, सामाजिक कार्याकरिता सलिमभाई मिरावाले, जयश्री हरिचंद्र गंधे, शंकर ओटवाणी तसेच सांस्कृतिक क्षेत्रातून समृद्धी वि. ठाकूर , राहुल तायडे, नरेंद्र मुधोळकर, राजेश बोडे (हेमंत नृत्य कला) ,पल्लवी वैद्य ,उद्योग क्षेत्रातून शालिनी च. नरगडे, ऋषिकेश शे. औगड , संजय बाळापुरे, सचिन गवई, रियल इस्टेट मधून गोपाळ इंगळे , फॅशन डिझाईन टेक्नॉलॉजी आरती संतोष यादव, यांना अमरावती भूषण पुरस्कार २०२६ देऊन मान्यवर अतिथींच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. तसेच विधीतज्ज्ञ ॲड. अतुल महात्मे, कृषी क्षेत्रातून शिवानंद बोडखे, क्रीडा करिता प्रतिक डुकरे, लेखिका संजिवनी काळे, डॉ.रजिया सुलताना, वेलनेस कोच कीर्ती रायबोले , समुपदेशिका डॉ. शितल मालोदे दंडाळे,मनोरंजन क्षेत्रातून रोशन भजनकर, तसेच योगासाठी डॉ. राजू डांगे, शोभना सु. देशमुख, सक्षम बी.तायडे यांना लाईफ डेव्हलपमेंट सोसायटी द्वारा 'अमरावती भूषण पुरस्कार - २०२६' देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन छाया गुलदेवकर यांनी केले. त्यांनी आपल्या शब्द व अनुवादातून या सोहळ्यात खरी रंगत आणली. तर आभार प्रदर्शन एलडीएस अमरावतीचे सचिव नरेंद्र गुलदेवकर यांनी केले.

यावेळी आयोजक समितीचे जगदीश गुप्ता, राहुल खंडारे, आतिश डोंगरे, अक्षय नरगडे, रघुनाथ भंकाळे, सागर डोंगरे, विक्रम ढोके, रोशन मांडे, धम्मरक्षित वानखडे, वृषभ सोनी, निलेश गायकवाड, सुमेय राऊत, सुधीर गाडे, रोहण खोल्लारे, सुधीर वानखडे, रविंद्र गुलदेवकर, डॉ. सुबोध राऊत, भारत पाटील आदीसह लाईफ डेव्हलपमेंट सोसायटी अमरावतीचे पदाधिकारी व सदस्य तसेच पुरस्कार्थींचे नातेवाईक व मित्र परिवार प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्त

# मसाला भात व मठ्ठा वाटप



**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** चांदूर रेल्वे शहरातील अखिल भारतीय सर्व शाखीय ब्राह्मण महासभा व परशुराम जन्मोत्सव समितीच्या वतीने राममंदिर मध्ये ब्राह्मण समाजाचे ज्येष्ठ वृंद पंडीत ह्रदेश तिवारी, मोहन दुबे, नरेंद्र लांबे,देवेश वाजपेयी, गुड्डू शर्मा,विजय कलावटे यांच्या हस्ते पूजन, आरती करण्यात आली. तसेच समाजांचे माजी अध्यक्ष विनोद तिवारी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत स्व. बाळासाहेब ठाकरे चौकात मसाला भात व मठ्ठा वाटप करण्यात आले.

सकाळी ९ वाजता राम मंदिरात भगवान परशुरामांच्या फोटोचे पूजन आणि स्थानिक ब्राम्हण समाजातील ज्येष्ठ वृंद यांच्या हस्ते आरती करण्यात आली व त्यानंतर माजी अध्यक्ष विनोद तिवारी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. शहरातील दिवंगत बाळासाहेब ठाकरे चौकात भगवान परशुराम जन्मोत्सव समिती आणि अखिल भारतीय सर्व शाखीय ब्राह्मण महासभेच्या वतीने शहरातील नागरिकांना मसाला भात व मठ्ठा वाटप करण्यात आले. या प्रसंगी सर्व शाखीय ब्राह्मण बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये पंडीत हदेय तिवारी,देवेश वाजपेयी,विजय कलावटे, पत्रकार प्राविण शर्मा,अभिजीत तिवारी,मदन पाठक, दिपक कलावटे,रमाकांत शर्मा,संजय पांडे,मोहन दुबे,सुनिल जोशी,भूषण जोशी,मनिष पांडे, दिनेश जोशी, सनी जोशी, प्रशांत जोशी, विजय मुळे,अक्षय मुळे,दत्ता जोशी,गोपाल कलावटे आशिष जोशी,भूषण जोशी,आर्यन कलावटे आदित्य महर्षी,आशुतोष शर्मा,अंकुश जोशी, विजय जोशी,राजू कलावटे, दिपक कलावटे,धनंजय पाठक, गोविंद महर्षी,आशिष पांडे,श्रीराम दुबे,निरज दुबे,किष्णा तिवारी, शिवराज शर्मा,रजत तिवारी,वेदांत जोशी,आदित्य ओके,शैलेन्द्र दुबे युवल दुबे,हर्षित पांडे विजय जोशी,धिरज तिवारी,रमन तिवारी,वैभव पांडे,सुयोग कलावटे,माहिर कलावटे,धिरज कलावटे,किशोर गंगन,सचिन वर्मा, बंटी गोखले, सिमा कलावटे, आरती कलावटे,रश्मी जोशी,परी जोशी,प्रीती कलावटे,अनिता कलावटे, सारिका तिवारी,खुशी तिवारी,मृन्मयी जोशी,गायत्री जोशी, निधी तिवारी,विधी शर्मा,निलिमा शर्मा,नेहा शर्मा,भारती कलावटे, मोहन दुबे, शैलेश दुबे,मोनू मिश्रा,भूषण जोशी, शैलेंद्र दुबे, नरेन्द्र लांबे,रविन्द्र जोशी,मिठू कलावटे,नारायण कलावटे,मनिष निरमुडे, पंडीत पात्रिकर,महेश कलावटे,सिताराम दुबे सह समस्त सर्व शाखीय ब्राम्हण समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

परशुराम जन्मोत्सव समितीच्या वतीने स्थानिक ठाकरे चौकात मसाला भात व मठ्ठा वाटप करण्यात आले. यावेळी ब्राम्हण समाजातील युवकांनी स्वच्छतेचा संदेश देत स्त्यावर पडलेले रिकामे ग्लास गोळा करून ते महापालिकेच्या कचरा संकलन वाहनात टाकून परीसर स्वच्छ केला.

# आईच्या हत्येप्रकरणी मुलास जन्मठेप

## जिल्हा सत्र न्यायालयाचा निकाल; दंडही ठोठावला

**वर्धा जनमाध्यम :** आईची हत्या केल्याप्रकरणी आरोपी मोहन उर्फ सोपान वल्दे मुरलीधर पुसदकर याला जिल्हा सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. भादंवि कलम ३०२ अंतर्गत ही शिक्षा देताना न्यायालयाने आरोपीस दोन हजार रुपयांचा दंडही ठोठावला असून, दंड न भरल्यास एक वर्ष साध्या कारावासाची शिक्षा भोगावी लागणार आहे. हा निकाल जिल्हा न्यायाधीश-२ एस. जे. अंसारी यांनी दिला.

सरकारी पक्षाने मांडलेल्या माहितीनुसार, आरोपीचे गावातील एका महिलेसोबत अनैतिक संबंध होते. या संबंधांबाबत आई मिरा मुरलीधर पुसदकर वारंवार विरोध करत होती. संबंध तोडण्याचा सल्ला देत असल्याने आरोपीने राग मनात धरला होता.

२ फेब्रुवारी २०२४ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास आरोपीने घरात झोपलेल्या आईवर दगडी पाट्याने हल्ला करून तिची हत्या केली. घटनेनंतर घरात राहणारे प्रेमदास आत्राम यांनी दरवाजा ठोठावून योगिता चौधरी यांना जागे केले. त्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता मिरा पुसदकर या रक्ताच्या थारोळ्यात मृतावस्थेत आढळल्या. या प्रकरणी खरांगणा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक पोलिस निरीक्षक सदाशिव ढाकणे यांनी तपास पूर्ण करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. सुनावणीदरम्यान सरकारी वकील विनय आर. घुडे यांनी पुरावे व युक्तिवाद सादर केला. या प्रकरणात नऊ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद व सादर पुरावे विचारात घेऊन न्यायालयाने आरोपी दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

## १ व १० वरिल उर्वरित

### गवई 'चमत्कारी' दरबारात

**भेटीवर संतप्त प्रतिक्रिया;**

**नागपूर :** बागेश्वर बाबा म्हणून प्रसिद्ध असलेले धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांची अलिकडेच माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी भेट घेतली. मध्यप्रदेशमधील छतरपूर जिल्ह्यातीलबागेश्वर धाम येथे गवई सहकुटुंब पोहोचले. त्यांच्या या भेटीचे छायाचित्र स्वतःबागेश्वर धामच्या एक्स अकाउंटवरून प्रसिद्ध करण्यात आले.

जेव्हा न्याय, कर्तव्य आणि श्रद्धा एकत्रित येतात, तेव्हा समाजाला नवी दिशा प्राप्त होते, अशा आशयाच्या संदेशासह बागेश्वरधामच्या अधिकृत अकाउंटवरून ही माहिती प्रसिद्ध करण्यात आली. यानंतर ही भेट सोशल मिडियावर चांगलीच व्हायरल झाली. या भेटीवर लोकांमधून विशेषतः आंबेडकरी समाजामधून संतप्त प्रतिक्रिया उमटला. राजकीय पक्षांनीही यावर भाष्य केले.

**न्यायमूर्तीचे वैचारिक अध:पतन-**न्यायमूर्ती गवई ज्या पदावर बसले होते, ते पद संविधानाच्या रक्षणाचे आहे. अशा जबाबदार पदावरील व्यक्तीने जेव्हा अंधश्रद्धेचे माहेरघर समजल्या जाणा-या बागेश्वर धामसारख्या ठिकाणी जाउन विधी-विधान करणे, हे केवळ वैयक्तिक श्रद्धेचा भाग उरत नाही. ही भेट आंबेडकरी विचारधारा ह्याची शोकांतिका आणि विचारांशी प्रतारणा आहे.बाबासाहेबांनी आयुष्यभर ज्या भोंदूगिरी, कर्मकांडांविरुद्ध लढा दिला, त्याच कर्मकांडांचे समर्थन करताना आजचे तथाकथित आंबेडकरी उच्चपदस्थ दिसत आहेत. सर्वोच्च न्यायालयात बसलेली व्यक्ती जेव्हा अशा चमत्कारांचा दावा करणा-या पीठावर जाते, तेव्हा समाजातील सामान्य वर्गाला अंधश्रद्धा पाळण्यात काहीच गैर नाही असा चुकीचा संदेश जातो. संविधानाच्या सर्वोच्च पदावर बसून अंधश्रद्धेच्या धामची वारी करणे हे वैचारिक दिवाळखोरीचे लक्षण आहे. आंबेडकरी जनतेने अशा घटनांकडे गांभीर्याने पाहून, बोध घेतला पाहिजे, अशी प्रतिक्रिया वंचित बहुजन आघाडीचे महासचिव राजेंद्र पातोडे यांनी फेसबुकच्या माध्यमातून दिली.

**सोशल मिडियावर प्रतिक्रियांचा पाउस-**फेसबुकवर गणेश पवार नावाच्या एका व्यक्तीने म्हटले की बाबासाहेबांचे मुझे मेरे पढे लिखे लोगो ने धोका दिया है हे वाक्य तंतोतंत लागू होत आहे. रामचंद्र येवतीकर यांनी लिहिले कितीही शिकले तरी मनुस्मृतीचे मूळ संस्कार जात नाही. एका दुस-या व्यक्तीने उपरोधिकपणे लिहिले की गवई साहेबांच्या वागण्यावरून असे समजते की साहेबांनी बागेश्वर धामला जाण्यासाठी फारच उशीर केला. त्यांनी या अगोदरच जायला हवे होते. शंकर यादव नावाच्या व्यक्तीने लिहिले, आयुष्यभर संविधानाच्या नियमाने चालणारा व्यक्ती ज्यावेळेला धर्माच्या गोतावळ्यात अडकला जातो. त्यावेळेला त्याची विद्वता कुठे संपली की काय, असा प्रश्न निर्माण होतो. दीपक जाधव यांनी लिहिले की डॉ.आंबेडकर असते तर त्यांना मनस्ताप झाला असता.

### ऊन्हाच्या तीव्र झळा

परिसरातील नागरिकांनी दुचाकीवर पाणी मारून आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. मात्र, तोपर्यंत दुचाकी संपूर्णतः जळाली. या घटनेमुळे मार्गावरील वाहतूक सुद्धा विस्कळीत झाली होती. उन्हाची तीव्रता लक्षात घेता आता वाहनांची देखील विशेष काळजी घेण्याची गरज निर्माण झाली आहे. वाढत्या तापमानामुळे आगीच्या घटना पण सातत्याने घडत आहेत.

अकोल्याचा पारा ४३.७ अंशांवर

हवामान विभागाने नोंदवलेल्या तापमानानुसार बुधवारी अकोला जिल्ह्याचा पारा ४३.७ अंशांवर पोहोचला आहे. विदर्भातील सर्वच शहरांचे तापमान ४० अंशांच्या वरच आहे. या उन्हाळ्यात अकोल्याचे सर्वोच्च ४५ अं.से. तापमानाची नोंद झाली. त्यानंतर हवामान विभागाने वादळी पावसाचा इशारा दिला होता. त्यानुसार वातावरण बदल देखील घडून आला. मात्र, तापमानाचा पारा काही कमी झालेला नाही. उष्माघातापासून बचावासाठी नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले.

### कल्पना अशोक खरातच्या

न्यायालयासमोर मांडले. कल्पना खरातच्या खात्यातून पैसे गेल्याचे आरोपीच्या वकिलाने मान्य केले.

कल्पना खरात प्राप्तिकर विभागाला संपूर्ण कर भरते, शिवसंकल्प हार्डवेअर हा तिचा व्यवसाय आहे. असा युक्तिवाद आरोपीचे वकील प्रशांत गिरी यांनी केला. कल्पना खरातच्या विरहित जमिनीचा व्यवहार झालेला आहे. त्यामुळे यामध्ये आरोपी करू नये. कल्पना खरातच्या विरोधात याआधी कुठलाही फसवणुकीचा गुन्हा दाखल नाही, असा युक्तिवाद आरोपीचे वकील प्रशांत गिरी यांनी केला.

शोध घेण्याचे पोलिसांपुढे आव्हान

दरम्यान, ३१ मार्चपासून फरार असलेल्या कल्पना खरातचा शोध घेणे शिर्डी पोलिसांसमोर मोठे आव्हान ठरत आहे. कल्पना खरात पोलिसांसमोर शरण येणार का, की उच्च न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी धाव घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### शाळांच्या 'दुकानदारी'ला लगाम

खरेदी केल्यास ते साहित्य अमान्य करण्याचे प्रकारही समोर आल्याने शासनाने प्रतिबंधात्मक निर्णय जारी केला आहे. काही शाळांकडून अभ्यासक्रमाबाहेरील अतिरिक्त पुस्तकेही खरेदीस भाग पाडले जाते. या माध्यमातून टक्केवारीचे व्यवहार होत असल्याचा आरोप पालक शंकर पानपाटील यांनी केला आहे. कोणत्याही शाळेला विशिष्ट दुकानांतून खरेदीची सक्ती करण्याचा अधिकार नाही. नियमभंग केल्यास कारवाई केली जाईल, असे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे. पालकांनी शिक्षण निरीक्षक किंवा विभागीय कार्यालयाकडे तक्रार नोंदवावी. मुंबई विभागासाठी विभागीय शिक्षण उपसंचालक चर्नी रोड येथील कार्यालयात करावी. हा निर्णय सर्व व्यवस्थापनांच्या, सर्व माध्यमांच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांना समानपणे लागू राहील. कोणत्याही प्रकारे विद्यार्थ्यांवर विशिष्ट दुकानातूनच वह्या, पुस्तके किंवा शैक्षणिक साहित्य खरेदी करण्याची सक्ती करता येणार नाही. यामुळे पालकांवरील आर्थिक ताण कमी होण्यास मदत होईल. महाराष्ट्र राज्य मंडळ, केंद्रीय शिक्षण मंडळ तसेच आंतरराष्ट्रीय शिक्षण परिषद संलग्न शाळांनी राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद आणि राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेची अधिकृत पाठ्यपुस्तकेच वापरावीत. शासनाच्या निर्णयानंतर आमच्या भागातील ६०० शाळांना याबाबतची नोटीस जारी केली आहे. विद्यार्थी व पालकांच्या हिताला शिक्षण विभागाचे प्राधान्य आहे. असे संजय जावीर, शिक्षण निरीक्षक, पश्चिम शिक्षण विभाग यॊनी सांगितले.

### उंबरीत दोन भावांच्या गोठयाना

शामराव ढोके याने या गोठ्यांना जाणीवपूर्वक आग लावली. रात्रीच्या वेळी अचानक आग लागल्याचे शेजारी राहणारे गजानन देवतळे यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी तातडीने वडतकर बंधूंना माहिती दिली. प्रसंगावधान राखत गावकरी आणि मालकांनी गोठ्यातील जनावरांना बाहेर काढल्यामुळे मोठी जीवितहानी टळली. यामध्ये रोहन वडतकर यांची ५ जनावरे व विकास वडतकर यांचे २० बकऱ्या आणि २ बैल गावकऱ्यांनी सोडवले व शेजारील बोअरचे पाणी आणि मंदिरातील पाण्याच्या टाकीच्या मदतीने शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली.आग विझवल्यानंतर ही आग नेमकी लागली कशी, याची शहानिशा करण्यासाठी शेजारील डॉ. मंगेश राऊत यांच्या घरासमोरील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची तपासणी करण्यात आली. या फुटेजमध्ये आरोपी शामराव ढोके हा गोठ्यांना आग लावताना स्पष्टपणे दिसून आला. या आगीमध्ये गोठ्यातील शेती उपयोगी साहित्य स्पींकलर पाईप, फवारणी पंप,होस पाईप,ताडपत्र्या आणि गोठ्याचे मिळून एकूण १,३५,००० रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. महसूल व पोलीस विभागाने घटनास्थळी पोहोचून नुकसानीचा पंचनामा केला आहे. तक्रारीनुसार, आरोपी शामराव ढोके याच्याविरुद्ध भा.न्या.सं ३२६(फ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या आरोपी फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. रहीमापूर चिंचोलीचे ठाणेदार अनंत वडतकर यांच्या मार्गदर्शनाखाली पो.कर्मचाऱ्यांचे पथक पुढील तपास करत आहेत.भरवस्तीत मध्यरात्री घडलेल्या या घटनेमुळे उमरी ममदाबाद परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, आरोपीला कडक शिक्षा करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

### पिण्याच्या पाण्यापासून

यांना आज बुधवार २२ एप्रिल रोजी निवेदनातून दिला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, पेढी प्रकल्प अंतर्गत हातुर्णा पुनर्वसन मधील पाण्याच्या टाकीमधील पाणी स्थानिकांना उपलब्ध होत नाही. नागरिकांनी याच्या अनेक तक्रारी गावातील सरपंच आणि व्यवस्थापकाकडे केल्या आहे. तरीपण ग्रामवासियांना पाणी मिळत नाही. या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्वरित कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे. नाहीतर १ मे नंतर जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी छोटू महाराज बसू, महानगर प्रमुख बंटी रामटेके, सुधीर मानकेसह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आरोपी आयान अहमदची

गेले. यावेळी आरोपी अयान लंगडत चालत असल्याने पोलिसांनी त्याची चागलीच खातरजमा केली असल्याचा अंदाज नागरिक लावत आहे. धिंडीदरम्यान मोठ्या संख्येने नागरिक रस्त्यावर जमले होते. अनेकांनी आरोपीविरोधात संताप व्यक्त करत कठोर शिक्षेची मागणी केली. तपासादरम्यान महत्त्वाची माहिती समोर आली आहे. आरोपी अयान अहमद याने गुन्ह्याशी संबंधित काही संशयास्पद वस्तू आपल्या एका मित्राकडे लपवून ठेवल्याचा संशय पोलिसांना आहे. या वस्तूंमध्ये मोबाईल फोन, मेमरी कार्ड किंवा इतर डिजिटल पुरावे असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याच पार्श्वभूमीवर पोलिसांनी संबंधित ठिकाणी शोधमोहीम सुरू केली असून, हेच पुरावे गोळा करण्यासाठी आरोपीला पोलिसांनी पैदल त्याचा मित्र नुमानच्या घरापर्यंत घेऊन दिंड काढली. त्याच्या मित्राकडून पोलिसांना मोबाईल, मेमरी कार्ड किंवा इतर पुरावे मिळाले असल्याची माहिती आहे. या पुराव्यांच्या आधारे प्रकरणातील आणखी धागेदोरे मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. काही दिवसापूर्वी आयानने एक आयफोन नुमानला विक्री केला होता. पोलिसांनी हा मोबाईल जप्त केला आहे. त्यामधून काही माहिती पोलिसांच्या हाती लागण्याची शक्यता आहे.

अचलपूरच्या समरसपुरा पोलीस ठाण्याचे पथक या संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास करत आहे. आरोपीला मदत करणारे इतर सहकारी आहेत का, तसेच या प्रकरणामागे कोणते मोठे जाळे कार्यरत आहे का, याचाही तपास सुरू आहे.

पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, या प्रकरणाशी संबंधित कोणतीही माहिती असल्यास ती तात्काळ पोलिसांना कळवावी. तसेच पीडितांनी कोणतीही भीती न बाळगता पुढे येऊन तक्रार नोंदवावी, असेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

### घरफोडी प्रकरणात सराईत

हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेण्यात आला होता. या प्रकरणी चांदूर रेल्वे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपासादरम्यान स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने २१ एप्रिल रोजी मिळालेल्या गुप्त माहितीनुसार दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले. सुरुवातीला आरोपींनी उडवाउडवीची उत्तरे दिली, मात्र सखोल चौकशीत त्यांनी साथीदारांसह घरफोडी केल्याची कबुली दिली.

चोरीतून मिळालेल्या पैशातून आरोपींनी स्वराज कंपनीचा नवीन ट्रॅक्टर खरेदी केल्याचे उघड झाले. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून ७ लाख ५० हजार रुपये किमतीचा ट्रॅक्टर, १ लाख २० हजार रुपये रोख रक्कम आणि ५० हजार रुपये किमतीची होंडा शाईन मोटारसायकल असा एकूण मुद्देमाल जप्त केला आहे.

याशिवाय, आरोपींनी नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील शिवनी रसुल्लापूर येथेही घरफोडी केल्याची कबुली दिली असून, त्या प्रकरणात १० हजार रुपये जप्त करण्यात आले आहेत. अशा प्रकारे दोन घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. आरोपींवर यापूर्वीही विविध पोलिस ठाण्यांमध्ये चोरीचे गुन्हे दाखल असल्याचे समोर आले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. सहायक पोलीस निरीक्षक अमोल मुडे, पोलीस कर्मचारी गजेंद्र ठाकरे, युवराज मानमोठे, रविंद्र वरहाडे, सागर नाठे, शांताराम सोनोने, सायबर विभागाचे विकास अंजिकर आणि चालक प्रज्वल राऊत यांनी या कारवाईत सहभाग घेतला. फरार आरोपींचा शोध सुरू असून, पुढील तपास सुरू आहे.

### रेल्वेच्या धडकेत तरुणाचा

(वय ४७, तापी कॉलनी) अशी झाली आहे. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह पोस्टमार्टमसाठी पाठवला आहे. पुढील तपास सुरू आहे.

### बेगमपुरा शाळेच्या इमारत

कार्यक्रमाला शाळेच्या मुख्याध्यापिका संजीवनी ठाकरे, ज्येष्ठ शिक्षक मुकेश चव्हाण, तसेच सर्व शिक्षकवृंद व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी दर्जेदार शैक्षणिक सुविधा उभारण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

नगराध्यक्षा रुपाली माथने यांनी यावेळी बोलताना, 'विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासोबत उत्तम पायाभूत सुविधा मिळणे अत्यावश्यक आहे. नगर परिषद शिक्षण क्षेत्राच्या उन्नतीसाठी कटिबद्ध असून अशा विकासकामांना प्राधान्य दिले जाईल,' असे सांगितले.

या उपक्रमामुळे बेगमपुरा परिसरातील विद्यार्थ्यांना आधुनिक सोयी-सुविधांनी युक्त शाळा उपलब्ध होणार असून, शिक्षणाच्या दर्जात निश्चितच भर पडणार आहे. भूमिपूजन सोहळ्यामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

### गायवाडी येथे अवैध रेती

प्रशासनाने कठोर पावले उचलण्यास सुरुवात केल्याचे यावरून स्पष्ट होते. या घटनेमुळे अवैध रेती वाहतूक करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून पुढील कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### मिरचीच्या ट्रकला भीषण

नंतर उलटल्याने ट्रकमधील मिरची वर्धा मार्गावर पसरली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल आणि स्थानिक नागरिकांनी तत्काळ धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. मात्र, आगीच्या घटनेदरम्यान ट्रक मधील मिरची रस्त्यावर पसरल्याने परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. दोन तासांच्या प्रयत्नानंतर वाहतूक सुरळीत करण्यात आली. रस्त्यावर मोठ्या प्रमाणात मिरची पसरल्यामुळे वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागला आणि चिचभुवन परिसरात वाहतूक कोंडी निर्माण झाली. काही काळ वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली होती. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून वाहतूक सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले. तसेच, ट्रकला आग लागण्याचे नेमके कारण शॉर्टसर्किट असल्याची प्राथमिक माहिती पुढील तपासात समोर आली आहे.

# जनमाध्यम

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, २३ एप्रिल २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# खेळाचे मैदान व शाळेसाठी राखीव भूखंड धोक्यात ; १ मेपर्यंत कारवाईची मागणी

## ईश्वरी कॉलनीतील आरक्षित जागांवर अतिक्रमणाचा प्रयत्न ; महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे मुख्याधिका-यांना पत्र

■ प्रतिनिधी | वाशिम ■

शहरातील मुख्य परिसरातील ईश्वरी कॉलनीमध्ये नगर परिषद मालकीच्या सार्वजनिक आरक्षित भूखंडांवर अतिक्रमण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात असून, तात्काळ कारवाईची मागणी जोर धरत आहे. यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष राजू किडसे यांनी मुख्याधिकारी यांना निवेदन व तक्रार दिली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, सर्वे नं. ३४६/१ (४२ आर) व ३४६/२ (३३ आर) हे भूखंड तसेच खेळाचे मैदान आणि प्राथमिक शाळेसाठी राखीव असलेली सुमारे २ एकर जागा सध्या अतिक्रमणाच्या विळख्यात सापडत असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे, या जागांभोवती नगर परिषदेमार्फत पूर्वी संरक्षण भिंत उभारण्यात आली होती.

तथापि, सध्या काही व्यक्तींकडून या मौल्यवान सार्वजनिक मालमत्तेवर अनधिकृत कब्जा करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे स्थानिकांनी निदर्शनास आणून दिले आहे. सार्वजनिक उपयोगासाठी राखीव असलेल्या या जागांवर अतिक्रमण झाल्यास भविष्यात मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून नगर परिषद प्रशासनाकडे तक्रार सादर करत तात्काळ अतिक्रमण हटवून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच, शहरातील सर्व नगर परिषद मालकीच्या रिक्त भूखंडांचे सर्वेक्षण करून संरक्षण भिंती व सूचना फलक उभारण्याची मागणीही करण्यात आली आहे. दरम्यान, १ मेपर्यंत कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्यास पुढील स्तरावर तक्रार व आंदोलन छेडण्याचा इशाराही नवनिर्माण सेनेचे जिल्हाध्यक्ष राजू पाटील किडसे यांनी दिला आहे.

# तहसीलचे कर्मचारी बेमुदत संपावर ; जनतेची गैरसोय

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या साठी मालेगाव तहसील कार्यालयातील सर्व कर्मचारी ता.२१ एप्रिल पासून बेमुदत संपावर गेल्याने तालुक्यातील जनतेची फार मोठी कामाची गैरसोय होऊन कामं प्रभावीत झाली आहे.तेव्हा शासनाने तातडीने निर्णय घ्यावा व संप मिटवण्यासाठी प्रयत्न करावे अशी मागणी लोकांतून केली जात आहे.

येथील तहसील कार्यालयातील कर्मचारी हे सकाळी ता.२१ पासून बेमुदत संपावर गेले आहेत.सकाळी सर्व कर्मचारी यांनी तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करत बेमुदत संप पुकारत असल्याचे सांगितले आहे.

बाजारचा दिवस असल्याने अनेक लोक तहसील मध्ये आवश्यक कागदपत्रे काढण्यासाठी आले होते.परंतु कार्यालयात एकही कर्मचारी उपस्थित नसल्याने त्यांना खाली हात परतावे लागले आहे.त्यांना येण्या जाण्याचा खर्च आणि एक



दिवसाच्या मजुरीला मुकावे लागले आहे.

सकाळी तहसील कार्यालयाया समोर कर्मचारी गणेश चौके, चेतना पवार, रेखा घुगे, किशोर खाडे, गणेश खुळे, रवींद्र जुनघरे, शेषनारायण शेवलकर ,अजय पखाले, दिलिप चोंडकर यांच्यासह सर्व हे कर्मचारी संपात सहभागी झाले असल्याचे संघटनेचे उपाध्यक्ष गणेश चौके यांनी सांगितले आहे.जोपर्यंत मागण्या मंजूर केल्या जात नाहीत तोपर्यंत संप सुरूच राहणार असल्याचे संघटनेचे गणेश चौके यांनी सांगितले आहे.

# बदलत्या हवामानासोबत शेतकऱ्यांनी शाश्वत नैसर्गिक शेतीची कासधरावी - आ. खोडे



■ प्रतिनिधी | वाशिम ■

तालुक्याची खरीप हंगाम पूर्व नियोजन बैठक आमदार श्याम भाऊ खोडे, विधानसभा सदस्य वाशिम मंगरूळपीर विधानसभा यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २० एप्रिल रोजी तहसील कार्यालय वाशिम सभागृहात पार पडली, सदर बैठकीस उपविभागीय अधिकारी, वाशिम वैशाली देवकर, उपविभागीय कृषी अधिकारी वाशिम संतोष वाळके, तालुका कृषी अधिकारी वाशिम अतुल जावळे, तालुका अध्यक्ष भाजपा एकनाथ कड , सुभाष चौधरी, सुभाष नानोटे, रामाभाऊ इंगळे, प्रल्हाद गोरे, शरद चव्हाण, बाळू पाटील, डॉ.प्रमोद गंगावणे, जगदीश देशमुख, राजू इंगोले यांची प्रमुख उपस्थिती होती. या बैठकीमध्ये आमदार खोडे यांनी खरीप हंगाम पूर्व नियोजनाचा आढावा घेतला नियोजनाचा आराखडा सादर करताना तालुका कृषी अधिकारी अतुल जावळे यांनी वाशिम तालुक्यातील येत्या खरीप हंगामातील हवामान पीक प्रसिद्धी खत बियाणे नियोजन याविषयी सविस्तर माहिती दिली.

# आ. सई डहाके यांच्या हस्ते विकासकामांचे भूमिपूजन

**कारंजा :** शहरातील ऐतिहासिक आणि धार्मिक वारसा लाभलेल्या खोलेश्वर संस्थान ऋषी तलाव परिसरात रविवारी (दि. १९ एप्रिल) सायंकाळी ६ वाजता १ कोटी ७० लाख रुपयांच्या विकासकामांचे भव्य भूमिपूजन सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास आमदार सई डहाके अध्यक्षस्थानी उपस्थित होत्या.

मठाधीपती श्री. ब्र. १०८ मरुळसिद्ध शिवाचार्य महाराज, श्री गुरु अभेद्यनाथ गुरु सेवेनाथ महाराज यांच्या शुभहस्ते विधिवत भूमिपूजन करण्यात आले. प्रारंभी पुरातन खोलेश्वर शिवलिंगाचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या विकासकामांमध्ये संरक्षण भिंत उभारणी, घाट बांधकाम, पर्यटक निवारा उभारणी, त्या पर्यंत पोहोचण्यासाठी रस्ता, डोम बांधकाम तसेच विविध मूलभूत सुविधा आणि अनुषंगिक कामांचा समावेश आहे.

# वाशिम येथे पाणीटंचाई सभा उत्साहात



■ प्रतिनिधी | वाशिम ■

स्थानिक तहसील कार्यालय वाशिम येथील नवीन सभागृहामध्ये आ .श्याम खोडे, वाशिम मंगरूळपीर विधानसभा यांचे अध्यक्षतेखाली वाशिम व मंगरूळपीर या तालुक्यातील पाणीटंचाई व मुख्यमंत्री बळीराजा पांधन रस्ता बाबत आढाव सभा नुकतीच पार पडली.

सदर सभेला रवी काळे, उपविभागीय अधिकारी, मंगरुळपीर, उपविभागीय पोलीस अधिकारी वाशिम मंगरूळपीर तहसीलदार वाशिम मंगरूळपीर गटविकास अधिकारी वाशिम / मंगरुळपीर दोन्ही तालुक्यातील ग्रामसेवक व सरपंच उपस्थित होते. तसेच मुख्यमंत्री बळीराजा पांदण रस्ते समितीवर नवनियुक्त सदस्य उपस्थित होते. सर्वप्रथम वाशिम तालुक्याचा व नंतर मंगरुळपीर तालुक्यातील पाणीटंचाई बाबत आढावा घेण्यात आला त्यामध्ये सद्यस्थितीत सुरू असलेल्या उपाययोजनाबाबत माहिती देण्यात आली व सभेला उपस्थित असलेल्या सर्व सरपंच व ग्रामसेवक यांचे कडून पाणी टंचाई बाबत आढावा घेण्यात आला. त्यानंतर मुख्यमंत्री बळीराजा पांदण रस्ता बाबत आढावा घेण्यात आला याकरिता समितीवर नवनियुक्त सदस्य ही उपस्थित होते त्यांनी आपापले मत मांडले व शासनाच्या उद्देशाप्रमाणे सर्व ग्रामीण भागातील पांदण रस्ते चे सविस्तर अंदाजपत्रक सादर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. वाशिम मंगरूळपीर विधानसभा आमदार शाम खोडे यांनी सभेमध्ये जनतेनी उन्हापासून संरक्षण करावे सोबतच वाशिम मंगरूळपीर मतदार संघामध्ये ज्या ज्या गावात पाणी टंचाईची समस्या आहे त्या ठिकाणी प्रशासनाने प्रामुख्याने लक्ष देऊन त्या समस्येचे निराकरण करावे अशा सूचना केल्या . मुख्यमंत्री पानधन रस्त्याबाबतही त्यांनी आढावा घेऊन मार्गदर्शन केले.

# केंद्रीय मंत्री नामदार गडकरी यांच्याशी विविध विषयावर चर्चा व सत्कार



■ प्रतिनिधी | वाशिम ■

देशाचे विकास पुरुष व केंद्रीयमंत्री नामदार नितीन गडकरी यांच्या नागपूर निवासस्थानी सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार निलेश सोमानी यांनी नुकतीच भेट घेऊन विविध विषयावर चर्चा केली. वाशिम येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशनाची माहिती त्यांना दिली. सोबतच वाशिम जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाकरिता भरीव निधीची मागणी केली. नामदार गडकरी यांनी वाशिम जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारावे असा आग्रही त्यांनी यावेळी केला. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, तरुण क्रांती मंच , गुरु मंदिर संस्थान च्या वतीने नामदार गडकरी यांचा शाल श्रीफळ सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला .सोबतच पत्रकार अधिवेशनातील कीट त्यांना सोमानी यांनी दिली. यावेळी पत्रकार संघाच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सामाजिक कार्यकर्ते निलेश सोमानी यांचे नामदार गडकरी यांनी अभिनंदन करून सत्कार केला.

# चिंता, निराशा व आत्महत्या रोखण्यासाठी आनंदाचा पासवर्ड कार्यक्रम -डॉ. सचिन परब

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिवनामध्ये आनंदि जिवन जगायचे असेल तर चिंता निराशा व आत्महत्या सारखे विचारा पासून दुर होणे आवश्यक आहे.सदर विचार हे मानसीक आरोग्याचे लक्षन आहे.जिवन हे अनमोल आहे.मानव जिवन मिळणे याला भाग्य लाभते चिंता निराशा व आत्महत्या रोखण्यासाठी आंनदाचा पासवर्ड व आनंदाचा शुभारंभ हा कार्यक्रम महत्वपुर्न आहे.मानसीक आरोग्य चांगले व्हावे व मानसीक शांती मिळावी हा या प्रबोधनाचा मुख्य हेतु आहे असे प्रतिपादन डॉ सचिन परब भाईजी यांनी केले.



स्थानीक प्रजापीता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय वाशिम च्या वतीने मंगळवार २१ एप्रिल रोजी वरदानी भवन येथे आनंदाचा शुभारंभ भाग१ व आनंदाचा पासवर्ड या वीषयावर त्यांनी मार्गदर्शन करतांना वरील विचार मांडले.

यावेळी मंचावर प्रमुख वक्ते डॉ सचीन परब होते.अतीथी म्हणून साहायक आयुक्त शरद चव्हाण अकोला व वाशिम जिल्हा केंद्र संचालीका राजयोगीनी रूक्मीनी दिदि व वाशिम संचालीका ब्रम्हकुमारी स्वॉती दिदि उपस्थीत होत्या.बुधवार २२ एप्रिल रोजी वर्दानी भवन येथे सकाळी योग ,मुरली क्लॉस व ८ ते १० वाजे पर्यंत खुशीचा शुभारंभ पार्ट २ व गुरूवार २३ एप्रिल रोजी सकाळी ८ ते १० वाजता खुशीचा शुभारंभ पार्ट ३ व सायंकाळी ५ ते ७ वाजता स्थानिक महेश भवन माहेश्वरी समाज व मंडळाच्या वतीने आनंदाचा शुभारंभ या विषयावर डॉ सचीन परब मार्गदर्शन करणार आहे.शुक्रवार २४ एप्रिल रोजी वरदानी भवन येथे सकाळी योग,सकाळी ७ ते ८ वाजता मुरली क्लास व सकाळी ९ ते १० जिल्हा कारागृह येथे कार्यक्रम व सायंकाळी ४ ते ६ बाहेती हॉस्पीटल नर्सींग कॉलेज येथील सीताराम कक्ष येथे नशामुक्त जिवन विषयावर डॉ सचीन परब भाईजी करणार आहे.सदर कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आव्हान आयोजकानी केले आहे.

# अकोल्यात भगवान परशुराम जयंती उत्साहात

**अकोला :** भगवान परशुराम जयंतीच्या पूर्वसंध्येला अकोला शहरात ब्राह्मण समाजाच्या वतीने भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले.

खोलेश्वर येथील भगवान परशुराम चौकातून या शोभायात्रेला प्रारंभ झाला. हजारो ब्राह्मण बांधव तसेच महिला-पुरुष श्रद्धाळूंनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला. कार्यक्रमाची सुरुवात भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन-अर्चन करून करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र होमिओपॅथिक फीमेल डॉक्टर्स असोसिएशन , अकोला यांच्या वतीने उष्माघातापासून बचावासाठी मोफत होमिओपॅथिक औषध वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आले.

# धरावी राज्यस्तरीय चित्ररंगभरण स्पर्धा उत्साहात संपन्न; पुण्यात य. च. इंग्लिश हायस्कुलचा गौरव

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

साई कला आविष्कार नाट्य संस्था, पुणे व श्रीमती चंद्रकला किशोरीलाल गोयल प्रतिष्ठान, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंधरावी राज्यस्तरीय चित्ररंगभरण स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ चिंचवड येथील सायन्स पार्क नाट्यगृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर आधारित या स्पर्धेत राज्यभरातून मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध चित्रकार व कवी दिनेश चव्हाण होते, तर उद्घाटक म्हणून उद्योजक व समाजसेवक डॉ. शांताराम कारंडे उपस्थित होते. यावेळी प्रवीण तुपे, प्रा. राजेंद्र सोनवणे, स्वप्निल डुकरे, तानाजी थोरात, जगदीश लाड, संदीप लिंगायत यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.

या स्पर्धेत वाशिम जिल्ह्यातून य. च. इंग्लिश हायस्कुल ही एकमेव शाळा सहभागी झाली होती. शाळेतील तब्बल १७३ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घेत उल्लेखनीय यश संपादन केले. वर्ग ५ ते ७ गटात ईश्वरी सतरोटे (प्रथम), इफराह शेख (द्वितीय), तेजस राठोड (तृतीय) तर वर्ग ८ ते १० गटात मधुरा रत्नपारखी (प्रथम), मनस्वी मनवर (द्वितीय), स्वानंदी भगत व अनुष्का ठोंबरे (तृतीय) यांनी यश मिळविले. विजेत्या विद्यार्थ्यांचा पालकांसह मान्यवरांच्या हस्ते मेडल, सन्मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. शाळेच्या मुख्याध्यापिका शारा राजन यांचाही यावेळी विशेष सन्मान करण्यात आला. या यशाचे श्रेय संस्थेचे अध्यक्ष सुभाषराव ठाकरे व सचिव चंद्रकांत ठाकरे यांना देण्यात आले.

# जिल्ह्यात संत्रा पिकातील मृगबहार पूर्वनियोजन व भूमी सुपोषण विषयक तांत्रिक प्रशिक्षण संपन्न

■ प्रतिनिधी | वाशिम ■

विदर्भातील वाशिम जिल्ह्याने संत्रा पिकाच्या गुणवत्तापूर्ण उत्पादनात तसेच लागवड क्षेत्रवृद्धीत विशेष ओळख निर्माण केली आहे. या यशामागे शेतकऱ्यांचे नियोजनबद्ध व्यवस्थापन, कृषी विभागाच्या विविध योजना तसेच कृषी विज्ञान केंद्राच्या तांत्रिक मार्गदर्शनाची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे.



जिल्ह्यात संत्रा पिकामध्ये मृग हंगामातील बहाराचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. या पार्श्वभूमीवर कृषी विज्ञान केंद्र, वाशिम उद्यानविद्या विभागाने भूमी सुपोषण अभियान अंतर्गत संत्रा पिकातील मृगबहारासाठी पूर्वनियोजन व भूमी सुपोषणाचे महत्त्व या विषयावर दि. १६ एप्रिल रोजी कृषी विज्ञान केंद्राच्या प्रक्षेत्रावर प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉक्टर आर्यन काळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटशेतीच्या माध्यमातून यशस्वी संत्रा उत्पादक शेतकरी विलासराव बोरकर (वडजी) हे उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून उद्यानविद्या तज्ज्ञ निवृत्ती पाटील यांनी मार्गदर्शन केले. तसेच व्यासपीठावर प्रगतिशील शेतकरी मोबीन शहा (सवड) व पुरुषोत्तम पाटील (धानोरा) यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

तांत्रिक सत्रात निवृत्ती पाटील यांनी यशस्वी मृगबहार व्यवस्थापनासाठी झाडावरील पानांची संख्या, प्रकाशसंश्लेषण क्षमता, झाडातील अन्नसाठा (कार्बोहायड्रेट संचय) यांचे महत्त्व स्पष्ट केले. योग्य अन्नसाठा निर्मितीसाठी संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापन, सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर, ओलीत व्यवस्थापन, वैज्ञानिक छाटणी तंत्रज्ञान, तसेच बहार धारणेसाठी आवश्यक पाण्याचा ताण याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

याशिवाय हवामानातील अनिश्चितता, उष्णतेची लाट, अवकाळी पाऊस, कीड व रोग प्रादुर्भाव यांसारख्या आपत्कालीन परिस्थितीत करावयाच्या प्रतिबंधात्मक व व्यवस्थापनात्मक उपाययोजनांबाबतही माहिती देण्यात आली.

# विद्युत वाहिनीच्या शॉर्ट सर्किटमुळे ज्वारीच्या पिकाला आग ; खरबी पिंप्रीतील शेतक-यांचे मोठे नुकसान

- एक एकर ज्वारी जळून खाक
- सिंचन साहित्यही जळाले
- तातडीने पंचनामा व नुकसानभरपाईची मागणी

■ प्रतिनिधी | मंगरूळपीर ■

तालुक्यातील खरबी पिंप्री येथे आज दि. २१ एप्रिल रोजी दुपारच्या सुमारास शेतातून गेलेल्या विद्युत वाहिनीवर झालेल्या शॉर्ट सर्किटमुळे भीषण आग लागून मोठे नुकसान झाले आहे. या आगीत येथील शेतकरी विठ्ठल ठाकरे व निलेश ठाकरे यांच्या शेतातील ज्वारीचे कापणी करून ठेवलेले पीक जळून खाक झाले. मिळालेल्या माहितीनुसार, अचानक विद्युत वाहिनीमध्ये ठिणग्या उडाल्याने शेतातील कोरड्या पिकाला आग लागली आणि काही वेळातच आगीने भीषण रूप धारण केले. स्थानिक शेतकरी व नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला, मात्र तोपर्यंत



सुमारे एक एकर क्षेत्रातील ज्वारीचे पीक जळून खाक झाले होते.

या घटनेमुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला असून त्यांच्यावर आर्थिक संकट निर्माण झाले आहे. ज्वारी हे प्रमुख रब्बी पीक असून, काढणी सुरू असताना झालेले हे नुकसान अत्यंत वेदनादायी असल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. याशिवाय, आगीमध्ये शेतातील सिंचनासाठी वापरण्यात येणारे प्लास्टिक पाईप, काही कृषी साहित्य जळून खाक झाली आहेत.

दरम्यान, संबंधित शेतकऱ्यांनी शासनाकडे तातडीने पंचनामा करून नुकसानाचे योग्य मूल्यमापन करून आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे. या प्रकारामुळे परिसरातील इतर शेतकऱ्यांमध्येही भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, शेतातून जाणाऱ्या विद्युत वाहिन्यांची नियमित तपासणी करून अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १४६ ■ गुरुवार, २३ एप्रिल २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# संपाचा बहाणा, साहेबांचा गायब खेळ : पाटबंधारे विभागात अराजकतेचा कळस

## -रिकाम्या खुर्च्या, सुरू लाईट-पंखे; विजेची उधळपट्टी आणि नागरिकांची फरफट

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा पाटबंधारे विभागात सध्या 'काम बंद, जबाबदारी संपली' अशीच परिस्थिती पाहायला मिळत असून संपाच्या आड लपून अधिकाऱ्यांनीच कर्तव्याला हरताळ फासल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. शासकीय कर्मचारी व शिक्षकांनी २१ एप्रिलपासून बेमुदत संप पुकारला असताना, या संधीचा गैरफायदा घेत अनेक अधिकारी कार्यालयात गैरहजर राहत असल्याचे 'ऑन द स्पॉट' पाहणीत बुधवारी समोर आले.

सिव्हील लाईन परिसरातील सिंचन भवन या पाटबंधारे विभागाच्या मुख्य कार्यालयात सकाळी सुमारे ११.३० वाजता पाहणी केली असता काही कर्मचारी उपस्थित दिसले; मात्र प्रमुख अधिकारीच गायब असल्याचे स्पष्ट झाले. कार्यकारी अभियंता नितीन गुप्ता यांच्यासह इतर अधिकारी त्यांच्या दालनात किंवा टेबलवर हजर नव्हते. 'साहेब कुठे असा प्रश्न विचारल्यावर नेहमीप्रमाणे दौऱ्यावर गेले आहेत, हेच जुने उत्तर नागरिकांना देण्यात येत होते. धक्कादायक बाब म्हणजे, अधिकाऱ्यांच्या रिकाम्या खुर्च्यांसमोर लाईट व पंखे सुरूच असल्याचे चित्र दिसून आले. एकीकडे राज्यभर ऊर्जाबचतीचे आवाहन केले जात असताना, सरकारी कार्यालयातच विजेची उघड उधळपट्टी होत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. साहेब नसले तरी वीज मात्र 'ड्युटी'वर अशी उपरोधिक प्रतिक्रिया नागरिकांतून उमटत आहे.





यापूर्वीच जलाशयांच्या पाणीसाठ्याची नियमित माहिती अद्ययावत न करण्याबाबत विभागावर टीका होत होती. त्यातच आता सांपकाळात अधिकारीही कार्यालयात न येण्याचा प्रकार समोर आल्याने विभागातील कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. परिणामी, विविध कामांसाठी येणाऱ्या नागरिकांना तासनतास प्रतीक्षा करावी लागत असून, त्यांच्या अडचणी वाढल्या आहेत.

सामान्य नागरिकांचा रोष दिवसेंदिवस तीव्र होत आहे. लोकसेवक म्हणून जबाबदारी पार पाडण्याऐवजी अधिकारीच बेपत्ता होत असतील, तर जनतेने न्याय कुणाकडे मागायचा असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री आणि जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ हस्तक्षेप करून संबंधित अधिकाऱ्यांना वठणीवर आणावे, अशी जोरदार मागणी होत आहे.

दरम्यान, या संदर्भात कार्यकारी अभियंता नितीन गुप्ता यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे संशयाचे धुके आणखी गडद झाले आहे.

### उधळपट्टीचा हिशेब द्या

वर्धा पाटबंधारे विभागाच्या सिंचन भवनात सुरू असलेल्या विजेच्या उधळपट्टीबाबत संताप वाढत आहे. रिकाम्या कार्यालयात दिवसभर लाईट व पंखे सुरू ठेवून वीज वाया घालवली जात असल्याने, या उधळपट्टीचा खर्च संबंधित अधिकाऱ्यांकडूनच वसूल करावा, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

# तस्करांचा धुमाकूळ; पुरवठा निरीक्षकांच्या वाहनाला धडक देत पलायन

## -सेलू-नागपूर मार्गावरील धानोली (मेघे) शिवारातील घटना

**वर्धा जनमाध्यम :** पेट्रोल-डिझेलच्या काळाबाजारा विरोधात कारवाईसाठी गेलेल्या तालुका पुरवठा निरीक्षण अधिकाऱ्यांच्या वाहनालाच धडक देत तस्करांनी पलायन केल्याची गंभीर घटना बुधवारी (ता. २२) सेलू-नागपूर मार्गावरील धानोली (मेघे) शिवारात घडली. या प्रकारामुळे इंधन तस्करीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पेट्रोल-डिझेलच्या टँकरमधून इंधन काढून त्याचा काळाबाजार केला जात असल्याची माहिती सेलू येथील तालुका पुरवठा निरीक्षण अधिकारी आचल बनगरे यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांनी तातडीने खासगी वाहनाने घटनास्थळ गाठण्याचा निर्णय घेतला. घटनास्थळाजवळ पोहोचताच त्यांनी परिस्थितीची नोंद ठेवण्यासाठी मोबाईलद्वारे चित्रिकरण सुरू केले.

दरम्यान, अधिकाऱ्यांच्या उपस्थितीची चाहूल लागताच तस्करांनी घाईघाईने घटनास्थळावरून पळ काढण्याचा प्रयत्न केला. नागपूरच्या दिशेने वेगाने निघालेल्या वाहनाने बेदरकारपणे मार्गक्रमण करताना बनगरे यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. या धडकेत त्यांच्या वाहनाचे काही प्रमाणात नुकसान झाले. तरीही तस्करांनी कोणतीही पर्वा न करता घटनास्थळावरून पलायन करण्यात यश मिळवले.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने शोधमोहीम हाती घेतली. मात्र आरोपींनी दिशाभूल करत वेगळ्या मार्गाने पळ काढल्याने त्यांना पकडण्यात अपयश आले. या घटनेमुळे प्रशासनाच्या कारवाईलाच आव्हान दिले जात असल्याचे स्पष्ट झाले आहे.

दरम्यान, या प्रकरणानंतर परिसरात खळबळ उडाली असून, पेट्रोल-डिझेलच्या बेकायदेशीर साठवणूक व विक्रीविरोधात अधिक कठोर कारवाईची मागणी पुढे येत आहे. संबंधित तस्करांचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून प्रयत्न सुरू असून, पुढील तपास सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार कारवाईसाठी धानोली (मेघे) परिसरात गेले असता इंधन चोरी करणाऱ्यांनी पळ काढताना माझ्या चारचाकी वाहनाला धडक दिली. यामध्ये वाहनाचे नुकसान झाले.
**-आचल बनगरे,** तालुका पुरवठा निरीक्षण अधिकारी, सेलू

# आर्वी-अमरावती मार्ग अंधारात; स्ट्रीट लाईटअभावी अपघातांचा धोका वाढला

**आर्वी जनमाध्यम :** शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते पॉलिटेक्निक कॉलेज दरम्यानच्या आर्वी-अमरावती मार्गावर स्ट्रीट लाईट नसल्याने नागरिकांना रात्रीच्या वेळी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. सुमारे वर्षभरापूर्वी या मार्गावर सिंगल फेज विद्युत लाईन टाकण्यात आली असली, तरी अद्याप स्ट्रीट लाईट बसविण्यात आलेले नसल्याने परिसर अंधारातच आहे.

हा मार्ग शहरातील प्रमुख आणि वर्दळीचा असून दररोज मोठ्या प्रमाणात विद्यार्थी, नागरिक व वाहनचालक ये-जा करतात. मात्र रात्रीच्या वेळी पुरेशा प्रकाशाची व्यवस्था नसल्याने अपघातांचा धोका वाढला आहे. त्यातच रस्त्याची अवस्था खराब असल्याने वाहन चालविताना नागरिकांना अधिक सावधगिरी बाळगावी लागत आहे. या संदर्भात १७ डिसेंबर २०२५ रोजी मुख्यमंत्र्यांकडे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने निवेदन देण्यात आले होते. मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. दरम्यान, प्रशासनाने या समस्येची तात्काळ दखल घेऊन स्ट्रीट लाईट बसवावेत, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. लवकर उपाययोजना न झाल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

# मेट्रो मार्गिका-५ अ, टप्पा एक आणि टप्पा दोनला मंजुरी - मुख्यमंत्री

### नागपूर-गोंदिया, भंडारा-गडचिरोली आणि नागपूर-चंद्रपूर ३ द्रुतगती महामार्ग प्रकल्पांना हुडकोकडून कर्ज घेण्यास मान्यता

**मुंबई जनमाध्यम :** राज्यातील पायाभूत सुविधा विकासाला गती देण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा विकास समितीच्या बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. मुंबई मेट्रो मार्गिका-५ अ (टप्पा १ व २) या एकूण १८,१३०.५५ कोटी रुपयांच्या प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली असून, विदर्भातील तीन द्रुतगती महामार्ग प्रकल्पांसाठी भूसंपादनाकरिता कर्ज उभारण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

मुंबई मेट्रो मार्गिका-५ अ हा सुमारे ३४.२१ किमी लांबीचा प्रकल्प असून त्यात १९ स्थानकांचा समावेश आहे. कापूरबावडी ते धामणकर नाका (टप्पा १) आणि धामणकर नाका ते दुर्गाडी (टप्पा २) असा या मार्गाचा विस्तार राहणार आहे. पुढे दुर्गाडी-कल्याण-उल्हासनगर असा विस्तार होणार असून, ठाणे, भिवंडी, कल्याण आणि उल्हासनगर परिसरातील सुमारे ६९ लाख नागरिकांना या प्रकल्पाचा लाभ होणार आहे. या मार्गामुळे प्रवासाचा वेळ ४० ते ५० टक्क्यांनी कमी होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

बैठकीत नागपूर-गोंदिया, भंडारा-गडचिरोली आणि नागपूर-चंद्रपूर या तीन द्रुतगती महामार्ग प्रकल्पांनाही चालना देण्यात आली. या प्रकल्पांसाठी आवश्यक भूसंपादनाकरिता हुडकोकडून कर्ज घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. नागपूर-गोंदिया महामार्गाची लांबी १६२.५७७ किमी असून अंदाजित खर्च सुमारे १९,५८२ कोटी रुपये आहे. भंडारा-गडचिरोली मार्ग ९४.२४१ किमी लांबीचा असून भूसंपादनासाठी ९३१ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. तर नागपूर-चंद्रपूर महामार्ग २०४.७९९ किमी लांबीचा असून त्यासाठी २,३५३ कोटी रुपयांच्या भूसंपादन खर्चाला मंजुरी देण्यात आली आहे. हे प्रकल्प नियोजित कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

याशिवाय, नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळा २०२७ साठी दुसऱ्या टप्प्यातील १०६३ कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधा कामांना मंजुरी देण्यात आली. यात वाहनतळ, पाणीपुरवठा, वीज व्यवस्था, आरोग्य सुविधा, घनकचरा व्यवस्थापन आणि नियंत्रण कक्ष उभारणीचा समावेश आहे.

या बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपी अखेर जेरबंद

## -नागपुरातून अटक, आणखी एकाचा सहभाग उघड

**सेलू जनमाध्यम :** बोर नदीपात्रात मृतदेह फेकून दिल्याच्या खळबळजनक खून प्रकरणात फरार असलेल्या आरोपीला सेलू पोलिसांनी अखेर जेरबंद करत तपासाला निर्णायक वळण दिले आहे. या कारवाईमुळे परिसरात काही दिवसांपासून निर्माण झालेल्या भीतीच्या सावटाला विराम मिळाला आहे.



दिनांक ११ एप्रिल २०२६ रोजी सौ. पुष्पा योगराज राऊत (रा. बेलगाव, ता. सेलू) यांनी पोलीस स्टेशन सेलू येथे धाव घेत आपल्या मुलगा प्रवीण राऊत याचा खून झाल्याची धक्कादायक तक्रार नोंदवली होती. आरोपी सूरज ढगे व फारूक करीम खान पठाण (दोघेही रा. बेलगाव) यांनी प्रवीणचा खून करून त्याचा मृतदेह बोर नदीपात्रात फेकून दिल्याचे त्यांनी फिर्यादीत नमूद केले होते.

या तक्रारीवरून पोलिसांनी अप. क्र. २८८/२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(३), २३८, ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणात आरोपी सूरज ढगे याला यापूर्वीच अटक करण्यात आली होती. मात्र दुसरा आरोपी फारूक पठाण हा घटनेनंतर फरार झाला होता. पोलिसांनी तांत्रिक तपास, माहिती जाळे आणि सतत पाठपुरावा करत अखेर २१ एप्रिल रोजी नागपूर येथून फारूक पठाण (वय ३२) याला ताब्यात घेत अटक केली.

दरम्यान, तपासादरम्यान या गुन्ह्यात आणखी एक आरोपी गणेश रमेश ढगे (वय २६, रा. बेलगाव रोड, सेलू) याचा सहभाग समोर आला. त्यालाही बेलगाव येथून अटक करण्यात आली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रितम निमगडे करीत आहेत.

ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली, सेलू पोलीस ठाण्याचे ठाणेदार देवेंद्र ठाकूर यांच्या नेतृत्वात पार पडली. या मोहिमेत पो.उपनि. प्रितम निमगडे यांच्यासह पोलीस कर्मचारी गणेश राऊत, जावेद धामिया व ज्ञानदेव वनवे यांनी मोलाची भूमिका बजावली.

# पुलगावजवळ भीषण अपघात; दाम्पत्यासह ६ वर्षीय मुलगी गंभीर

**वर्धा जनमाध्यम :** पुलगाव रेल्वे स्थानकाजवळ २० एप्रिलच्या सायंकाळी झालेल्या भीषण रस्ता अपघातात दुचाकीवरील दाम्पत्य व त्यांची लहान मुलगी गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. या अपघातामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

**भरधाव वाहनाची दुचाकीला धडक; तिघेही रुग्णालयात दाखल**

जखमींमध्ये गोपाल मोरेश्वर कठाणे (वय ४०), जयश्री कठाणे आणि आर्या कठाणे (वय ६) यांचा समावेश आहे. तिघांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते.

मिळालेल्या माहितीनुसार, विरुळ (आकाजी) येथील रहिवासी गोपाल कठाणे हे आपल्या पत्नी व मुलीसह एमएच-४९-एएफ-२५५८ क्रमांकाच्या दुचाकीने पुलगावकडे जात होते. दरम्यान, पुलगाव रेल्वे स्थानकाजवळ समोरून येणाऱ्या भरधाव एमएच-३२-एयू-३४१८ क्रमांकाच्या वाहनाने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता इतकी होती की, दुचाकीवरील तिघेही रस्त्यावर फेकले जाऊन गंभीर जखमी झाले. अपघात होताच परिसरातील नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत जखमींना मदत केली व त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. दरम्यान, या घटनेची नोंद पुलगाव पोलिस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

# आईच्या हत्येप्रकरणी मुलास जन्मठेप

## जिल्हा सत्र न्यायालयाचा निकाल; दंडही ठोठावला

**वर्धा जनमाध्यम :** आईची हत्या केल्याप्रकरणी आरोपी मोहन उर्फ सोपान वल्दे मुरलीधर पुसदकर याला जिल्हा सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. भादंवि कलम ३०२ अंतर्गत ही शिक्षा देताना न्यायालयाने आरोपीस दोन हजार रुपयांचा दंडही ठोठावला असून, दंड न भरल्यास एक वर्ष साध्या कारावासाची शिक्षा भोगावी लागणार आहे. हा निकाल जिल्हा न्यायाधीश-२ एस. जे. अंसारी यांनी दिला.

सरकारी पक्षाने मांडलेल्या माहितीनुसार, आरोपीचे गावातील एका महिलेसोबत अनैतिक संबंध होते. या संबंधांबाबत आई मिरा मुरलीधर पुसदकर वारंवार विरोध करत होती. संबंध तोडण्याचा सल्ला देत असल्याने आरोपीने राग मनात धरला होता.

२ फेब्रुवारी २०२४ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास आरोपीने घरात झोपलेल्या आईवर दगडी पाट्याने हल्ला करून तिची हत्या केली. घटनेनंतर घरात राहणारे प्रेमदास आत्राम यांनी दरवाजा ठोठावून योगिता चौधरी यांना जागे केले. त्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता मिरा पुसदकर या रक्ताच्या थारोळ्यात मृतावस्थेत आढळल्या. या प्रकरणी खरांगणा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक पोलिस निरीक्षक सदाशिव ढाकणे यांनी तपास पूर्ण करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. सुनावणीदरम्यान सरकारी वकील विनय आर. घुडे यांनी पुरावे व युक्तिवाद सादर केला. या प्रकरणात नऊ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद व सादर पुरावे विचारात घेऊन न्यायालयाने आरोपी दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली.


## ग्रा.प.धर्ती ता. कारंजा जि. वर्धा

### निविदा सुचना सन २०२६-०२७

**ग्रा.प. धर्ती पं.स. कारंजा (घा) जि. वर्धा येथे खालील काम मंजूर असून काम करण्याकरीता पंजीबध्द कंत्राटदाराकडुन लिफाफा बंद पध्दतीने पुर्ण कामाच्या निविदा (B1) मागविण्यात येत आहे. सदर निविदा ग्रामपंचायत कार्यालय दि.२३/४/०२६ ते दि.२९/४/०२६ या कालावधीमध्ये दुपारी ३:०० वाजेपर्यत कार्यालयीन वेळेत निविदा स्विकारण्यात येईल.**

| अ. क्र. | कामाचे नांव | योजनेचे नाव | प्राकलन किमत | निविदा फी | अनामत रक्कम | निविदा उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सामुहिक शौचालय बांधकाम करणे | स्वच्छ भारत मिशन ग्रामीण) Wm + १५ वित्त आयोग | २,९९,९४८/- | ५०० | २९९९/- | लगतच्या मासिक सभेमध्ये किंवा ग्रा.प.च्या सोयीनुसार |
| २ | सिमेंट कॉक्रीट बंधीस्त नाली | १५ वित्त आयोग | ३,००,०००/- | ५०० | ३०००/- | लगतच्या मासिक सभेमध्ये किंवा ग्रा.प.च्या सोयीनुसार |

**निविदेच्या अटी व शर्ती :-**

**१) अनुभवी पंजीबध्द व जीएसटी धारक कंत्राटदाराकडुन निविदा स्विकारण्यात येईल. २) कामाचे मुल्यांकन, टेस्ट रिपोर्ट व पुर्णत्वाचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर उपलब्ध निधीच्या प्रमाणात देयक अदा केले जाईल. ३) शासकीय नियमानुसार कपाती करुन देयक अदा करण्यात येईल. ४) निविदा फी व अनामत रक्कम पोचपावती सादर केल्याशिवाय निविदा ग्राह्य धरल्या जानार नाही. ५) निविदेसोबत नोंदणी प्रमाणपत्र, पॅन कार्ड, GST प्रमाणपत्र, मागील तीन वर्षाचे आयकर भरणा केल्याचे विवरण पत्र, काळ्या यादीत नाव समाविष्ट नसल्याबाबत स्वयंघोषणा पत्र सादर करणे बंधकारक राहील. ६) सदर कामाची निविदा नामंजूर / रद्द करण्याचा अधिकार ग्रा.प.धर्ती स्वतः कडे राखून ठेवत आहे. व त्याकरीता कुठल्याही प्रकारचे स्पष्टीकरण मागता येणार नाही. तसेच याबाबत कुठल्याही प्रकारचा पत्र व्यवहार केल्या जाणार नाही.**

सरपंच/सचिव
**ग्राम पंचायत धर्ती**

सरपंच
**ग्राम पंचायत धर्ती प.स. कारंजा (घा.), जि.प. वर्धा**

ग्रामपंचायत अधिकारी
**ग्रामपंचायत धर्ती पं.स.कारंजा (घा.), जि.प.वर्धा**



## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, माझे पक्षकार श्री. चेतनकुमार गौतम तायडे हे खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या मालमत्तेचे मालक आहेत: मौजा देवळी, तालुका देवळी, जिल्हा वर्धा येथील मौजा क्र. ७२, पी.एच. क्र. २१, वॉर्ड क्र. ७, फील्ड सर्व्हे क्र. २०९/२ (प्लॉट क्र. २४ मधून), घर क्र. ९३ असलेली जागा, एकूण क्षेत्रफळ १०८.०० चौ. मी. (११६२.०८ चौ. फूट) असून तिच्या सीमा खालीलप्रमाणे आहेत:

पूर्व : प्लॉट क्र. २५,
पश्चिम : प्लॉट क्र. २३,
उत्तर : प्लॉट क्र. ३१,
दक्षिण : ९ मीटर रस्ता (लेआउट),

सदर प्लॉट क्र. २४ हा श्री. किशोर रमेशराव गोमासे यांनी दिनांक ३०/१२/२०२५ रोजी दस्त क्र. ३०८८/२०२५ अन्वये श्री. चेतनकुमार गौतम तायडे यांच्या नावे विक्री केला असून त्यानुसार त्यांच्या नावाची नोंद संबंधित मालमत्तेवर करण्यात आलेली आहे.

तसेच माझ्या पक्षकारांचे मूळ लिंक विक्रीखत (सेल डीड) दिनांक १६/०६/२०२३, दस्त क्र. १७८७/२०२३ व मूळ लिंक विक्रीखत दिनांक २४/०४/२०१४, दस्त क्र. ७४५/२०१४ हे हरवलेले आहेत.

माझे पक्षकार श्री. चेतनकुमार गौतम तायडे यांनी मुथुट हाऊसिंग फायनान्स कंपनी लिमीटेड येथे कर्जासाठी अर्ज केलेला आहे.

म्हणून सर्व संबंधितांना जाहीर कळविण्यात येते की, वरील व्यवहाराबाबत कोणास काही हरकत असल्यास किंवा वरील नमूद मूळ लिंक विक्रीखत कोणास आढळल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संपर्क साधावा. अन्यथा कोणतीही हरकत ग्राह्य धरली जाणार नाही.

**ॲड. आर. आर. तिवारी**
**रामनगर, वर्धा**
**मो: ९९२२४२६१६८**



## वर्धा नगर परिषद, वर्धा
## हरकती / सुचना

क्र.१४२०/नपव/नरवि/एनओसी/२६
कार्यालय नगर परिषद, वर्धा
दिनांक २२.०४.२०२६

**डॉ.राजेंद्र डागा, बॅचलर रोड, रा.वर्धा यांनी मालमत्ता क्र. WARD ०००१४५६५ मध्ये लक्ष्मी हॉस्पीटल व्यवसाय करीता नगर परिषद, वर्धा चे ना-हरकत प्रमाणपत्र ची मागणी केली आहे.**

**ज्या कोणी व्यक्ती/संस्था यांना या संदर्भात काही हरकती/सुचना असल्यास त्या नगर परिषद, वर्धा चे कार्यालयात ७ (सात) दिवसात लेखी स्वरुपात सादर कराव्यात. अन्यथा आपला काही आक्षेप नाही असे गृहित धरुन त्यांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.**

स्वाक्षरी/-
मुख्याधिकारी,
नगर परिषद, वर्धा

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## एसटीच्या रस्ता सुरक्षा अभियाना’साठी रितेश-जेनेलिया देशमुख ब्रँड ॲम्बेसेडर



**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) व परिवहन विभागामार्फत राबविण्यात येणा-या रस्ता सुरक्षा अभियानाच्या जनजागृती उपक्रमाला अधिक बळकटी देण्यासाठी अभिनेते रितेश देशमुख आणि अभिनेत्री जेनेलिया देशमुख यांची पुढील पाच वर्षांसाठी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत या नियुक्तीचा करार हस्तांतरण पार पडला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच परिवहन मंत्री व एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. एसटी महामंडळाच्या विविध जनजागृती मोहिमा अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचाव्यात, तसेच परिवहन विभागाच्या रस्ता सुरक्षा अभियाना ची परिणामकारकता वाढविणे हा या नियुक्तीमागील प्रमुख उद्देश आहे. रस्ता सुरक्षा, प्रवासी जनजागृती आणि सामाजिक संदेशांच्या प्रसारासाठी या दोन्ही कलाकारांचा सहभाग महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

## मिशन लक्ष्यवेध अंतर्गत क्रीडा प्रतिभा चाचणी अर्जांची अंतिम तारीख 28 एप्रिल

**मुंबई** : क्रीडा व युवक सेवा संचालनालयामार्फत मिशन लक्ष्यवेध अंतर्गत मुंबई शहर जिल्हास्तरीय क्रीडा प्रतिभा विकास केंद्राच्या निवड प्रक्रियेसाठी २८ एप्रिल २०२६ पर्यंत https://forms.gle/ix76WxCTeTtZFH6R8 या लिंकवर अथवा missionlakshyavedhmumcity@gmail.com या ईमेलवर करावे, अशी माहिती मुंबई शहर जिल्ह्याच्या जिल्हा क्रीडा अधिकारी निलिमा अडसूळ यांनी दिली आहे. या उपक्रमाचा मुख्य उद्देश जिल्ह्यातील गुणवंत खेळाडूंना उच्च दर्जाचे प्रशिक्षण, आवश्यक सुविधा व मार्गदर्शन उपलब्ध करून देत राज्य, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणारे खेळाडू घडवणे हा आहे. या उपक्रमांतर्गत शुटींग, टेबल टेनिस व वेटलिफ्टींग या क्रीडा प्रकारांसाठी जिल्हास्तरावर निवड चाचणी आयोजित करण्यात येत आहे. या निवड चाचण्यांसाठी २१ वर्षांखालील खेळाडू पात्र ठरणार असून, जिल्हास्तर पदक प्राप्त व विभागस्तर, राज्यस्तर, राष्ट्रीयस्तर स्पर्धा सहभाग घेतलेले इच्छुक खेळाडुंनी आपला अर्ज ऑनलाईन पद्धतीने सादर करावा, असे आवाहन मुंबई शहर जिल्ह्याच्या जिल्हा क्रीडा अधिकारी नीलिमा अडसूळ यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी निलेश गराटे -(९७०२२१२९२५), साहिल उत्नेकर-(९७०२१७१००४), समृद्धी देवळेकर -(८७७९७२७५७१) यांच्याकडे संपर्क साधावा.

## विशाल, अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन 18 प्रस्तावांना मुख्यमंत्र्यांची मंजुरी

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित करून रोजगारनिर्मितीला चालना देण्यासाठी तब्बल २,५६,१३७.०१ कोटींच्या १८ विशाल व अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहन देण्यास मान्यता देण्यात आली. यामुळे सुमारे १ लाखांहून अधिक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीची १४ वी बैठक झाली. बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उद्योग व मराठी भाषा मंत्री डा.उदय सामंत, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, उर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डा.पी.अन्बळगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलारासू तसेच विकास आयुक्त दिपेंद्रसिंह कुशवाह उपस्थित होते. या बैठकीमध्ये थ्रस्ट सेक्टर तथा उच्च तंत्रज्ञानावर आधारित सोलर सेल, माडयुल, इग्नाट, वेफर्स, ग्रीन स्टील, हरित अमोनिया, इलेक्ट्रानिक्स उत्पादने, अवकाश व संरक्षण साहित्य, लिथियम आयन बॅटरी, इलेक्ट्रीक वाहन निर्मिती/साहित्य, स्टील व गॅस टू केमिकल निर्मितीचे विशाल व अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहने मंजूर करण्यासाठीच्या १८ प्रस्तावांना मुख्यमंत्री फडणवीस यांनी मान्यता दिली. यामध्ये नाशिकमधील व्हर्च्युओसो काम्प्रेसर्स प्रा. लि. ८०० कोटींची गुंतवणूक करून ५०० जणांना रोजगार देणार आहे. अमरावती येथे टेंबो डिफेन्स प्रोडक्ट प्रा. लि.१,००० कोटीं गुंतवणूक करत आहे. तर छत्रपती संभाजीनगरमधील नायडेक ग्लोबल अप्लायन्सेस इंडिया प्रा. लि. १,००० कोटींची गुंतवणूक करून १००० नवीन रोजगार निर्माण करेल.पुण्याच्या शिरूर भागात जबिल सर्किट इंडिया प्रा. लि. १५०० कोटींच्या गुंतवणुकीतून ३००० लोकांना संधी देणार आहे.गडचिरोली सारख्या नक्षलग्रस्त भागात हरिओम पाईप इंडस्ट्रीज लि. ३,१३५ कोटींची गुंतवणूक करून ८००० जणांना रोजगार देणार आहे.अहिल्यानगरमध्ये निबे स्पेस ४,००० कोटींच्या गुंतवणुकीसह १००० रोजगार निर्माण करेल. पुण्याच्या तळेगाव भागात युरोबस इंडिया प्रा. लि. ४,२०० कोटींची गुंतवणूक आणि १२,००० रोजगार निर्मिती करेल. चंद्रपूरमध्ये मिलीयन स्टील प्रा. लि. २५६.०१ कोटींच्या गुंतवणुकीतून ३६० रोजगार देणार आहे.

## पीसीएम-पीसीबी विद्यार्थ्यांना दुस-या प्रयत्नासाठी नोंदणीकरिता 23 एप्रिलपर्यंत मुदतवाढ

**मुंबई/प्रतिनिधी :** पीसीएम आणि पीसीबी गटातील विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचा दिलासादायक निर्णय घेत दुस-या प्रयत्नासाठी नोंदणी करण्याची अंतिम मुदत २३ एप्रिल २०२६ पर्यंत वाढवण्यात आली आहे. विद्यार्थ्यांकडून सातत्याने येणा-या विनंत्यांचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली. या निर्णयानुसार, इच्छुक विद्यार्थ्यांना २३ एप्रिल २०२६ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत नोंदणी करता येणार आहे. यामुळे विविध कारणांमुळे पूर्वी नोंदणी न करू शकलेल्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, ही त्यांच्यासाठी सुवर्ण संधी ठरणार आहे.विद्यार्थ्यांनी या मुदतवाढीचा लाभ घेण्यासाठी विलंब न करता तात्काळ नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले आहे. नोंदणीसाठी अधिकृत संकेतस्थळ : https://cetcell.mahacet.org

# मेट्रो मार्गिका-५ अ, टप्पा एक आणि टप्पा दोनला मंजुरी -मुख्यमंत्री

■ नागपूर–गोंदिया, भंडारा–गडचिरोली आणि नागपूर–चंद्रपूर तीन द्रुतगती महामार्ग प्रकल्पांना हुडकोकडून कर्ज घेण्यास मान्यता

■ नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या नियोजनाची कामे गतीने करा



**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई मेट्रो मार्गिका-५ अ, टप्पा एक आणि टप्पा दोन अशा एकूण १८,१३०.५५ कोटी रु पयांच्या कामांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजुरी दिली. नागपूर-गोंदिया, भंडारा-गडचिरोली आणि नागपूर-चंद्रपूर या तीन महत्त्वाकांक्षी द्रुतगती महामार्गांच्या कामांच्या भूसंपादनासाठी लागणारे कर्ज हुडकोकडून घेण्यास तसेच नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा २०२७ साठी टप्पा २ मधील १०६३ कोटी रूपयांच्या कामांच्या प्रस्तावाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंजूरी दिली.

मंत्रालयात मंत्रीमंडळ पायाभूत सुविधा विकास समितीच्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, उद्योग मंत्री डा. उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी.गुप्ता यासह वरिष्ठ अधिकारी बैठकीला उपस्थित होते.

### मुंबई मेट्रो मार्गिका-५ अ, टप्पा एक आणि टप्पा दोनचा सुमारे ६९ लाख लोकांना फायदा होणार

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुंबई मेट्रो मार्गिका-५ अ, टप्पा एक आणि टप्पा दोन अशा एकूण १८,१३०.५५ कोटी रु पयांच्या कामांना मंजूरी देण्यात आली. या मार्गिकेची लांबी ३४.२१ किमी आहे, ज्यामध्ये १९ स्थानकांचा समावेश आहे. टप्पा १ कापूरबावडी ते धामणकर नाका, टप्पा २ धामणकर नाका ते दुर्गाडी, मार्गिका ५अ दुर्गाडी - कल्याण - उल्हासनगर या प्रकल्पामुळे ठाणे, भिवंडी, कल्याण आणि उल्हासनगर या भागातील सुमारे ६९ लाख लोकांना फायदा होणार असून प्रवास वेळेत ४०-५०5 बचत होईल. या प्रकल्पासाठीच्या आवश्यक परवानगीसाठी केंद्र शासन व संबधित विभागाकडे गतीने कार्यवाही करावी.

### तीन द्रुतगती महामार्ग प्रकल्पांचे ‘प्रकल्प कार्यान्वित करण्याचे वेळापत्रक’ निश्चित करण्याच्या सूचना

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने नागपूर-गोंदिया, भंडारा-गडचिरोली आणि नागपूर-चंद्रपूर या तीन द्रुतगती महामार्ग या प्रकल्पांचे ’प्रकल्प कार्यान्वित करण्याचे वेळापत्रक’ निश्चित करण्याच्या सुचना तसेच निविदा प्रसिद्धी, निविदा अंतिम करणे आणि प्रकल्प पूर्णतेचा कालावधी निश्चित करावा. या प्रकल्पांसाठी आवश्यक असलेल्या भूसंपादनाकरिता हुडकोकडून कर्ज उभारण्याच्या प्रस्तावावर वित्त विभागाशी समन्वय साधून तातडीने मार्ग काढावा. विदर्भातील दळणवळण आणि उद्योगांना चालना देण्यासाठी हे प्रकल्प अत्यंत महत्त्वाचे असल्याने सहा वर्षात हे प्रकल्प पूर्ण होण्यासाठी कार्यवाही करावी.

नागपूर-गोंदिया द्रुतगती महामार्ग या महामार्गाची एकूण लांबी १६२.५७७ कि.मी. असून, प्रकल्पाची एकूण अंदाजित किंमत १९,५८२.१९ कोटी रुपये आहे. या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी ३,१६२.१८ कोटी रु पयांच्या खर्चास, भंडारा-गडचिरोली द्रुतगती महामार्ग ९४.२४१ कि.मी. लांबीच्या या प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी ९३१.१५ कोटी रूपये, नागपूर-चंद्रपूर द्रुतगती महामार्ग हा प्रकल्प २०४.७९९ कि.मी. लांबीचा असून याच्या भूसंपादनासाठी २,३५३.९४ कोटी रु पयांच्या प्रशासकीय खर्चाला मंजुरी देण्यात आली.नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी १०६३ कोटी रूपयांच्या कामांच्या प्रस्तावाला मंजूरीमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की,नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी येणा-या भाविकांना उत्तम सोयी-सुविधा मिळण्यासाठी प्रस्तावित पायाभूत सुविधांची कामे गतीने करावीत. भाविकांसाठी वाहनतळ , पाणीपुरवठा, विद्युतविभाग, आरोग्य विभाग, घनकचरा व्यवस्थापन, मुख्य नियंत्रण कक्ष यासाठी १०६३ कोटी रू पयांच्या कामांचे प्रस्तावाला मंजूरी देण्यात आली असून ही कामे गतीने पूर्ण करावीत.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे अपर मुख्य सचिव मिलींद म्हैसकर, नगरविकासचे डा.एच गोविंदराज, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डा. संजय मुखर्जी, कुंभमेळा विकास प्राधिकरणचे आयुक्त शेखर सिंह यावेळी उपस्थित होते.

## केंद्र सरकारच्या मिशन कर्मयोगी अंतर्गत आयोजित ‘साधना सप्ताह 2026’मध्ये महाराष्ट्र अव्वल

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून अधिकारी–कर्मचा–यांचे कौतुक

**मुंबई/प्रतिनिधी :** केंद्र सरकारच्या मिशन कर्मयोगी-अंतर्गत आयोजित साधना सप्ताह २०२६ मध्ये राज्याने देशात प्रथम क्रमांक पटकावत नवा मानदंड प्रस्थापित केला असून या अध्ययन सप्ताहात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील या उपक्रमात सहभागी अधिकारी व कर्मचा-यांचे अभिनंदन करत, या सर्वांच्या प्रयत्नाचे कौतुक केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्ञानोपासना, क्षमताविकास आणि उत्तम सार्वजनिक सेवा देण्याच्या दृष्टीने मिशन कर्मयोगी हे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि पाठबळ उपलब्ध करून दिल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचेही आभार मानले आहेत. महाराष्ट्रातील अधिकारी- कर्मचा-यांनी आयगड्ट कर्मयोगी-प्लॅटफार्मवर एकूण ४६ लाख ९४ हजार ५९७ अभ्यासक्रम पूर्ण करत ६ लाख ५९ हजार ७५९ एआय-विशिष्ट प्रमाणपत्रे प्राप्त केली आहेत. हे आधुनिक सुशासन आणि क्षमता विकासाबाबत राज्याच्या दृढ वचनाबद्धतेचे द्योतक, असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले आहे.

देशभरातील सुमारे ३३ लाख ४ हजार शासकीय अधिकारी- कर्मचा-यांनी साधना सप्ताहात सहभाग घेत आयगाट कर्मयोगी-प्लॅटफार्मवर सुमारे चार तासांचा अभ्यासक्रम पूर्ण केला. यामध्ये राज्यातील ५ लाखांहून अधिक अधिकारी - कर्मचारी सहभागी झाले होते. या उपक्रमात महाराष्ट्राने केलेली कामगिरी ही राज्याच्या प्रशासनिक कार्यक्षमतेचा उत्कृष्ट नमुना असल्याचेही मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी नमूद केले.

## एल-निनोचा प्रभाव लक्षात घेउन पाणी जपून वापरा–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### धरणांमध्ये गतवर्षीच्या तुलनेत 101.77 टीएमसी अधिकचा पाणीसाठा

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील विविध धरणांमध्ये सुमारे ६५३.६३ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध असल्याची माहिती राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत देण्यात आली.गतवर्षीच्या तुलनेत यंदा १०१.७७ टीएमसी पाणीसाठा अधिकचा आहे. गतवर्षी हा साठा ५५१.८६ टीएमसी होता. मात्र यंदा एल निनोच्या प्रभावामुळे पावसाच्या अनियमततेमुळे पुढील वर्षी टंचाईचा मुकाबला करता यावा, यासाठी पाणी जपून वापरा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

जलसंपदा विभागाचे अतिरिक्तमुख्य सचिव दीपक कपूर यांनी सादरीकरणाद्वारे राज्यातील सर्व धरणांतील पाणीसाठा आणि एल-निनो प्रभावामुळे संभाव्य परिणामांची माहिती दिली. एल-निनोच्या प्रभावामुळे पाणीसाठ्यात २०१४ मध्ये १२ टक्के तर २०१५ मध्ये सुमारे १४ टक्के घट झाली होती. त्यामुळे दोन्ही वर्षी पाणीटंचाई निर्माण झाली होती. १५ ऑक्टोबर २०१४ रोजी ८७२ टीएमसी तर याच दिवशी २०१५ ला ६२५ टीएमसी पाणीसाठा होता. त्या तुलनेत २०२५ मध्ये १५ ऑक्टोबरला १३३०.९७ टीएमसी पाणीसाठा होता. हा पाणीसाठा २१ एप्रिल २०२६ रोजी ६५३.६३ टीएमसी आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा सुमारे १०१.७७ टीएससी पाणीसाठा अधिकचा आहे. यावर राज्यातील पाणीसाठ्याचे काटेकोर नियोजन करून ऑगस्ट २०२६ अखेर पिण्यासाठी पाणी उपलब्ध राहण्याच्या दृष्टीने काटकसरीच्या उपायोजनांची अंमलबजावणी करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

त्यासोबतच एल-निनोच्या प्रभावामुळे या वर्षी पाउस कमी होण्याची शक्यता असल्याने पुढील वर्षी पुरेसे पाणी उपलब्ध व्हावे या दृष्टीने आतापासून पाण्याचा जपून वापर करण्याचे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

राज्यातील प्रमुख धरणांतील पाणीसाठा : यंदाचा उपयुक्त पाणीसाठा, गतवर्षीचा पाणीसाठा (टिएमसीमध्ये) या क्रमाने -कोयना : ३३.६२, ३६.७६ . जायकवाडी : ४२.०३, ३४.४४. उजनी : १३.३९, (०) पेंच प्रकल्प समूह : २६.५७, २६.३५. इसापूर : २१.४५, १७.८२. भातसा : १५.७०, १४.९१. गोसीखुर्द : १४.३१, ५.९३. खडकवासला धरण समूह : ११.३२, ९.८२. मुळा : ९.५४, १०.५३. अप्पर वर्धा : १०.२१, ९.५३. अप्पर वैतरणा : ६.५२, ५.९५, भंडारदरा : ५.२५, ६.०४ टीएमसी.

### उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## सात आदर्श महाविद्यालयांमधील शिक्षकांना यूजीसीच्या निर्देशानुसार मूळ वेतन

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील सात आदर्श महाविद्यालयातील शिक्षकांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार मूळ वेतन, देण्याचा तसेच या शिक्षकांना उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पद भरतीमध्ये अतिरिक्तगुण देण्यासह, आर्थिक तरतुदींना मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

केंद्र सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाने देशातील ज्या जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय नोंदणी दरापेक्षा कमी विद्यार्थी नोंदणी असलेल्या प्रत्येक जिल्ह्यात एक आदर्श महाविद्यालय सुरू करण्याची योजना अकराव्या पंचवार्षिक योजनेत सुरू केली. पहिल्या टप्प्यात निवडण्यात आलेल्या ९० जिल्ह्यांमध्ये महाराष्ट्रातील सात जिल्ह्यांचा समावेश करून, तिथे आदर्श महाविद्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार जालना जिल्ह्यात घनसांवगी (ड?. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्याशी संलग्न), बुलढाणा (संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती), रायगड जिल्ह्यात श्रीवर्धन (श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई), हिंगोली (स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड), गडचिरोली (गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली), रत्नागिरी जिल्ह्यात आंबवडे आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात तळेरे येथे (मुंबई विद्यापीठ मुंबई, संलग्न) अशी सात आदर्श महाविद्यालये कार्यरत आहेत.या महाविद्यालयांमधून ४३ अभ्यासक्रम शिकवले जातात. त्यासाठी सुमारे २ हजार ५१० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला गेला आहे. यासाठी १३४ शिक्षक तासिका तत्त्वावर आणि ६१ शिक्षकेतर पदांवर कर्मचारी ठोक वेतनावर कार्यरत आहेत. या कर्मचा-यांनी सेवेत कायम करण्याबाबत न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या. यातील याचिकावरील न्यायालयाच्या निर्णयानुसार उच्च व तंत्रशिक्षण विभागाने या शिक्षकांना विद्यापीठ अनुदान आयोगाने निश्चित केलेल्या सहायक प्राध्यापकांचे मूळ वेतन अधिक महागाई भत्ता देण्याचा आणि या शिक्षकांना उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या भरतीमध्ये अतिरिक्त दहा गुण देण्याचा प्रस्ताव सादर केला. या प्रस्तावासह, या सात महाविद्यालयांना अनुभवी प्राध्यापक मिळावेत यासाठी प्रत्येकी एक प्राचार्य व मानद प्राध्यापक नियुक्तीच्या धोरणास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. तसेच महाविद्यालयांतील शिक्षकांना विद्यार्थी संख्येच्या वाढीच्या गुणोत्तरानुसार तसेच केंद्राकडून मिळणारा अनुदानाचा हिस्सा वगळता, द्यावयाच्या राज्याच्या हिश्श्याची तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली.

## महाराष्ट्र राज्य कॉम्प्रेस्ड बॉयोगॅस धोरण (सीबीजी), 2026 जाहीर

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य काम्प्रेस्ड बायोगॅस धोरण,२०२६ राबविण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या धोरणाच्या अंमलबजावणीमुळे शहरांतील कच-याची विल्हेवाट पर्यावरणपूरक पध्दतीने लावणे शक्य होणार आहे. त्याचबरोबर कचरा साठविण्यामुळे निर्माण होणा-या विविध समस्या, पाण्याच्या स्त्रोतांचे प्रदूषण कमी होईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी २०२६-२७ या वर्षासाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच काम्प्रेस्ड बॉयोगॅसच्या गरजेनुरूप वापरण्यायोग्य गॅस उपलब्ध होण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान वापरून प्रकल्प उभारण्यास मान्यता देण्यात आली. धोरणांच्या अंमलबजावणीसाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती स्थापन करण्यात येणार आहे. प्रकल्प पीपीपी आणि हायब्रिड ॲन्युएटी तत्वावर राबविण्यात येणार आहे. हे धोरण कच-याचे उर्जा आणि खतामध्ये रूपांतर करून रोजगार आणि संपत्ती निर्माण करणारे आहे. राज्याच्या नागरी भागातील कच-याचे विलगीकरण, संकलन, प्रक्रिया आणि स्वच्छ उर्जेत रुपांतर करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना सक्षम करणे धोरणाचा उद्देश आहे. या धोरणाव्दारे काम्प्रेस्ड बायोगॅसच्या उत्पादनास आणि घनकचरा व्यवस्थापन यंत्रणेच्या एकत्रीकरणास प्रोत्साहन दिले जाणार आहे. यामुळे घनकच-याची विल्हेवाट लावण्यासाठी वापरण्यात येणा-या जागेवरील भार कमी होईल, सार्वजनिक आरोग्यात सुधारणा होईल आणि हरितगृह वायुचे उत्सर्जन कमी झाल्यामुळे वातावरणाची गुणवत्ता वाढीस लागेल. जमीनीचा -हास, वायु प्रदूषण, ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी नागरी कचरा आणि कृषी कचरा स्त्रोतांवर क?म्प्रेस्ड बॉयोगॅस उपक्रमांना प्रोत्साहन देणे, धोरणाचा मुख्य उद्देश आहे. या धोरणामुळे उर्जा आणि आयात घट होईल. जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी होउन, कार्बन उत्सर्जनात घट, वाहतूक, औद्योगिक आणि घरगुती क्षेत्रासाठी स्वच्छ इंधनाचा पर्याय उपलब्ध होईल. शाश्वत कचरा व्यवस्थापन नागरी सेंद्रीय घनकचरा, शेतातील अवशेष, पशुधन कचरा, इतर जैवविघटनशील कचरा उघड्यावर जाळण्याला अटकाव होउन प्रदूषण कमी होईल.

## वसुंधरा दिनानिमित्त वसुंधरा रक्षक अभियान, महा आरपीईटी अभियानाचा शुभारंभ

### पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येक नागरिकांने वसुंधरा रक्षकाची भूमिका बजावावी – पंकजा मुंडे



**मुंबई/प्रतिनिधी :** वाढते प्रदूषण, बदलते हवामान आणि वेगाने होणारे शहरीकरण याच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येक नागरिकाने वसुंधरा रक्षक म्हणून पुढे यावे, असे आवाहन राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी केले. वसुंधरा रक्षक ही संकल्पना केवळ उपक्रम नसून एक जनआंदोलन बनवण्याचा संकल्प त्यांनी यावेळी व्यक्त केला. जागतिक वसुंधरा दिनानिमित्त राज्य शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातर्फे आयोजित समारंभात पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते वसुंधरा रक्षक अभियान २०२६, महा-आरपीईटी अभियान, राज्य वातावरणीय कृती कक्षाच्या संकेतस्थळाचे अनावरण तसेच इमिशन ट्रेडिंग स्कीम प्रशिक्षणाचा शुभारंभ करण्यात आला. वसुंधरा रक्षक अभियानाच्या लोगोचेही यावेळी अनावरण करण्यात आले. या लोगोची निर्मिती स्वतः मंत्री पंकजा मुंडे यांनी तयार केली आहे.यावेळी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम आणि विभागाच्या सचिव जयश्री भोज यांच्यासह कोकाकोला कंपनीचे वरिष्ठ अधिकारी, विविध संस्थांचे प्रतिनिधी तसेच विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी उपस्थित होते.वसुंधरा रक्षक या संकल्पनेला मातृत्वाची जोड देत मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या की, वसुंधरा म्हणजे केवळ पृथ्वी नव्हे, तर आपली आई आहे. तिचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. विकास, औद्योगिकीकरण आणि जागतिकीकरणाबरोबर प्रदूषणही वाढत आहे. त्यामुळे संतुलित विकासाचा मार्ग स्वीकारत पर्यावरण रक्षणासाठी ठोस पावले उचलावी लागतील.वसुंधरा रक्षक अभियानाच्या माध्यमातून राज्यभर छत्रपती शिवाजी महाराजांच्या मावळ्यांसारखे वसुंधरा वारियर्स तयार केले जाणार आहेत. गावागावांत, वार्डावार्डात ही चळवळ पोहोचली पाहिजे. हे रक्षक प्रदूषणाविरुद्ध लढतील. प्रत्येक नागरिकाने झाडे लावणे, कचरा वर्गीकरण, प्लास्टिकचा वापर कमी करणे अशा कृतींमधून सर्व नागरिकांनीही वाटा उचलावा, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. प्रदूषणाचा परिणाम प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय त्याची तीव्रता जाणवत नाही. लोकांच्या आरोग्यावर होणारे परिणाम पाहून बदलाची गरज अधिक प्रकर्षाने जाणवत असल्याचे सांगून आजच्या पिढीला पर्यावरणातील बदल समजावून सांगण्यासाठी आज-काल-उद्या या संकल्पनेवर आधारित माहिती आणि डेटा उपलब्ध करून दिला जाईल. आजची पिढी तंत्रज्ञानात पुढे आहे; मात्र पर्यावरणाची जाणीवही तितकीच महत्त्वाची आहे. पुढच्या पिढीला संपत्ती नव्हे, तर स्वच्छ हवा आणि पाणी देणे ही आपली जबाबदारी आहे. महा-आरपीईटी अभियानाबाबत मंत्री पंकजा मुंडे यांनी प्लास्टिक कच-याच्या पुनर्वापरावर भर देत रिड्यूस, रियूज, रिसायकल आणि रिथिंक या तत्वांचा अवलंब करण्याचे आवाहन केले. अनावश्यक पॅकेजिंग कमी करणे, वस्तूंचा पुनर्वापर करणे आणि पुनर्निर्मितीला प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे. प्लास्टिकच्या बाटल्या गोळा करून त्याचा उत्पादकांकडून पुन्हा वापर करण्याची संकल्पना पर्यावरणपूरक आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आहे. राज्यात या प्रकारचा उपक्रम राबवणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याचेही त्यांनी नमूद केले.औद्योगिक प्रदूषण नियंत्रणासाठी राबविण्यात येणा-या उत्सर्जन व्यापार योजना इमिशन ट्रेडिंग स्कीमबाबत मंत्री मुंडे यांनी सांगितले की, कार्बन ट्रेडिंगप्रमाणेच सल्फर डायऑक्साईड उत्सर्जन नियंत्रणासाठी ही योजना महत्त्वाची आहे. उद्योगांनी उत्सर्जन कमी करण्यासाठी परस्पर सहकार्याचा मार्ग स्वीकारल्यास पर्यावरण संरक्षणाला चालना मिळेल.

## कमाल जमीन धारणा मर्यादा नियमातील जमिनीच्या भोगवटादार रूपांतरणाच्या अधिमूल्याची पुनर्रचना

**मुंबई/प्रतिनिधी :**महाराष्ट्र शेतजमीन (ज.धा.क.म.) अधिनियम, १९६१ नुसार वाटप करण्यात आलेल्या जमिनींचे भोगवटादार वर्ग-२ मधून वर्ग-१ मध्ये रुपांतरण करण्याकरीता अधिनियमामध्ये सुधारणा करण्यास व त्यासाठीच्या महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) (भोगवटादार वर्ग-२ चे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रूपांतरण करणे) नियम, २०२६ ला मान्यता देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निर्णयामुळे राज्यातील आतापर्यंत वाटप करण्यात आलेल्या १ लाख ७३ हजार ५६०.४ हे. आर जमिनीशी संबंधित १ लाख ९ हजार ८६८ लाभार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.

महाराष्ट्र शेतजमीन (ज.धा. क. म.) अधिनियम, १९६१ च्या कलम २१ अन्वये अतिरिक्तठरवून शासन जमा करण्यात आलेल्या जमिनी भूमिहिन, माजी सैनिक व इतर दुर्बल घटक (अनुसूचित जाती जमाती) यांना शेतीसाठी वर्ग-२ च्या जमिनी म्हणून सुमारे ४०-५० वर्षांपूर्वी वाटप करण्यात आलेल्या आहेत. या जमीनधारकांना या जमिनींचा बिगर शेती कारणांसाठी वापर करता येत नव्हता. तसेच अशा जमिनीचे हस्तांतरण करताना प्रत्येक वेळी जिल्हाधिकारी यांची पुर्वपरवानगी घेवून अनार्जित रक्कम (५० / ७५ टक्के) भरावी लागत असे. तरीही या जमिनी वर्ग -२ मध्येच राहत असत. या अडचणी लक्षात घेवून आता महाराष्ट्र शेतजमीन (ज.धा.क.म.) अधिनियम, १९६१ च्या कलम २७ अन्वये वाटप करण्यात आलेल्या जमिनींचे भोगवटादार वर्ग-२ भोगवटादार वर्ग-१ मध्ये रु पांतरण करण्याकरिता या अधिनियमामध्ये सुधारणा करण्यात येत आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) (भोगवटादार वर्ग-२ चे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रू पांतरण करणे) नियम, २०२६ च्या प्रारूपाला मंत्रिमंडळाने मान्यता दिली असून अशा रूपांतरणासाठी अधिमूल्य आकारणीसही मंजुरी दिली आहे. यात महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ च्या कलम २७ नुसार भोगवटादार वर्ग-२ ज्या जमिनी हस्तांतरित न केलेल्या व हस्तांतरित केलेल्या, अशा जमिनींचे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रूपांतरणासाठी प्रदेय असलेले रू पांतरण अधिमूल्य पुढीलप्रमाणे मान्यता देण्यात आली आहे :- वाटपानंतर हस्तांतरण न केलेल्या जमिनींसाठी रेडिरेकनर नुसार (वार्षिक दर विवरणाप्रमाणे परिगणना) किंमतीच्या शहरी भागासाठी ३० टक्के आणि ग्रामीण भागासाठी २५ टक्के. वाटपानंतर हस्तांतरण झालेल्या, वापरात बदल झालेल्या जमिनींसाठी रेडिरेकनच्या किंमतीनुसार शहरी भागात येणा-या जमिनींकरिता शेती वापरासाठी ३० टक्के, बिगर शेतीसाठी २५ टक्के आणि ग्रामीण भागातील जमिनीसाठी शेती वापरासाठीच्या २५ टक्के आणि बिगर शेती वापरासाठी २० टक्के दराने अधिमुल्य आकारले जाणार आहे. रेडिरेकनर नुसार निर्धारित केलेल्या जमिनीचे बाजारमूल्य पन्नास लाखापर्यंत रक्कम असेल अशी प्रकरणे जिल्हाधिकारी यांच्यास्तरावर मान्यतेस्तव ठेवता येणार आहेत. तर पन्नास लाखांपेक्षा अधिक मूल्यांकन असलेल्या प्रकरणांमध्ये जिल्हाधिकारी यांना शासनाची मान्यता घ्यावी लागणार आहे.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# आर्थिक दहशतवाद

अमेरिका आणि इराण यांच्यातील सद्भावाचे दोन दिवस संपले. पुन्हा इराणने होर्मुझचा मार्ग बंद केला. त्यामुळे जग आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या भू-राजकीय संकटात सापडले. होर्मुझच्या सामुद्रधुनीबाबत एप्रिल २०२६ मधील घडामोडींनी जागतिक राजकारण आणि अर्थव्यवस्थेला मोठा धक्का दिला. १८ एप्रिल २०२६ रोजी इराणने अमेरिकेवर 'वचनभंग' आणि त्यांच्या बंदरांवर नाकेबंदी कायम ठेवल्याचा आरोप करत, हा अत्यंत महत्त्वाचा जलमार्ग पुन्हा बंद केला. संयुक्त अरब अमिरातीचे राज्यमंत्री सईद बिन मुबारक अल हाजेरी यांनी होर्मुझच्या सामुद्रधुनीतील अडथळ्यांबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. त्यांनी या परिस्थितीला 'आर्थिक दहशतवाद' म्हटले असून, यामुळे जागतिक व्यापारासह भारताच्या अर्थव्यवस्थेवरही गंभीर परिणाम होत असल्याचे अधोरेखित केले आहे. एप्रिल २०२६ मधील परिस्थितीनुसार, इराणने या मार्गावर निर्बंध आणल्यामुळे आणि अमेरिकेने केलेल्या नाकेबंदीमुळे, हा अरुंद जलमार्ग प्रभावीपणे बंद झाला आहे. इराणने पुन्हा होर्मुझचा रस्ता बंद केल्यामुळे जगाचे रस्ते बंद झाले. त्याचबरोबर केवळ युद्धबंदी हाच एकमेव हा पेच सोडवण्याचा मार्ग नव्हे तर त्यासोबतच इराणकडून सर्व आखाती राष्ट्रांना ज्या धमक्या दिल्या जात आहेत त्यांचा कायमचा बंदोबस्त केला पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. इराणच्या हल्ल्यांचा सर्वात जास्त खामियाजा तर आखाती देशांनाच त्यातल्या त्यात दुबई आणि सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरात यांना भोगावा लागला आहे. इराणच्या हल्ल्यात युएईमधील तेल आणि वायु कारखान्यांना लक्ष्य केले होते. त्यात एक अल्युमिनियमचा कारखानाही आहे. त्यामुळेच अल हाजेरी म्हणतात त्याप्रमाणे केवळ दोन चार दिवसांची युद्धबंदी जाहीर करून उपयोगी नाही तर युद्धाचा कायमस्वरूपी निकाल लावायचा असेल तर शाश्वत तोडगा काढणे आवश्यक आहे. पण त्यापेक्षा असा विचार केला पाहिजे, की या वारंवार उपजणाऱ्या युद्धाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर कसा आणि किती प्रतिकूल परिणाम होणार आहे. जूनपासून खरिपाचा हंगाम सुरू होत आहे आणि त्याच काळात खते आणि रसायनांचा तुटवडा निर्माण झाला तर त्याचा प्रभाव कृषी उत्पन्नावर तीव्र स्वरूपाचा होईल यात शंका नाही. एकीकडे रशिया युक्रेन युद्ध संपुष्टात येण्याची कसलीही चिन्हे दिसत नसताना आता पश्चिम आशियातील या युद्धाचे सावट जागतिक अर्थव्यवस्थेवर जास्तच गडद पडणार आहे. युद्धाचा परिणाम विविध उर्जा उत्पादनांची साठवणूक, उत्पादन आणि परिवहन यावर तर झाला आहेच. पण क्रूड तेल, नैसर्गिक वायू आणि खतांच्या पुरवठ्यावर परिणाम होऊन त्यांच्या उपलब्ध होण्यात बाधा येत आहे. त्याचा परिणाम त्या पदार्थांच्या किमती प्रचंड वाढून आर्थिक शॉकमध्ये त्याचे रुपांतर होईल. यात एक विशेष असे की काही काळ युद्धाचा पेच सुटला तरीही पुरवठा व्यत्यय पूर्ववत होण्यास आणखी काही महिने जावे लागेल. भारतासारख्या नाजूक अर्थव्यवस्थेला ते कितपत पेलवेल याची शंका आहे. भारत क्रूड तेल आणि गॅस तसेच खते इतर ४१ देशांकडून मिळवत आहे. पण वास्तव हे आहे, की भारताचे क्रूड तेलावरील अवलंबित्व ९० टक्क्यांपर्यंत वाढले आहे. भारत आता आक्रमकपणे तेल मिळवण्याबाबत विविधता आणत आहे. त्याचे स्वागत करायला हवे. रशिया, अमेरिका आणि पश्चिम आफ्रिका आणि लॅटिन अमेरिका यांच्याकडे भारताने आपला मोर्चा वळवला आहे. भारताला आता इराणवर अवलंबून राहून चालणार नाही. त्याला डायव्हर्सिफिकेशन करावेच लागेल आणि त्यासाठी त्याला इतर देशांकडे जावे लागेल. भारताचे यासाठीच प्रयत्न सुरू आहे. भारत-रशिया यांची पूर्वापार मैत्री आहे. अजूनही त्यात मुळीच कटुता आली नाही. त्यामुळे भारताला आता रशियाकडून पर्यायी मार्गाद्वारे तेल मिळवावे लागेल. त्याचबरोबर भारत आता अमेरिकेकडेही आकर्षित झाला आहे आणि त्या देशाकडूनही भारताला तात्काळ खरेदी करावी लागेल. युद्धाचा एक तात्काळ झालेला परिणाम म्हणजे भारताचा एलपीजी. उपभोगाचे प्रमाण १३ टक्क्यांवर आले आहे. मार्च २०२६ मध्ये एलपीजी वापराचे प्रमाण ८.१ टक्क्यांवर आले आहे. एकेकाळी जे पाईप गॅसचे स्वप्न पाहिले जात होते ते आता गरज बनली आहे. भारताच्या तेलाचे आयात बिल जागतिक शॉक्समुळेच प्रभावित होत असते आणि त्याचे प्रत्यंतर आताही आले आहे. होर्मुझची सामुद्र धुनी भारतासाठीच नव्हे तर जगासाठीच इतकी का महत्वची आहे आणि इराण युद्धात तिचे काय महत्व आहे ते यापूर्वी समजले आहेच. पण यावेळी मात्र तेहरानने परिणामकारकरित्या सामुद्रधुनी बंद केली आहे आणि तिच्यातून जाणाऱ्या दोन भारतीय जहाजांवर हल्ले केले आहे. हे चांगले चिन्ह नाही, कारण भारत आणि इराणची मैत्री आहे आणि भारताने अजूनतरी इराणच्या विरोधात कोणतीही अधिकृत भूमिका घेतली नाही. तरीही इराणने भारतीय जहाजांवर हल्ला चढवावा हे अनाकलनीय आहे. भारताने इराणच्या प्रतिनिधींना दिल्लीत समज दिली हे चांगले झाले. पण जो भारत कधीही इराणच्या विरोधात नाही, त्या देशाच्या जहाजांवर गोळीबार करावा हे खटकण्यासारखे आहे. होर्मुझचा मार्ग पुन्हा बंद झाल्याने युद्धाचा पेच वाढला आहे आणि जग पुन्हा पहिल्या स्थितीत पोहचले आहे. तेलाच्या किमती प्रचंड वाढलेल्या आणि अन्नपदार्थांचा तुटवडा जाणवेल इतका अशी ही स्थिती आहे. त्याशिवाय उर्जेच्या संकटाचे ढग जगावर घोंघावत आहेत ते वेगळेच आणि नॉट बट द लीस्ट मुद्दा म्हणजे ज्या पर्यटकांना आता परदेशात सहलीला जायचे असेल ते इंधनाच्या टंचाईमुळे जाऊ शकणार नाही. याचा परिणाम त्यांच्यावर तर होतोच पण देशाला मिळणारा मोठा महसूलही बुडतो. भारताची निर्यात संकटात आहे, ती वेगळ्या कारणामुळे. पण या संकटाची भर पडली तर निर्यात अधिकच नुकसान होणार आहे. अमेरिका इराण युद्धामुळे भारताच्या निर्यात क्षेत्रावर जबरदस्त परिणाम झाला आहे आणि मार्च २०२६ मध्ये भारताची निर्यात ७ टक्क्यांनी खाली आली. प्रमुख शिपिंग मार्ग बंद झाल्यामुळे जहाजांना अधिक लांबवरच्या मार्गांनी जावे लागते आणि त्यामुळे त्यांचे बिल वाढत आहे. एकूण युद्ध संपूर्ण जगासाठीच जास्तीतजास्त असह्य झाले आहे.

---

**आता ५० वर्षे उलटूनही सरकारने महाराष्ट्र सिंचन अधिनियम, १९७६ या कायद्याचे नियमच तयार केलेले नाहीत. परिणामी, कायद्यात काहीही 'विहित' झालेले नाही. ही केवळ तांत्रिक चूक नसून एक जाणीवपूर्वक केलेली खेळी आहे.**



# तांत्रिक चूक नव्हे, जाणीवपूर्वक खेळी

✍ राजन क्षीरसागर
मो. ९८६०४८८८६०

### पूर्वार्ध

एल-निनो च्या धोक्याबाबत चिंता व्यकत केली जात आहे. या पार्श्वभूमीवर पाण्यासाठी तीव्र स्पर्धा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पाणी ही जीवनावश्यक गरज, नागरीकरणाची निकट, शेतीविकाचा मूलाधार आणि उद्योगाचा कच्चा माल अशा अनेक रूपात वावरत आहे. अशा पाणी उपलब्धतेचा तुटवडा झाला की नेहमी संकटात धनाढय आणि बलदंड घटकांचे भांगून जाते. दुर्बल चिरडले जातात. निदान व्यवस्थेत अराजक निर्माण होवू नये यासाठी कायदे आणि नियमन याची आवश्यकता आहे. सिंचन कायदा १९७६ ची झालेली हेळसांड येत्या वर्षात गंभीर समस्या निर्माण करू शकते. त्याबद्दल नियमन तरी रानटी न्यायाने न करता कायदेशीर मार्गाने करण्याचा हा अट्टाहास!

गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातील शेतकरी दुष्काळ, अवकाळी पाऊस, पूर आणि पाणीटंचाई या संकटांशी दोन हात करत आहे. पण या नैसर्गिक संकटपेक्षाही मोठा अत्याचार शेतक-यांवर चालविला जात आहे ते म्हणजे महाराष्ट्र राज्य सरकारची कायदेशीर निष्क्रियता. तब्बल ५० वर्षांपूर्वी संमत झालेला महाराष्ट्र सिंचन अधिनियम, १९७६ हा कायदा आजही केवळ कागदावरच अस्तित्वात आहे. या कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेले नियम आजपर्यंत तयारच करण्यात आलेले नाहीत. या पार्श्वभूमीवर देशातील सर्वात मोठी व जुनी शेतकरी संघटना असलेल्या व क्रांतिसिंह नाना पाटील यांनी देखील अध्यक्षपद भूषविलेल्या अखिल भारतीय किसान सभेने महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना एक सविस्तर निवेदन नुकतेच सादर केले आहे. या निवेदनातून महाराष्ट्रातील सिंचन व्यवस्थापनातील गंभीर त्रुटी, शेतक-यांच्या हक्कांची होणारी पायमल्ली आणि सरकारी यंत्रणेतील हलगर्जीपणा अधोरेखित केल्या आहेत. चला तर मग समजून घेऊया, हा कायदा नेमका का महत्वाचा आहे. त्याच्या अंमलबजावणीच्या अभावामुळे शेतक-यांचे काय नुकसान होत आहे आणि अखिल भारतीय किसान सभेने नेमक्या कोणत्या मागण्या केल्या आहेत.

महाराष्ट्र सिंचन अधिनियम, १९७६ हा महाराष्ट्रातील जलव्यवस्थापन, प्रशासन आणि नियमन साठीचा 'मातृ अधिनियम' (मदर ॲक्ट) मानला जातो ब्रिटिशकालीन १८७९ चा बॉम्बे सिंचन अधिनियम रद्द करून हा नवा कायदा आणण्यात आला.

१ जानेवारी १९७७ पासून हा कायदा लागू झाला. मात्र, प्रत्येक कायद्यात त्याच्या अंमलबजावणीसाठी कार्यप्रणाली तसेच त्यासंबंधी विविध यंत्रणेची अधिकार क्षेत्र यासाठी कायद्याने नियम बनविणे आवश्यक असते, असे नियम नसतील तर कायद्याची अंमलबजावणी अशक्य होते. कायद्यात जिथे जिथे 'विहित' हा शब्द वापरला आहे, त्याचा अर्थ 'या कायद्याअंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले' असा होतो. आता ५० वर्षे उलटूनही सरकारने महाराष्ट्र सिंचन अधिनियम, १९७६ या कायद्याचे नियमन तयार केलेले नाहीत. परिणामी, कायद्यात काहीही 'विहित' झालेले नाही ही केवळ तांत्रिक चूक नसून ही एक जाणीवपूर्वक केलेली खेळी आहे, कारण नियम नसल्याने जलसंपदा विभाग आजही १९३४ च्या कालबाह्य व इंग्रजांनी केलेल्या 'बॉम्बे कॅनाल रूल्स'नुसार काम करतो, जो की १८७९ च्या रदद् झालेल्या कायद्यावर आधारित आहे. म्हणजेच विभाग असा कायदा वापरती आहे जो कायदेशीररीत्या अस्तित्वातच नाही.

**● १० वर्षे उलटली, नियम नाहीत**

ही बाब केवळ प्रशासकीय सोय नाही तर तो थेट न्यायालयाचा अवमान आहे. जलतज्ज्ञ प्रदीप पुरंदरे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल केलेल्या जनहित याचिका क्र. १५२/२०१४ मध्ये ५ ऑगस्ट २०१५ रोजी न्यायालयाने स्पष्ट आदेश दिले होते. न्यायालयाने राज्य सरकारला आदेश दिला की, या कायद्यांतर्गत नियम तयार करण्यासाठी, त्यांना मंजुरी देण्यासाठी आणि ते प्रसिद्ध करण्यासाठी एक निश्चित कालमर्यादा सांगावी, शासनाने स्थापन केलेल्या समितीने २८ जुलै २०१५ रोजी आपला मसुदा अहवालही सादर केला, पण त्यानंतर मात्र पूर्ण शांतता. तब्बल दहा वर्षे उलटून गेली तरी नियम प्रसिद्ध झालेले नाहीत.

ही थेट न्यायालयाची निर्भत्सना करणारी बाब आहे.

**● शेतकऱ्यांचे काय नुकसान होते ?**

१) नियम नसल्याने कालवा अधिकाऱ्याकडे कोणतेही कायदेशीर अधिकार उरत नाही.

त्यामुळे तो पाणी चोरी रोखू शकत नाही किंवा समान वाटप करू शकत नाही.

२) कायद्याच्या कलम तीननुसार सिंचन प्रकल्पाचे लाभक्षेत्र अधिसूचित कामे बंधनकारक आहे. पण तसे झालेले सही.

परिणामी, एखादी जमीन बागायती आहे की नाही हेच कायदेशीररीत्या सिद्ध होत नाही.

३) कलम ११ नुसार नद्याही अधिसूचित केल्या जात नाहीत. त्यामुळे नदीतील पाण्यावर शेतक-यांचा कायदेशीर हक्क सिद्ध होत नाही.

याचाच परिणाम म्हणून, राजकीयदृष्टया व आर्थिक दृष्टया बलदंड घटकांना विशेषत: कार्पोरेट घटकांना धोरणातील पाणी वापरण्याचे नियोजन शून्य, नियमबाह्य आणि भ्रष्ट प्रकारांनी पाणी वळविणे आणि पाठविणे सहजसाध्य बनले आहे. तर कालव्याच्या शेवटच्या टोकावरील (टेल एंड) शेतकऱ्याची जमीन कोरडी राहते, सिंचनासाठी राखलेले पाणी उद्योगांना वळवले जाते. आणि त्याला जाब विचारणारा किंवा नियमन करणारा कोणी नसतो. या कायदेशीर पोकळीचा फायदा घेत शासनानेच शेतकयांच्या पाण्याची मोठ्या प्रमाणावर लूट केल्याचे पुरावे आहेत. प्रयास अहवालात याची गंभीर दखल घेण्यात आली आहे. या अहवालानुसार...

**● १११ टीएमसी पाणी वळवले:** मंत्रिस्तरीय उच्चाधिकार समितीने ५१ धरणांमधून तब्बल ३,३६८.६५ दशलक्ष घनमीटर (अंदाजे ११९ टीएमसी) पाणी शेतीऐवजी खासगी औष्णिक वीज कंपन्या आणि सेझ (एसईझेड) यांना वळवले.

४.१८ लाख हेक्टर जमीन उध्वस्त: या बेकायदेशीर पाणी वळत्यामुळे तब्बल ४.१८,४१२ हेक्टर अधिसूचित बागायती जमीन कायमस्वरूपी कोरडवाहू बनली आहे.

**● धक्कादायक उदाहरणे :** दारणा-गंगापुर प्रकल्पातील ७४ टक्के पाणी, हेतवणे प्रकल्पातील ८८ टक्के पाणी आणि पवना प्रकल्पातील ८१ टक्के पाणी बिगर-शती वापरासाठी वळवण्यात आले. याचा अर्थ ही धरणे आता शेतीसाठी नसून उद्योगांसाठी आहेत.

**● ऊर्ध्व वर्धा धरणाचा दाखला :** अमरावती जिल्ह्यातील या धरणातून ८८ दशलक्ष घनमीटर पाणी कोळसा वीज प्रकल्पाला दिले. यामुळे २४ हजार हेक्टर जमीन कायमची सिंचनापासून वंचित राहिली. ही बाब आजही न्यायालयात प्रलंबित आहे.

(लेखक अखिल भारतीय किसान सभेचे अध्यक्ष आहेत.)

---

***इराण आणि अमेरिका यांच्यातील लष्करी तणावामुळे आणि युद्धासारख्या परिस्थितीमुळे जागतिक व्यापाराची कंबर मोडली आहे. या आंतरराष्ट्रीय संघर्षाचा सर्वात थेट आणि घातक परिणाम आता भारतीय व्यापाऱ्यांवर दिसू लागला आहे. ड्रायफ्रूटच्या आयात-निर्यातीशी संबंधित मोठे व्यापारी सध्या दुहेरी फटका सहन करत आहेत. एकीकडे कोट्यवधी रुपयांचा माल समुद्रात अडकला आहे, तर दुसरीकडे बँका आणि कर्जदारांचा दबाव वाढत आहे.***

# निर्यातदार खुश, व्यापारी संकटात



गेल्या काही दिवसांमध्ये समोर आलेल्या बातम्यांपैकी काही बातम्या दिलासादायक आहेत तर काही युद्धाचे दुष्परिणाम सांगणाऱ्या. रिझर्व्ह बँकेने परदेशातून पैसे जमा होण्यास लागणाऱ्या विलंबाबाबतच्या नियमांमध्ये केलेल्या बदलामुळे निर्यातदारांना दिलासा मिळणार आहे तर अमेरिका आणि इराणच्या युद्धामुळे सुक्या मेव्याचे व्यापारी संकटात सापडल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. दुसरीकडे, निर्यात शुल्क वाढवल्याने डिझेलच्या भाववाढीला लगाम लागल्याचे दृश्य दिसत आहे.

रिझर्व्ह बँकेच्या नियमात महत्त्वपूर्ण बदल

रिझर्व्ह बँकेने आपल्या नियमांमध्ये महत्त्वपूर्ण बदल केला आहे. परदेशातून पैसे मिळण्यास होणारा विलंब लवकरच संपणार आहे. बँकांना आंतरराष्ट्रीय व्यवहार झाल्याच्या दिवशीच ग्राहकांच्या खात्यात रक्कम जमा करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयामागे जागतिक स्तरावर भारताची पेमेंट प्रणाली मजबूत करणे, हा तद्देश आहे. यामुळे व्यवहारांना गती मिळेल, विलंब कमी होईल आणि ग्राहकांना अधिक पारदर्शकता व सोय मिळेल. आतापर्यंत कोणी परदेशातून पैसे पाठवले, तर ते त्यांच्या खात्यात जमा व्हायला अनेकदा एक-दोन दिवस किंवा त्याहूनही जास्त वेळ लागायचा. यामुळे विशेषतः कुटुंब किंवा व्यवसाय या पैशांवर अवलंबून असलेल्यांची गैरसोय होत असे. या समस्येचे निराकरण करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने हा नवीन नियम लागू केला आहे. नवीन नियमानुसार, बँकेला बाजाराच्या वेळेत परकीय चलन प्राप्त झाले तर त्यांनी ते त्याच दिवशी ग्राहकाच्या खात्यात जमा करणे बंधनकारक आहे. चलन बाजाराच्या वेळेनंतर आले तर ते पुढील कामकाजाच्या दिवशी जमा केले पाहिजे. सर्व व्यवहार 'फेमा' नियमांनुसार केले जातील. रिझर्व्हं बँकने केवळ निधी जमा करण्यासाठी केवळ अंतिम मुदत निश्चित केली, असे नाही तर येणाऱ्या चलनाबद्दल ग्राहकांना त्वरित माहिती देण्याचे निर्देशही बँकांना दिले आहेत. ही माहिती बँकिंग वेळेनंतर मिळाली, तर ग्राहकाला पुढील कामकाजाच्या दिवसाच्या सुरुवातीला माहिती देणे आवश्यक आहे. यामुळे ग्राहकांना त्यांच्या निधीच्या स्थितीबद्दल स्पष्ट माहिती मिळेल. याव्यतिरिक्त, रिझर्व्ह बँकेने बैंक प्रक्रिया सुधारण्याबरही भर दिला आहे.

**रिझर्व्ह बँकेची अपेक्षा**

सध्या अनेक बँका दिवसाच्या शेवटी त्यांच्या खात्यांचा ताळमेळ घालतात (टॅली करतात). त्यामुळे विलंब होतो. आता त्यांना जलद जना सुनिश्चित करण्यासाठी ही प्रक्रिया रिअल-टाइममध्ये किंवा किमान दर तासाला अद्ययावत करण्यास सांगितले आहे. बँकांना तंत्रज्ञानाच्या बाबतीत त्यांच्या प्रणाली अधिक अद्ययावत अरणि सुरक्षित करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. ग्राहक आपल्या व्यवहारांचा मागोवा घेऊ शकतील, आवश्यक कागदपत्रे सादर करू शकतील आणि व्यवहारांची सद्यस्थिती पाहू शकतील असे डिजिटल प्लॅटफॉर्म्स बँकांनी तयार करावेत, अशी रिझर्व्ह बँकेची अपेक्षा आहे. बँकांना एसटीपीसारख्या स्वयंचलित प्रणालींचा अवलंब करण्याचा सल्लाही देण्यात आला आहे. यामुळे कोणत्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय निधी थेट ग्राहकांच्या खात्यात हस्तांतरित करता येईल. त्यामुळे वेळेची बचत होईल आणि चुका होण्याची शक्यता कमी होईल. हा नवीन नियम जारी झाल्यानंतर सहा महिन्यांनी अंमलात येईल. त्यामुळे बँकांना त्यांच्या प्रणाली अद्ययावत करण्यासाठी वेळ मिळेल. हा निर्देश 'पेमेंट ॲंड सेटलमेंट सिस्टिम्स ॲक्ट, २००७' अंतर्गत जारी करण्यात आला आहे. रिझर्व्ह बँकेच्या या निर्णयामुळे परदेशातून पैसे मिळवणाऱ्या लाखो लोकांना दिलासा मिळेल. यामुळे केवळ व्यवहारांना गती निळेल, असे नाही तर पारदर्शकता आणि विश्वासही वाढेल.

युद्धाचा जागतिक व्यापारावर परिणाम

इराण आणि अमेरिका यांच्यातील लष्करी तणावामुळे आणि युद्धासारख्या परिस्थितीमुळे जागतिक व्यापाराची कंबर मोडली आहे. या आंतरराष्ट्रीय संघर्षाचा सर्वात थेट आणि घातक परिणाम आता भारतीय व्यापाऱ्यांवर दिसू लागला आहे. ड्रायफ्रूटच्या आयात-निर्यातीशी संबंधित मोठे व्यापारी सध्या दुहेरी फटका सहन करत आहेत. एकीकडे कोट्यवधी रुपयांचा माल समुद्रात अडकला आहे, तर दुसरीकडे बँका आणि कर्जदारांचा दबाव वाढत आहे.

आखाती देशांमधून सर्व माल कंटेनरद्वारे भारतात येतो; पण युद्धजन्य परिस्थितीमुळे सामरिकदृष्ट्या अत्यंत महत्वाचा 'स्ट्रेट ऑफ होर्मुज' हा समुद्री मार्ग बंद केल्यामुळे त्यांच्या ड्रायफ्रूटने भरलेले ४०-४५ कंटेनर्स सध्या इराणमधील 'बंदर अब्बास' आणि संयुक्त अरब अमिरातीतील 'जबल अली' या बंदरांमध्ये अडकले आहेत. तो माल पुढे जात नाही आहे आणि तो तिथून कधी निघेल याबाबतही काही संकेत मिळत नाहीत. दुबई, सौदी अरेबिया, इराण आणि अफगाणिस्तान यासारख्या देशांमधून माल मागवून नवी मुंबईच नव्हे, तर संपूर्ण भारतात त्याचा पुरवठा करतात. त्यांनी सरकारकडे भावनिक अपील करत म्हटले, माझ्यासारख्या अनेक व्यापाऱ्यांची अवस्था सध्या वाईट आहे. आमचे पैसे मालात अडकले आहेत आणि त्यावर व्याजही वाढत आहे. सरकारला माझी विनंती आहे, की या संकटकाळात आम्हाला बँकेचे कर्ज फेडण्यासाठी अधिक वेळ द्यावा, जेणेकरून आम्हाला थोडी मदत होईल. सध्या ब्रयफ्रूट बाजारात या अनिश्चिततेमुळे येत्या काळात किंमतींमध्ये मोठी वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्याचा थेट परिणाम सामान्य जनतेच्या खिशावर होणार आहे.

**आखाती देशात तणाव**

दुसरीकडे, अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धामुळे आखाती देशांमध्ये तणावाची परिस्थिती निर्माण झाली आहे.

भारताकडे येणारी तेलवाहतूक विस्कळित झाल्यामुळे संपूर्ण जगात इंधन संकट निर्माण झाले आहे. सध्या परिस्थिती नियंत्रणात आहे. अशातच आता केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. केंद्राने हाय-स्पीड डिझेलवर निर्यात शुल्क २४ रुपये प्रति लिटर आणि इन्फ्रा सेस ३६ रुपये प्रति लिटरने वाढवला आहे. अर्थमंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात ही वाढ तत्काळ लागू करण्यात आली असल्याची माहिती दिली आहे. सरकारने याआधीही २६ मार्च रोजी डिझेलवर २१.५० रुपये प्रति लिटर आणि एटीएफवर २९.५ रुपये प्रति लिटर निर्यात शुल्क लावले होते. त्यानंतर आता दुसऱ्यांदा वाढ करण्यात आली आहे. सरकारने म्हटले आहे, की डिझेलवरील निर्यात शुल्क २१.५ रुपये प्रति लिटरवरून वाढवून ५५.५ रुपये प्रति लिटर करण्यात आले आहे. त्याचबरोबर हाय-स्पीड डिझेलवरील अतिरिक्त उत्पादन शुल्क (एक्साइज ड्यूटी) आणि सेसही वाढवण्यात आले आहेत. आता हाय-स्पीड डिझेलवरील विशेष अतिरिक्त उत्पादन शुल्क २४ रुपये प्रति लिटर करण्यात आले आहे, तर रोड आणि इन्फ्रास्ट्रक्चर सेस आता ३६ रुपये प्रति लिटर झाला आहे. 'एव्हिएशन टर्बाइन फ्यूएल' (एटीएफ) वरील शुल्कही २९.५ रुपये प्रति लिटरवरून वाढवून ४२ रुपये प्रति लिटर करण्यात आले आहे; मात्र पेट्रोलवरील निर्यात शुल्क शून्यच ठेवण्यात आले आहे.

मध्य पूर्वेत सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारतातील बाजारात इंधनाची उपलब्धता वाढवण्यासाठी हे शुल्क लावण्यात आले आहेत.

कारण हा कर वाढल्यामुळे निर्यातदारांना आंतरराष्ट्रीय बाजारात जास्त दराने डिझेल विकावे लागणार आहे. कर वाढल्याने ही विक्री कमी होऊन तो साठा देशांतर्गत बाजारात पुरवठा वाढू शकतो.

**महेश देशपांडे**

---

## पालकांना दिलासा

शिक्षणक्षेत्र हे पवित्र क्षेत्र मानले जाते. मात्र आता हे क्षेत्रही शिक्षण देणे हे व्रत न राहता तो एक धंदा झालेला आहे असे खेदाने म्हणावे लागते. धंदा म्हंटला की त्यामध्ये 'नफा' हा महत्त्वाचा मुद्दा असतो. बऱ्याच वेळा शाळेत प्रवेश घेताना शाळेला या नात्यारूपात देणगी द्यावी लागते हा कटू अनुभव आहे. काही शळांमधून शाळेचा गणवेश, वह्या, पुस्तके. इतर शैक्षणिक साहित्य शाळेने ठरवून दिलेल्या दुकानातूनच घ्यायला हवे अशी पालकांवर सक्ती केली जाते. हा पालक आणि विद्यार्थी यांच्यावर अन्याय आहे. हे थांबवण्यासाठी महाराष्ट्र शिक्षण संचानालयाने १५ एप्रिल या दिवशी एक परिपत्रक काढून शाळांनी ठराविक ठिकाणाहून गणवेश तसेच इतर शैक्षणिक साहित्य घेण्याची सक्ती पालक अथवा विद्यार्थी यांच्यावर करू नये असे नमूद केले आहे . या नियमाचे पालन न करणाऱ्या शाळांवर कडक कारवाई केली जाईल असा इशारा शिक्षण विभागाने दिला आहे. या निर्णयाने पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

**संध्या काटदरे**

## विधान परिषद उद्धव ठाकरेंनी लढवू नये

९ जागांसाठी महाराष्ट्रातील विधान परिषदेसाठी १२ मे रोजी निवडणूक होत असून त्याच दिवशी निकाल लागणार आहे. या निवडणुकीसाठी महाविकास आघाडीकडून माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे नाव पुढे केले जात आहे. मात्र, ठाकरेंनी अजून होकार दिलेला नाही. त्यामुळे उद्धव ठाकरे काय निर्णय घेतात याकडे विशेष लक्ष लागून असले तरी ठाकरेंनी ही निवडणूक न लढविण्याचा निर्णय घेणे अपेक्षित आहे. कारण शिवसेनेची जी पडझड झाली आहे त्याकडे लक्ष देवून पुन्हा एकदा नव्याने शिवसेना संघटनेची बांधणी करणे गरजेचे आहे. पक्ष फुटीमुळे कार्यकर्ते, नेते दुभंगले आहेत. बाळासाहेब ठाकरे यांच्या मनातील शिवसेना उभी करण्यासाठी पुन्हा एकदा उद्धव ठाकरेंनी शिवसेनेची नव्या दमाने पुनर्बांधणी करणे अपेक्षित आहे. त्यामुळे पुन्हा एकदा शिवसेनेचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी विधान परिषद निवडणूक न लढविणे गरजेचे आहे.

**राजू जाधव**

# राळेगाव प्रकरणात.. '३४ आदिवासी मुली विक्री' दावा खोटा

## आ. राजू तोडसाम यांचा भाजपलाच घरचा आहेर

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ – येथील कथित आदिवासी मुली विक्री प्रकरणाने जिल्ह्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाले असताना, आता या प्रकरणात मोठा ट्विस्ट समोर आला आहे. भाजपकडून करण्यात आलेल्या "34 आदिवासी मुलींच्या अपहरण व विक्री" या गंभीर दाव्याला भाजपचेच पांढरकवडा आर्णी मतदारसंघाचे आमदार राजू तोडसाम यांनी फेटाळून लावत तो पूर्णपणे चुकीचा व दिशाभूल करणारा असल्याचा खुलासा केला आहे.

आ. तोडसाम यांनी एका व्हिडिओद्वारे प्रतिक्रिया देताना स्पष्ट शब्दांत म्हटले की, "34 आदिवासी मुलींबाबत केलेले आरोप तथ्यहीन असून, यामुळे आदिवासी मुलींसह संपूर्ण समाजाचा अवमान झाला आहे." त्यांनी थेट भाजप जिल्हाध्यक्ष ॲड. प्रफुल चव्हाण आणि आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्या विधानांवर प्रश्न उपस्थित करत, या प्रकरणाचा अपप्रचार करण्यात आल्याचा आरोप केला. याआधी भाजप जिल्हाध्यक्ष प्रफुल चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत ऑडिओ-व्हिडिओ क्लिपच्या आधारे राळेगाव परिसरात मानव तस्करी, जबरदस्ती विवाह, धर्मांतर व "लव्ह जिहाद"सारख्या प्रकारांचे रॅकेट कार्यरत असल्याचा दावा केला होता. तसेच अल्पवयीन मुलींचे लग्न लावण्याचा प्रयत्न उधळून लावल्याचा उल्लेख करत या प्रकरणात मोठा घोटाळा असल्याचे त्यांनी सांगितले होते. या प्रकरणाचा सायबर तपासातून आणखी खुलासा होईल, असा दावा ही त्यांनी केला. मात्र दुसरीकडे जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी अधिकृत आकडेवारी सादर करत संयमित भूमिका घेतली आहे.

त्यांच्या माहितीनुसार 2025 मध्ये राळेगाव पोलीस ठाण्याअंतर्गत नोंदवलेल्या 38 बेपत्ता महिलां पैकी 37 महिलांचा शोध लागला, तर 1 महिला अद्याप बेपत्ता आहे.त्याच वर्षातील 14 अपहरण प्रकरणांपैकी 12 मुली सापडल्या, तर 2 प्रकरणांचा तपास सुरू आहे. 2026 मध्ये आतापर्यंत 9 महिला बेपत्ता झाल्याच्या तक्रारी असून त्यापैकी 8 महिलांचा शोध लागला, तर 1 महिला अद्याप सापडलेली नाही. या आकडेवारीवरून मोठ्या प्रमाणावर मुली बेपत्ता असल्याचा दावा चुकीचा असल्याचे संकेत मिळत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.प्राप्त ऑडिओ-व्हिडिओ क्लिप्सची सायबर तपासणी सुरू असून, ठोस पुराव्यांशिवाय कोणताही निष्कर्ष काढला जाणार नाही," असेही त्यांनी सांगितले.

दरम्यान आमदार तोडसाम यांनी प्रसारमाध्यमांच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित करत, कोणतीही शहानिशा न करता गंभीर आरोपांचे प्रसारण झाल्याने समाजात भीती व गैरसमज पसरले अशी टीका केली. एकूणच, राळेगाव प्रकरणात एकीकडे भाजपकडून गंभीर आरोपांची सरबत्ती, दुसरीकडे पोलीस प्रशासनाची आकडेवारीवर आधारित भूमिका आणि आता स्वतः भाजप आमदारांकडूनच आरोपांचे खंडन यामुळे या प्रकरणात नेमके सत्य काय, हा प्रश्न अधिकच गडद झाला आहे.

आगामी सायबर तपास आणि अधिकृत चौकशी अहवालानंतरच या संपूर्ण प्रकरणाचे वास्तव स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

## संप, प्रशिक्षणामुळे तहसिल कार्यालयात शुकशुकाट

बाभुळगाव : जुनी पेंशन योजना लागु करणे यासह ईतर प्रलंबित मागण्यांसाठी महसुलसह अनेक कर्मचारी संघटनांनी संपाचे हत्यार उपसले आहे.त्यातही अंतर्गत प्रशिक्षण असल्याने आज दि. 21 एप्रिल रोजी तालुक्याचे महत्त्वाचे कार्यालय असलेल्या तहसिलदार कार्यालयात अक्षरशः शुकशुकाट पहावयास मिळाला. या ठिकाणी येणा-या अभ्यागत, तक्रारदार, अर्जदार यांचे अर्ज स्वीकारण्यासाठी आवक-जावक लिपीक सुद्धा उपस्थित नव्हता. त्यामुळे खेडेगावातून आलेल्या नागरिकांची घोर निराशा झाली. तहसिल कार्यालय अगदी वा-यावर सोडल्याचे चित्र दिसून आले. तहसिलदारांसह इतरही अधिकारी, कर्मचारी आज कार्यालयात उपस्थित नव्हते. याबाबत प्रस्तुत प्रतिनिधीने विचारणा केली असता, अनेक कर्मचारी संपात सहभागी होण्यासाठी गेले असल्याचे समजले. तर तहसिलदारांसह नायब तहसीलदार प्रशिक्षणासाठी यवतमाळ येथे गेल्याचे समजले. आपल्या न्याय मागण्यांसाठी कर्मचा-यांनी संपाचे हत्यार उगारल्याची माहिती यावेळी मिळाली असली तरी किमान एखादा कर्मचारी कार्यालयात येणा-या नागरिकांचे अर्ज स्वीकारण्यासाठी नियुक्त करायला हवा होता. असा संतप्त सवाल नागरिक विचारत होते.

# करोडो रुपयांची इमारत, पण आरोग्य सेवा तोकडी : पाटणबोरीतील वास्तव उघड



जनमाध्यम प्रतिनिधी

### गर्भवती महिलांची गैरसोय वाढली

प्राथमिक आरोग्य केंद्रात सोनोग्राफी सुविधा उपलब्ध नसल्याने गर्भवती महिलांना पांढरकवडा येथे जावे लागते. नुकत्याच घडलेल्या घटनेत गुरुवारी सकाळी ८:०० वा. ६ ते ७ गर्भवती महिला तपासणीसाठी आल्या होत्या. मात्र, रुग्णवाहिका उपलब्ध नसल्याने ४० अंशांहून अधिक तापमानात त्यांना खाजगी वाहनाने पांढरकवडा येथे जावे लागले. या परिस्थितीत जर उष्णतेमुळे कोणतीही गंभीर घटना घडली असती, तर त्याची जबाबदारी कोणाची? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

### नागरिकांची मागणी

पाटणबोरी आरोग्य केंद्रात कायमस्वरूपी डॉक्टरांची नियुक्ती, २४ तास सेवा, आवश्यक सुविधा व रुग्णवाहिका तात्काळ उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

पांढरकवडा - तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असलेल्या पाटणबोरी येथे शासनाने करोडो रुपये खर्च करून अत्याधुनिक आरोग्य केंद्राची इमारत उभी केली. या इमारतीचे उद्घाटन मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले. मात्र, प्रत्यक्षात या केंद्रातील आरोग्य सेवा अत्यंत तोकडी असल्याचे चित्र समोर आले आहे. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ वर वसलेल्या पाटणबोरी येथे वारंवार अपघात होत असल्याने तसेच परिसरातील २५ ते ३० गावांतील नागरिक उपचारासाठी येथे येतात. दररोज १४० पेक्षा अधिक रुग्णांची ओपीडी असतानाही सायंकाळी ६ नंतर वैद्यकीय अधिकारी केंद्रात अनुपस्थित राहतात. परिणामी, रात्रीच्या वेळी येणाऱ्या रुग्णांना मोठा त्रास सहन करावा लागतो.

रात्री केंद्रावर केवळ रोजंदारीवर नियुक्त केलेला एक कर्मचारी उपस्थित असतो. तोही अनेकदा मद्यधुंद अवस्थेत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. रुग्ण आल्यावर संबंधित कर्मचारी डॉक्टर किंवा आरोग्य सेविकेला फोन करून कळवतो, तोपर्यंत रुग्णांची अवस्था गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अनेक रुग्णांना स्वतःच्या खर्चाने पांढरकवडा किंवा तेलंगणातील आदिलाबाद येथे जावे लागते. या केंद्रात गट 'अ' संवर्गातील दोन पदे मंजूर असली तरी एक पद गेल्या दोन वर्षांपासून रिक्त आहे. सध्या गहरवाल मॅडम या तात्पुरत्या प्रतिनियुक्तीवर वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. डॉक्टर यवतमाळ व आदिलाबाद येथून ये-जा करीत असल्याने नियमित सेवा बाधित होत आहे. आरोग्य केंद्रात आवश्यक औषधसाठा, पॅथॉलॉजी लॅब, प्रसूती कक्षातील सुविधा यांचा अभाव आहे. "२४ तास सेवा" हे केवळ घोषवाक्य ठरत असल्याची टीका नागरिकांकडून होत आहे. शासनाने ग्रामीण भागातील आरोग्य सेवा सक्षम करण्याचा उद्देश ठेवून उभारलेली ही इमारत सध्या केवळ शोभेची वस्तू ठरत असल्याचे चित्र आहे. याचा सर्वाधिक फटका गरीब व गरजू नागरिकांना बसत आहे.

## • वेचक

### शिवरामजी मोघे महाविद्यालयात वसुंधरा दिनानिमित्त पक्षांसाठी पाणपोई उपक्रम



पांढरकवडा - वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर पक्ष्यांना पाण्याची तीव्र गरज भासत असल्याने येथील शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वसुंधरा दिनानिमित्त पक्षांसाठी पाणपोई उपलब्ध करून देण्याचा उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. महाविद्यालयाच्या पर्यावरण विभागाच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत महाविद्यालय परिसरातील विविध ठिकाणी पक्ष्यांसाठी पाण्याची मडकी व पाणपोई ठेवण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी पुढाकार घेत ही भांडी पाण्याने भरून योग्य ठिकाणी ठेवली तसेच नियमितपणे पाणी भरण्याची जबाबदारीही स्वीकारली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अजय सोळंके होते. प्रमुख उपस्थितीत डॉ. नरेश महाजन, डॉ. उल्हास राठोड व डॉ. योगेश उगले यांची उपस्थिती होती. अध्यक्षीय भाषणात डॉ. सोळंके यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करत, "निसर्गाशी सुसंगत राहणे ही काळाची गरज असून पक्ष्यांसाठी पाण्याची व्यवस्था करणे हा छोटा पण महत्त्वाचा उपक्रम आहे," असे सांगितले. डॉ. नरेश महाजन यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण रक्षणासाठी सजग राहण्याचे आवाहन केले, तर डॉ. उल्हास राठोड यांनी अशा उपक्रमांची आवश्यकता स्पष्ट केली. डॉ. योगेश उगले यांनी विद्यार्थ्यांनी समाजोपयोगी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे महत्त्व सांगितले. या उपक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी पर्यावरण विभागाचे प्रमुख डॉ. अमर वंजारी व प्रा. सुजाता शेंडे यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पाडला. कार्यक्रमाला प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

### क्रीडा प्रबोधिनी निवड चाचणी प्रक्रिया जाहीर

यवतमाळ : आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्याच्या उद्देशाने क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने शिवछत्रपती क्रीडापीठ, म्हाळुंगे-बालेवाडी, पुणे अंतर्गत कार्यरत क्रीडा प्रबोधिनींसाठी सन २०२६-२७ या वर्षाकरिता निवड चाचणी प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. राज्यातील प्रतिभावान खेळाडूंना शास्त्रोक्त प्रशिक्षण, संतुलित आहार व अत्याधुनिक क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पुणे, कोल्हापूर, ठाणे, अमरावती, अकोला, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर व गडचिरोली या नऊ ठिकाणी क्रीडा प्रबोधिनी स्थापन करण्यात आल्या आहेत. या प्रबोधिनींमध्ये निवासी स्वरूपात प्रवेश दिला जाणार असून, निवड प्रक्रिया सरळ प्रवेश (५० टक्के) व कौशल्य चाचणी (५० टक्के) या पद्धतीने राबविण्यात येणार आहे. जुदो, जिम्नॅस्टिक, हॉकी, शूटिंग, फुटबॉल, जलतरण, ॲथलेटिक्स, बॅडमिंटन, हँडबॉल व सायकलिंग अशा विविध क्रीडा प्रकारांसाठी खेळाडूंची निवड केली जाणार आहे. राष्ट्रीय किंवा राज्यस्तरावर प्राविण्य मिळवलेल्या खेळाडूंना सरळ प्रवेशासह कौशल्य चाचणीद्वारे संधी दिली जाईल, तर राज्यस्तरावर सहभागी खेळाडूंची निवड कौशल्य चाचणीच्या माध्यमातून केली जाणार आहे.

# श्री ज्ञानेश्वर संस्थान पुसद येथे विठुरायाची चंदन उटी पूजन सोहळ्यात गरजू जोड़प्याचा विवाह संपन्न !

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद - विदर्भाची पंढरी प्रति पंढरपूर श्री ज्ञानेश्वर संस्थान पुसद येथे दिनांक 19 एप्रिल 2026 रोज रविवारला पंढरपूर प्रमाणेच अक्षय तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर पांडुरंग रुक्मिणी मातेला उटी पूजनाचा सोहळा साजरा करण्यात आला. उटी पूजनासाठी यजमान म्हणून पुसदचे प्रसिद्ध डॉ. प्रणिता व डॉ. संतोष रेवणवार हे लाभले होते. हिंदू संस्कृतीनुसार आपण साडेतीन मुहूर्त हे शुभ मानतो त्या साडेतीन मुहूर्तपैकी एका मुहूर्तावर म्हणजेच अक्षय तृतीयेला संस्थान मध्ये चंदन उटी पूजनाचा कार्यक्रम संपन्न झाला . जसे आपण म्हणतो "यथा देहे तथा देवे " म्हणजे कडकौ उन्हाळ्यामध्ये जसे आपणास शीतलता ,थंडावा पाहिजे असतो तद्वतच देवालाही उन्हा मुळे उष्णतेचा त्रास होऊ नये यासाठी गुढीपाडव्यापासून उटी लेपनाचा कार्यक्रम पंढरपूर येथे सुरू होतो.

अक्षय तृतीया म्हणजे परशुरामाचा जन्मदिन होय तसेच महात्मा बसवेश्वर यांची जयंती होय. अक्षय तृतीया या दिवशी चार धामापैकी एक धाम असलेल्या बद्रीनारायण येथील दरवाजा अक्षय तृतीयेला उघडला जातो. सहा महिने मंदिर बंद असते मंदिर शेवटी बंद करताना दिवा लावलेला असतो आणि सहा महिन्यानंतर जेव्हा देवाचा दरवाजा उघडतो तेव्हा तो दिवा तसाच तेवत असतो. आजही ही घटना आपणास पहावयाला मिळते. आजच्या अक्षय तृतीयेच्या दिवशी जर्मनीमध्ये माऊली ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या मंदिराची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे , या सोहळ्यासाठी आज संत ज्ञानेश्वर संस्थान आळंदी आणि संत तुकाराम महाराज देहू संस्थांनचे अध्यक्ष जर्मनीमध्ये गेलेले आहेत आणि याच दिवशी श्री ज्ञानेश्वर संस्थान पुसद द्वारा एका होतकरू गरजू मुलाचा आणि मूलीचा आंतरजातीय विवाह संपन्न करून सामाजिक बांधिलकी जपून समाजासमोर एक आदर्श ठेवला आहे. विशेष म्हणजे अक्षय तृतीया या दिवशी शुभ मुहूर्त असल्यामुळे लग्नासाठी वेगळे पंचांग पहावे लागत नाही. महेश गादेवार आणि कु.सीमा पारधे या जोडप्याचा विवाह सोहळा संस्थान तर्फे संपन्न करण्यात आला.यावेळी विष्णुसहस्रनाम हरिपाठ पठण करून अतिशय मंत्रमुग्ध पवित्र आणि भक्तिमय वातावरणात हा सोहळा संपन्न झाल्यानंतर दोघाही पती-पत्नीच्या चेहऱ्यावर खूप आनंद ओसंडून वाहत होता. त्यांना भरून आले होते कारण इतक्या पवित्र शुद्ध भक्तीमय वातावरणामध्ये त्यांचा विवाह पार पडला होता यानंतर सर्व उपस्थितांना भोजन प्रसाद देण्यात आला . संस्थांनचे अध्यक्ष बिपिन चिद्दरवार यांनी संकल्प जाहीर केला की पुढच्या वर्षी सुद्धा संस्थान तर्फे अशा प्रकारच्या गरजू होतकरू तरुण-तरुणींचा विवाह संस्थांतर्फे करून देण्यात येईल.

# 'केजी टू पीजी' शिक्षकांच्या हक्क आणि अधिकारासाठी लढा देणार : सुरेश देवकर यांचे प्रतिपादन

जनमाध्यम प्रतिनिधी



उमरखेड - "शिक्षकांवर सध्या अशैक्षणिक कामांचा मोठा बोजा वाढला असून, विविध ॲप्सच्या माध्यमातून त्यांची मानसिक आणि शारीरिक क्षमता संपवली जात आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षण हीच प्राथमिकता असायला हवी. त्यामुळे 'केजी टू पीजी'पर्यंतच्या प्रत्येक शिक्षकाच्या हक्क आणि अधिकारासाठी आपण आमदार कपिल पाटील यांच्या नेतृत्वाखाली संघटित लढा देऊ," असे आवाहन शिक्षक भारती संघटनेचे विभागीय अध्यक्ष सुरेशराव देवकर यांनी केले.

उमरखेड येथील हॉटेल तुलसी येथे आयोजित शिक्षक भारती संघटनेच्या 'सहविचार सभेत' ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. या सभेच्या अध्यक्षस्थानी उमरखेड नगरपालिकेच्या नगराध्यक्षा तेजश्री जैन, सरोज देशमुख, अर्चना गंगासागरे,संभाजी आगलावे, गणेश पानबुडे, बापूराव भालेराव, रेशमा परवीन मॅडम,होत्या, व इतर मान्यवर उपस्थित होते.

सभेत बोलताना देवकर यांनी सध्याच्या शिक्षण पद्धतीतील त्रुटींवर बोट ठेवले. ते म्हणाले की, शिक्षकांना शिकवण्याव्यतिरिक्त ऑनलाईन माहिती भरणे, विविध ॲप्सवर हजेरी आणि इतर अशैक्षणिक कामांत गुंतवून ठेवले जात आहे. यामुळे शिक्षकांचे मूळ कर्तव्य असलेल्या अध्यापनावर परिणाम होत आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी शिक्षक भारती संघटना आक्रमक पाऊले उचलणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### आमदार कपिल पाटील यांच्या नेतृत्वात लढा

शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी आणि हक्कासाठी आमदार कपिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील शिक्षक एकवटले आहेत. उमरखेड तालुक्यातील शिक्षकांनीही या लढ्यात मोठ्या संख्येने सहभागी होऊन संघटना अधिक मजबूत करावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले. यावेळी शिक्षकांच्या वतीने श्री शिवाजी विद्यालयाचे शिक्षक संदीप वानखेडे यांनी मनोगत व्यक्त केले या सहविचार सभेला उमरखेड शहर व तालुक्यातील प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावरील मुख्याध्यापक,शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक भारतीच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी उपस्थित शिक्षकांनी आपल्या समस्या मांडल्या आणि संघटनेच्या कार्यावर विश्वास दर्शवला.

# महसूल कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप ; प्रशासकीय कामावर परिणाम

जनमाध्यम प्रतिनिधी

## आज तिसऱ्या दिवशीही महसूल कर्मचाऱ्यांचा संप सुरूच!



पुसद - राज्यातील अनेक प्रलंबित असलेल्या मागण्यासाठी सरकारी, निमसरकारी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी समन्वय समितीने दिनांक २१ एप्रिलपासून बेमुदत संप पुकारला आहे. विविध मागण्यांसाठी आज या संपात अनेक संघटनांनी सहभाग नोंदविला. यामध्ये पुसद येथील महसूल कर्मचारी संघटनेचे कर्मचारी या संपात उतरल्या असून त्यांनी उपविभागीय अधिकारी आशीष बिजवल यांच्या मार्फत महसूल मंत्री यांना निवेदन सादर केले आहे.

संपामुळे आज तहसील कार्यालयातील अनेक विभागात शुकशुकाट पसरला असून. प्रामुख्याने महसूलच्या शेकडो कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविल्याची अधिकृत माहिती मिळाली आहे. कर्मचारी महसूल संघटनेने पुकारलेल्या संपामध्ये महसूल विभागाने दिलेल्या माहितीनुसार २१ एप्रिल पासूनच्या पूर्वपरवानगीने रजेवर असलेले अ गट, ब गट, क गट,व ड गट अशा चार गटांचा समावेश आहे. महसूल कर्मचाऱ्यांच्या एकूण सोळा ते अठरा मागणी आहेत ते खालीलप्रमाणे. सुधारीत राष्ट्रीय निवृत्ती योजनेची अंमलबजावणी करा, वाहनचालक व चतुर्थश्रेणी भरतीवरील बंदी हटवा, कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करा, चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना नियुक्ती देण्यासंदर्भात १९८१ च्या शासन निर्णयाचे पूर्ण स्थापना करा. शिक्षकांचे जीवन उध्वस्त करणारा १५ मार्च २०२४चा संच मान्यतेचा शासन आदेशाबाबत पुनर्विचार करण्यात यावा. अशा अनेक मागण्या आहेत. या संपामध्ये सहभागी असलेले महसूल कर्मचारी संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष दिलीप कोलेवाड, जिल्हा अध्यक्ष जय राठोड, सुभाष मोहटे, जनार्दन बावणे, गजानन खोकले, देवा राठोड, एकनाथ जाधव यांच्यासह भूमि अभिलेख व वनविभाग मधील कर्मचारी या संपामध्ये सहभागी झाले आहेत.

# वनश्री गॅस एजन्सींवर प्रशासनाचा दणका ! 'कारणे दाखवा' नोटीस, २३ एप्रिलला सुनावणी

जनमाध्यम प्रतिनिधी




यवतमाळ - जिल्ह्यातील गॅस वितरण व्यवस्थेतील अनियमिततेवर प्रशासनाने कडक भूमिका घेतली असून दोन गॅस एजन्सींना 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्यात आली आहे. जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार जिल्हा पुरवठा अधिकारी संघपाल मेश्राम व तहसीलदार डॉ. योगेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षण अधिकारी निलेश कळसकर यांच्या पथकाने दि. 9 एप्रिल रोजी स्वामी गॅस तसेच 10 व 16 एप्रिल रोजी वनश्री गॅसची तपासणी केली होती.

या तपासणीत आढळलेल्या बाबींवर जिल्हाधिकाऱ्यांनी गंभीर दखल घेत वनश्री HP गॅस (मोठी गुजरी, कळंब चौक) आणि स्वामी HP गॅस (दत्त चौक) या एजन्सींना नोटीस देण्यात आली आहे. संबंधित प्रकरणाची सुनावणी दि. 23 एप्रिल 2026 रोजी ठेवण्यात आली असून, दोषींवर कारवाईची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, निरीक्षण अधिकारी यांनी सर्व गॅस ग्राहकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. गॅस सिलेंडरचा काळाबाजार, जादा दर आकारणी किंवा इतर कोणत्याही तक्रारी आढळल्यास नागरिकांनी पुढाकार घेऊन 8149200910 या क्रमांकावर संपर्क साधावा, असे सांगण्यात आले आहे.

फोन किंवा व्हॉट्सअॅपद्वारे माहिती देण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रशासनाच्या या कारवाईमुळे गॅस वितरणातील गैरप्रकारांवर आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, नागरिकांनीही जबाबदार भूमिका बजावत प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# भाजप सरकारचा लोकशाहीला गळफास !

जनमाध्यम प्रतिनिधी

## संविधान दुरुस्तीवर काँग्रेसचा जोरदार हल्ला



यवतमाळ - केंद्रातील भाजप सरकार लोकशाही मूल्यांची पायमल्ली करत असून संसदेत विरोधकांचा आवाज दडपून हुकूमशाही पद्धतीने कारभार चालवित आहे, असा गंभीर आरोप माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी यवतमाळ येथील विश्रामगृहात घेतलेल्या पत्रकार परिषदेत केला. संविधानात एकतर्फी दुरुस्ती करण्याचा भाजपचा प्रयत्न देशासाठी धोकादायक असल्याचे सांगत देशमुख म्हणाले की, कोणतेही विधेयक मांडताना सर्वसंमती आवश्यक असते. मात्र, विरोधकांशी चर्चा न करता विधेयक मंजूर करण्याची घाई ही लोकशाहीची थट्टा आहे.

महिला आरक्षण विधेयकावरूनही त्यांनी सरकारवर टीका केली. 2023 मध्ये मंजूर झालेल्या या विधेयकाची अंमलबजावणी अद्याप स्पष्ट नसून, निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून महिलांना केवळ आश्वासनांचे गाजर दाखवण्यात आले असा आरोप त्यांनी केला. अमरावतीचे माजी महापौर मिलिंद चिमोटे यांनी जातीय जनगणनेच्या मुद्द्यावर केंद्र सरकारला लक्ष्य केले. 2021 ची जनगणना अद्याप का झाली नाही? सरकार कोणती आकडेवारी लपवत आहे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सातत्याने जातीय जनगणनेची मागणी केली असल्याचेही त्यांनी नमूद केले.जिल्हाध्यक्ष प्रफुल मानकर यांनी भाजपच्या धोरणां विरोधात जिल्हाभर आक्रमक आंदोलन छेडण्याचा इशारा दिला. "संविधान आणि जनतेचे हक्क वाचवण्यासाठी काँग्रेस जनतेच्या न्यायालयात जाणार असे त्यांनी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेला आमदार बाळासाहेब मांगुळकर, अनिल गायकवाड यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वैकुंठ धामात किफायतशीर दरात लाकडं उपलब्ध



जनमाध्यम प्रतिनिधी

राळेगाव - नगर पंचायत राळेगांव च्या वैकुंठ धामात किफायतशीर दरात लाकडं उपलब्ध करुन देण्यात येत आहे. वैकुंठ धामाच्या देखभालीसाठी नपंरा चे वतीने अशोक वामन घनसरवाढ यांची चौकीदार म्हणून नियुक्ती केली आहे. सहपरिवार चोवीस तास वास्तव्य असून स्मशानभूमीत राहण्याची सोय नपंरा ने केली आहे.

इतर वेळी जंगलातून, विकत घेतलेली लाकडे आणून किफायतशीर दरात दहनविधी साठी नातेवाईकांना उपलब्ध करुन देण्यात आल्यानं चांगली सोय जागेवरच झाली आहे. दहना साठी लाकडे रचून देणं, तिसऱ्या दिवशी रक्षा जमा करुन देणं ही कामं यात सामील आहे. या व्यतिरिक्त परिसरात साफसफाई करणे, झाडांची निगा राखणं, पाणी देणे, ही कामे चांगल्या प्रकारे होतं आहे. पालकमंत्री संजय राठोड यांनीही मोक्षधाम सोंदर्यीकरण कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्धकरून दिल्याने कॉक्रीट दहनशेड, विद्युतरोषणाई सह बरीच आवश्यक कामे पूर्णत्वास जात असल्याने मोक्षधाम परिसराचा चांगलाचं कायापालट झाल्याचे दिसून येत आहे. मॉर्निंग पार्क गृप च्या वतीने स्मशानभूमीत अनेक सोयी सुविधा उपलब्ध करुन दिल्या ने परिसर सर्वांगसुंदर झाला आहे हे विशेष.

# घाटंजीत शेतकऱ्यांच्या शेतातील विद्युत साहित्याची मोठी चोरी

जनमाध्यम प्रतिनिधी

## पोलिसांच्या निष्क्रियतेवर संताप, तक्रार नोंदीत टाळाटाळ! "तक्रार द्या, पण गुन्हा नोंद नाही" म्हणत पोलिसांवर गंभीर आरोप

यवतमाळ - घाटंजी तालुक्यातील कोळी खुर्द व कोळी बुद्रुक परिसरात शेतकऱ्यांच्या शेतातून विद्युत साहित्याची मोठ्या प्रमाणावर चोरी झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. १९ एप्रिलच्या मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी तब्बल १५ पेक्षा अधिक शेतकऱ्यांच्या शेतांवर डल्ला मारत मोटारपंपांना जोडलेल्या विद्युत वायर, पॅनल बोर्ड व स्टार्टर साहित्य लंपास केले.

अडाण नदीच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या या भागातील शेतकरी सध्या तीळ व ज्वारी पिकांच्या अंतिम टप्प्यात होते. मात्र, चोरट्यांनी थेट मोटारपंपांपर्यंत गेलेल्या विद्युत वायरच कापून नेल्याने पाणीपुरवठा पूर्णपणे ठप्प झाला असून उभ्या पिकांवर संकट ओढवले आहे. घटनेनंतर संतप्त शेतकरी तक्रार देण्यासाठी घाटंजी पोलीस ठाण्यात दाखल झाले. मात्र, पोलिसांनी अधिकृत गुन्हा नोंद करण्याऐवजी केवळ शेतकऱ्यांची नावे कागदावर लिहून घेतली, कोणतीही पावती किंवा तक्रारीची अधिकृत प्रत दिली नाही, असा गंभीर आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. विशेष म्हणजे, याच प्रकारची चोरी ९ मार्च रोजीही घडली होती, तेव्हाही पोलिसांकडून अशीच टाळाटाळ झाल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.एकाच रात्री एवढ्या मोठ्या प्रमाणावर चोरी होऊनही पोलिसांकडून कारवाई होत नसल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तक्रारीच नोंद होत नसतील, तर चोरट्यांना मोकळे रान मिळणार नाही का? असा संतप्त सवाल गावकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.दुष्काळी परिस्थितीत कसाबसा उभा केलेला उन्हाळी हंगाम या चोरीमुळे उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावर आहे. अंदाजे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे प्राथमिक चित्र असून, शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी अधिकच वाढली आहे.दरम्यान, या प्रकरणात तात्काळ गुन्हा दाखल करून सखोल तपास सुरू करावा, दोषींना लवकर अटक करावी आणि निष्क्रिय अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी ठाम मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे. सदर प्रकरणात पोलीसांकडून निष्काळजीपणा होत असल्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करण्याची वेळ तर येणार नाही ना अशी प्रतिक्रिया नागरिकांमधून येत आहे.

# अमरावती जिल्ह्यात ६२७ रुग्णांना सुमारे ५.२८ कोटींची मदत

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून आरोग्यसेवेला गती

**अमरावती/क्रा.प्र.**
शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी 'आधार' ठरत आहे. अमरावती जिल्ह्यात आर्थिक वर्षात ६२७ रुग्णांना सुमारे ५ कोटी २८ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले.

त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दाते आदींच्या सहकार्य लाभत आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरित्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे.

**२० गंभीर आजारासाठी मदत**

कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी / रेडिएशन),



अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य दिले जाते.

**सामंजस्य करारातून मदतीचा मार्ग मोकळा**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत.

**आर्थिक वर्षातील मदत**

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. तर, याच कालावधीत अमरावती जिल्ह्यातील ६२७ रुग्णांना सुमारे ५ कोटी २८ लाख ४८ हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून राज्यातील शेकडो गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून उपचारासाठी भक्कम आधार मिळत आहे. सुधारित कार्यपद्धती, तातडीने निर्णय आणि समाजाच्या सहभागामुळे मदतीचा लाभ अधिक वेगाने गरजूंपर्यंत पोहोचत आहे. अधिक माहितीसाठी व सहाय्यासाठी रूग्णांनी १८०० १२३ २२११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

---

## संक्षिप्त




### पोलीस ठाण्यातील वाचनालयाला स्पर्धा पुस्तकांची भेट

**धारणी**-मेळघाटातील अनेक विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करत असले तरी आवश्यक सुविधा आणि दर्जेदार पुस्तकांच्या अभावामुळे त्यांना अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे अनेकांची अधिकारी होण्याची स्वप्ने अपूर्ण राहतात. ही परिस्थिती बदलण्यासाठी सामाजिक बांधिलकी जपत भारतीय जनता पार्टीच्या मेळघाट जिल्हा महिला महामंत्री दुर्गा प्रभुदास बिसंदरे यांनी पुढाकार घेतला आहे.त्यांनी धारणी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या वाचनालयाला स्पर्धा परीक्षांची पुस्तके भेट दिली. यावेळी ठाणेदार अवतारसिंग चव्हाण उपस्थित होते. तसेच विद्यार्थ्यांनी आवश्यक असलेल्या पुस्तकांची यादी सादर करावी, त्यानुसार आणखी स्पर्धा परीक्षांची पुस्तके उपलब्ध करून देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.याशिवाय वाचनालयात अभ्यास करून अधिकारी बनणाऱ्या विद्यार्थ्यास ११,००० चे रोख पारितोषिक देण्यात येईल, अशी घोषणा ठाणेदार अवतारसिंग चव्हाण यांनी केली. तसेच वाचनालयासाठी दोन दैनिक वृत्तपत्रे सुरू करण्याचीही माहिती देण्यात आली.या कार्यक्रमाला प्रभुदास बिसंदरे, जमादार सतीश राठोड तसेच इतर पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

### उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिर

**नांदगाव खंडेश्वर**-स्थानिक एकलव्य धनुर्विद्या क्रीडा अकादमी, एकलव्य गुरुकुल स्कूल व युवा विकास बहुउद्देशीय संस्था, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदगाव खंडेश्वर तालुका क्रीडा संकुल यांच्या विद्यमाने २२ एप्रिल ते १ मे दरम्यान होणाऱ्या विविध खेळांचे व व्यक्तिमत्त्वविकास शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. उद्घाटन सोहळ्याला जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, एसडीओ अनिल भटकर, समाज कल्याण सहायक आयुक्त राजेंद्र जाधवर, ठाणेदार श्रीराम लांबाडे, प्रा. जयंत इंगोले, तालुका क्रीडा अधिकारी शेख सलीम शेख हुसेन आदी उपस्थित राहणार आहे.



### 'विदा' ने पेटवली विद्यार्थ्यांच्या आयुष्यात ज्ञानाची ज्योत

**अमरावती**-व्हिजन इंटेग्रीटी डेव्हलपमेंट असोशिएशनेच्या वतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि ज्ञानसुर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्याने भिमज्योती ज्ञानदान अभियान अंतर्गत विदर्भ एज्युकेशन सोसायटी अमरावती द्वारा संचालित महिंद विद्यालय अमरावती येथे निवासी राहून शिक्षण घेणा-या एकुण ९० गरजु आदिवासी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करून दोन्ही महामानवांची संयुक्त जयंती ख-या अर्थाने ज्ञानाची ज्योत पेटवून उत्साहात साजरी करण्यात आली.प्रास्ताविक संस्थेचे महासचिव शेख नुरुद्दीन यांनी केले.यावेळी महिंद विद्यालयाचे शिक्षक पंजाबराव पाटील, हेमंत वानखडे, वस्तीगृह अधीक्षक सचिन काळपांडे, संस्थेच्या हितचिंतक जया देशमुख,कोषाध्यक्षा अँड. अंकिता पाथरे-वाघमारे, सदस्या प्राची वाघमारे उपस्थीत होते.संचालन प्रितेश वाघमारे यांनी केले. यावेळी व्हिजन इंटेग्रीटी डेव्हलपमेंट असोशिएशनचे पदाधिकारी उपस्थीत होते.

### आज विद्यापीठात प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन

**अमरावती** - संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील जैवतंत्रज्ञान विभाग आणि एसएए टेक्नॉलॉजी (सावरियासेठ ऑटो ॲन्ड ॲग्रो टेक्नॉलॉजी) यांच्या संयुक्त विद्यमाने २३ एप्रिल सकाळी ११:३० वाजता जैवतंत्रज्ञान विभागामध्ये प्लेसमेंट ड्राइव्हचे आयोजन करण्यात आले आहे. मदापुरी (जि. अकोला) येथील 'प्लँट टिश्यू कल्चर लॅब'साठी या प्लेसमेंट ड्राईव्हच्या माध्यमातून पात्र उमेदवारांची निवड केली जाणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जैवतंत्रज्ञान विभागप्रमुख डॉ. अनिता पाटील, प्रमुख अतिथी म्हणून नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, विषय तज्ज्ञ म्हणून वनस्पतीशास्त्र विभागाचे डॉ. के. सी. मोरे, यजुस बायोटेक प्रा. लि., पुणे चे सुधीर लड्ढा, श्रध्दा लड्ढा उपस्थित राहणार आहेत.

---

### विदर्भाचे नंदनवन पर्यटकांसाठी आकर्षण

# महावितरणने सज्ज रहावे-राजेंद्र पवार

## जागतिक वसुंधरा दिनानिमित्त झाडे लावून दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश

**अमरावती/का.प्र.**
सातपुड्याच्या कुशीत वसलेले चिखलदरा हे विदर्भाचे नंदनवन म्हणून ओळखले जाते. या पर्यटनस्थळी वाढत्या पर्यटकांच्या संख्येमुळे विजेसारखी अत्यावश्यक सेवा देण्यात महावितरणची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार असल्याचे प्रतिपादन महावितरणचे संचालक राजेंद्र पवार यांनी केले.



अचलपूर दौऱ्यादरम्यान पवार यांनी चिखलदरा येथील महावितरण कार्यालयाला भेट देत कामकाजाचा आढावा घेतला. दुर्गम भागातील विजेच्या पुरवठ्यात येणाऱ्या अडचणी असंख्य असल्या तरी, त्या अडचणी दूर करण्याच्या दृष्टीने तातडीने प्रयत्न झाले पाहिजे,अश्या स्पष्ट सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. चिखलदरा हे केवळ विदर्भच नव्हे, तर संपूर्ण राज्याचे आकर्षण केंद्र बनत असल्याने येथे पायाभूत सुविधा मजबूत करण्यावर भर देण्याचेही त्यांनी सांगितले.यावेळी महावितरणच्या स्थापत्य विभागासोबत विश्रामगृहाच्या प्रस्तावित आराखड्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. भविष्यात स्काय वॉकसारखे प्रकल्प साकार होणार असल्याने चिखलदऱ्याचे पर्यटन महत्त्व अधिक वाढणार असून, त्यानुसार तयारी करण्याचे निर्देशही देण्यात आले.

२२ एप्रिल 'जागतिक वसुंधरा दिनानिमित्त' संचालक राजेंद्र पवार यांच्या हस्ते चिखलदरा विश्रामगृह परिसरात ११ आंबा व ११ फणसाच्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. तसेच अचलपूर विभागीय कार्यालय परिसरातही वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.या प्रसंगी कार्यकारी अभियंता प्रदीप अंधारे, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) शशांक पोंक्षे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता,प्रशांत फुटाने, प्रमोद खंडारे, उपकार्यकारी अभियंता उमेश राठोड, संजय दातीर,तसेच इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

---

### खोलापूरच्या सरपंच सरला इंगळे यांना दिलासा

# सरपंचपदाची निवडणूक रद्द

**अमरावती/का.प्र.**
मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सरपंचपदाशी संबंधित एका महत्त्वाच्या प्रकरणात अंतरिम दिलासा दिला आहे. याचिकाकर्त्या सरपंच सरला इंगळे यांच्या विरोधातील शासनाचे आदेश तात्पुरते स्थगित करण्यात आले आहेत. त्यामुळे सरला इंगळे ह्या सरपंचपदी कायम झाल्या असून येथे सरपंचपदाकरिता आयोगाने लावलेली निवडणूक देखील रद्द केली आहे.

भातकुली तालुक्यातील खोलापूर येथील अतिक्रमण आणि निधी अपहाराचा ठपका ठेवत अतिरिक्त आयुक्तांनी सरपंच सरला इंगळे यांना अपात्र घोषित केले होते. याविरोधात त्यांनी ग्रामविकास मंत्र्याकडे दाद मागितली असता या प्रकरणात १७ फेब्रुवारी २०२६ रोजी त्यांच्या विरोधातच निर्णय दिला होता. त्यामुळे सरला इंगळे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. यामध्ये ग्रामविकास मंत्र्यांनी दिलेल्या दोन वेगवेगळ्या आदेशांना आव्हान देण्यात आले होते. न्यायालयाने प्राथमिकदृष्ट्या असे नमूद केले की, मंत्र्यांनी दिलेला आदेश अपीलाचा योग्य निकाल वाटत नाही. तसेच अतिरिक्त आयुक्तांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या अहवालावर स्वतंत्र विचार न करता निर्णय घेतल्याचेही दिसून येते. या पार्श्वभूमीवर न्यायालयाने संबंधित सर्व आदेशांना स्थगिती दिली असून प्रकरणाची पुढील सुनावणी २८ एप्रिल रोजी होणार आहे. दरम्यान, थेट सरपंच पदासाठी २८ एप्रिल रोजी जाहीर करण्यात आलेल्या निवडणूक प्रक्रियेलाही न्यायालयाने स्थगिती दिली आहे.

---

### अनियमिततेवर पुरवठा विभागाने कारवाई

# सहा रेशन दुकानांचे परवाने रद्द

**अमरावती/का.प्र.**
अमरावती तालुक्यात रेशन व्यवस्थेत झालेल्या गंभीर अनियमिततेवर पुरवठा विभागाने मोठी कारवाई करत सहा रेशन दुकानांचे परवाने कायमस्वरूपी रद्द केले आहेत. तसेच संबंधित दुकानदारांकडून सुमारे दिड कोटी रुपयांची वसुली करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

पुरवठा विभागाने चांदूर बाजार आणि अमरावती तालुक्यात अतिरिक्त धान्य वितरणात घोळ असल्याच्या संशयावरून सखोल पडताळणी केली.

या तपासात काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात धान्याचा अपहार झाल्याचे उघड झाले. त्यानंतर रेशन दुकानांचीही तपासणी करण्यात आली असता अमरावती तालुक्यातील सहा दुकानांमध्ये गंभीर त्रुटी आढळून आल्या. या प्रकरणात जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे यांनी संबंधित दुकानदारांना नोटिसा बजावल्या होत्या. मात्र, त्यांचे स्पष्टीकरण समाधानकारक नसल्याने बोडणा येथील ए.पी. ठाकरे, देवरी येथील आर. आर. राऊत, शिराळा येथील आशिष राधाकृष्ण शर्मा व अनुप हरीनारायण राठी, उतखेड येथील लोतदाणे आणि शिवणी जहागीर येथील भारत उत्तम राजुरकर यांच्या रेशन दुकानांचे परवाने रद्द करण्यात आले.

यासोबतच संबंधित दुकानदारांकडून सुमारे दिड कोटी रुपयांची वसुली करण्याचे आदेश देण्यात आले असून, रेशन व्यवस्थेत कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार सहन केला जाणार नाही, असा स्पष्ट इशारा प्रशासनाने दिला आहे. अमरावती तालुक्यामध्ये पुरवठा विभागाने केलेल्या या कारवाईमुळे मोठी खळबळ उडाली आहे.


---

# आरटीई' प्रवेशासाठी ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ

## २६२६ जागांसाठी केवळ १२३७ प्रवेश निश्चित

**अमरावती/का.प्र.**
आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. प्राथमिक शिक्षण संचालनालयाने प्रवेश प्रक्रियेसाठी १० दिवसांची म्हणजे ३१ एप्रिलपर्यंत मुदत वाढवली आहे. सद्यस्थितीत जिल्ह्यात २६२६ जागांसाठी केवळ १२३७ प्रवेश निश्चित झाले आहे.

जिल्ह्यातील आरटीई प्रवेशासाठी तब्बल ७ हजार ९६० बालकांचे ऑनलाइन अर्ज प्राप्त झाले. २२७ इंग्रजी शाळांमध्ये आरटीई अंतर्गत प्रवेश स्वीकारले जाणार आहे. याकरिता पुणे येथे ऑनलाईन सोडत काढण्यात आली. यामध्ये २६२६ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून तितकेच विद्यार्थी प्रतीक्षा यादीत आहेत. या विद्यार्थ्यांची यादी १० एप्रिल रोजी प्रसिद्ध करून प्रत्यक्ष प्रवेशाला सुरूवात करण्यात आली होती.




यापूर्वी कागदपत्रांची पडताळणी करून प्रवेश निश्चित करण्याची शेवटची तारीख २० एप्रिल होती. मात्र, आता ही मुदत वाढवून २१ ते ३० एप्रिल २०२६ अशी करण्यात आली आहे. या निर्णयामुळे ज्यांनी अद्याप कागदपत्रे सादर केलेली नाहीत किंवा प्रवेशप्रक्रिया पूर्ण केलेली नाही, अशा पालकांना अतिरिक्त वेळ मिळणार आहे.

---

### मैत्रीच्या मांदियाळीत रंगले स्नेहमिलन

# शाळेचे 'वैभव' परतवण्यासाठी माजी विद्यार्थी सरसावले!

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**
पहिली ते दहावी हा काळ केवळ शिक्षणाचाच नाही, तर आयुष्यभराचे संस्कार आणि जिवलग मित्र देणारा काळ असतो. दहावी नंतर करिअरच्या ओघात मित्र विखुरले जातात, मात्र या विखुरलेल्या मित्रांना पुन्हा एकत्र आणत समाजासमोर एक नवा आदर्श भंडारज येथील लक्ष्मणपुरी विद्यालयाच्या २००५ मधील माजी विद्यार्थ्यांनी ठेवला आहे. विद्यालयाच्या प्रांगणात हा स्नेहसंमेलन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.



व्हॉट्सॲपच्या माध्यमातून एकत्र आलेल्या ६५ पैकी ४९ मित्रांनी आपल्या शाळेत पुन्हा एकदा 'एक दिवसाचा वर्ग' भरवला. या विशेष वर्गासाठी शाळेतील निवृत्त झालेल्या सर्व शिक्षकांना निमंत्रित करण्यात आले होते.आपल्या लाडक्या शिक्षकांचा यथोचित सत्कार करून विद्यार्थ्यांनी त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.अध्यक्ष प्राचार्या ज्योती माकोडे तर प्रमुख उपस्थीतीत माजी प्राचार्य रविंद्र कोकाटे, संस्थेचे अध्यक्ष सुभाष पाटील गिते, अशोक हुरबडे, ओंकार पडोळे, रविंद्र कावरे, देविदास वानखडे, श्याम कळमकर, सुरेश कुकडे, प्रमुख अतिथी मंदा भटकर, शिला गावंडे, चंदा हिरे, वंदना येवले, प्रियंका वाट, ज्ञानेश्वरी खडसे, प्रविण बोके, प्रवीण हुरबडे, अविनाश डाखोरे, स्वप्नील भड, गजानन हुरबड, रामराव बुंदिले, नारायण पडोळे होते. शाळेला पूर्वीचे वैभव प्राप्त करून देण्यासाठी आणि पटसंख्या वाढवण्यासाठी काय प्रयत्न करता येतील, यासाठी सर्व माजी विद्यार्थ्यांनी एकत्रितरीत्या पुढाकार घेण्याचा निर्धार केला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रदीप बोदडे, रणजित इंगळे, महेश ढोक, दिनेश मोरे, निलेश जाधव, अंकुश डोबाळे, दिवाकर जायले, कुलदीप सावरकर, रतन शिंगणे, गोपाल बुंदिले, अमित गव्हाळे, गोविंदा लोळम, अमित काळमेघ, सचिन हुरबडे, अमोल खेडकर, दिलीप तायडे, पवन मंगळे प्रियंका हुरबडे,वैशाली जामनिक,सुजाता जामणिक, भारती फिसके,प्रतिभा राक्षसकर, योगेश्री पडोळे, स्वाती पिंगे, वृषाली हुरबडे, नितल गावंडे, छाया खेकडे, सुचिता बाभुळकर, दीपिका ढोक, सीमा हिवराळे यासह सर्वच माजी विद्यार्थ्यांना मोलाचे सहकार्य केले.

---

### विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेची धुमधाम

# विनाअनुदानित,अनुदानित शाळांकडून पालकांची पैशाची लूट

## गटशिक्षणाधिकाऱ्याना शिवसेना शहरप्रमुखाचा आंदोलनाचा इशारा

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधी**
सध्या येत्या शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशाची लगबग वेगाने सुरु झाली आहे. अशा स्थितीत विविध विना अनुदानित व अनुदानित शाळाही प्रवेश फुल्ल झाल्याच्या नावाखाली अव्वाच्या सव्वा फी मागणी पालकांना करत असल्याचे प्रकार समोर येत आहे. संस्था चालकांकडून होत असलेल्या या फी च्या भस्मसुराला आवरा अन्यथा शिवसेना आंदोलनाचा पवित्रा घेईल असे निवेदन येथील शिवसेना शिंदे गटाचे शहर प्रमुख मुन्ना इसोकार यांनी गटशिक्षणाधिकाऱ्यांना देऊन कारवाई करण्याची मागणी केली आहे.



आपल्या पाल्याचा प्रवेश शिस्तप्रिय व दर्जेदार शिक्षण देणाऱ्या शाळेत व्हावा असे गरीब असो वा श्रीमंत प्रत्येक पालकाला वाटते.त्यासाठी यावर्षीच्या परीक्षा होण्यापूर्वीच पालकांची धडपड सुरु झाली असून प्रत्येकजणांनी आपल्या पसंतीच्या शाळांमध्ये संपर्क सुरु केले आहे. पैसेवाले पालक मागेल टी फी देऊन आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित सुद्धा करून घेत आहेत.के जी एक व केजी दोन या प्राथमिक श्रेणी पूर्व असलेल्या विना अनुदानित काही शाळांचे प्रवेश फुल्ल झाल्याचीही माहिती मिळत आहे. प्रवेश पूर्ण झाल्याचे सांगून पालकांकडून अव्वाच्या सव्वा फी वसुल केल्या जात आहे.प्रवेश पूर्ण झाले असून मॅनेजमेंट कोट्यातून प्रवेश घ्यावा लागेल असे समोर करून पालकांकडून डोनेशन वसुली केल्या जात असल्याचे प्रकार समोर येत आहेत. शाळा संस्थाकडून फी वसुलीचा हा भस्मासूर कुठेतरी थांबवा व पालकांची लूट होऊ नये यासाठी येथील शिवसेनेचे (शिंदे गट) शहर प्रमुख मुन्ना इसोकार यांनी येथील प्रभारी गटशिक्षणाधिकारी शिला आठवले यांच्याकडे शाळांच्या फी वसुलीबाबत तक्रार केली असून विना अनुदानित शाळांच्या फी बाबत मर्यादा असावी व अनुदानित शाळा ची अनधिकृत फी वसुलीवर निर्बंध लावावे याबाबत निवेदन दिले असून आंदोलनाचा इशारा सुद्धा दिला आहे आता शिक्षण विभाग यावर काय कारवाई करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> शाळांच्या फी वसुली बाबत दोन तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.याबाबत चौकशी केल्या जाईल. सर्व शाळांना याबाबत पत्र दिल्या जाईल. नंतर शाळांना भेटी देऊन मुख्याध्यपाकांचे म्हणणे व काही पालकांचे म्हणणे जाणून घेतल्या जाईल. त्यात चुकीचे काही आढळल्यास कारवाई बाबत अहवाल तयार केल्या जाईल.
>
> **शिला आठवले**
> प्रभारी गटशिक्षणाधिकारी, अंजनगाव सुर्जी

# शिक्षकांना निवडणूक कामांची सक्ती: पर्याय हवाच!

**आपला देश लोकशाहीप्रधान देश आहे. त्यामुळे कधी ग्रामपंचायत तर कधी जिल्हा परिषद, कधी नगरपालिका तर कधी विधानसभा–लोकसभा तर कधी पोटनिवडणुका होत असतात. मग त्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात एक स्वतंत्र जिल्हा निवडणूक कार्यालय का नसावे? त्याचे उपकार्यालय प्रत्येक तालुक्यात असावे. या कार्यालयात आवश्यक अशी पदे निर्माण करून त्यासाठी सुशिक्षित बेरोजगार तरुण–तरुणींची भरती करावी. त्यांना संबंधित कामाचे प्रशिक्षण द्यावे. शिक्षकांना निवडणूक कामांची सक्ती करण्यापेक्षा हा पर्याय निश्चित चांगला ठरेल.**

राज्यात सर्वत्र फेब्रुवारी, मार्च, एप्रिल हे महिने म्हणजे दहावी, बारावी व शालेय वर्गांच्या वार्षिक परीक्षांचा आणि लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य घडविणारा अत्यंत महत्त्वाचा काळ. दहावी, बारावी बोर्डाच्या प्रात्यक्षिक ते लेखी परीक्षांच्या आयोजनापासून, पर्यवेक्षक उत्तरपत्रिका तपासणे, मॉडरेटर इ. कामात शिक्षक गर्क असताना सरकार शिक्षकांचे रास्त म्हणणेही ऐकून न घेता, हुकूमशाही पद्धतीने त्यांना बीएलओच्या कामाची केवळ सक्तीच करीत नसून शिक्षकांवर पोलिसात गुन्हेही दाखल करीत आहे.

राज्यात शिक्षकांना कारणे दाखवा नोटीस देणे व पोलिसांत गुन्हे दाखल करणे असे प्रकार होत आहेत. उदा. हिंगोली जिल्ह्यातील एक शिक्षक. सेवानिवृत्तीला अवघे पाच महिने शिल्लक आणि मुळात त्यांना बीएलओची कोणतीच ऑर्डर नसतानाही त्यांनी काम केले नाही म्हणून त्यांच्यावर गुन्हा दाखल केल्याची तक्रार त्यांनी केली आहे. त्या जिह्यात आठ शिक्षकांवर गुन्हे दाखल झाले आहेत. विशेष म्हणजे त्यातील अनेक शिक्षक बोर्डाच्या परीक्षेच्या कामात आहेत.

परळी-वैजनाथ येथील एका शाळेत अनेक वर्गांना एकाच शिक्षक. तोच शिपाई, तोच अध्यापक आणि तोच मुख्याध्यापकसुद्धा शाळा झाडून मुलांना शिकविणे, मुख्याध्यापक म्हणून वरिष्ठांकडे दररोज अनेक अहवाल पाठविणे, असलेल्या सर्व वर्गांच्या परीक्षांचे नियोजन करणे, परीक्षा घेणे, उत्तरपत्रिका तपासून परीक्षेचा निकाल तयार करणे इ. कामातून भरडून जात आहे. ही वस्तुस्थिती कळवूनदेखील त्या शिक्षकाला बीएलओची सक्ती करणे, एवढेच नाही तर त्याला करणे दाखवा नोटीस देणे, गुन्हा दाखल करण्याची भाषा वापरणे याला काय म्हणावे? अनेक वर्गांना एकच शिक्षक आहे. तोही जर बीएलओच्या कामासाठी गेला तर शाळेला कुलूप लावायचे का? आणि शाळा बंद ठेवून विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे काय? अशा अधिकाराची नशा डोक्यात शिरलेल्या अधिकाऱ्यांच्या कथा राज्यातील अनेक जिल्ह्यांत घडत असल्याच्या तक्रारी आहेत.

शिक्षकांना निवडणुकीसंबंधी कामे देण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने एका निर्णयात परिच्छेद ३२ मध्ये तत्त्वतः मान्य करून दिशादर्शक म्हटले आहे की, शिक्षकांना निवडणुकीसंबंधी कामे देणे अपरिहार्यच असेल तर ते फक्त शाळेला सुट्टी असेल, अध्यापनाचे काम नसेल त्याच वेळी द्यावे. शाळा व अध्यापनाचे काम सुरू असताना देऊ नये. अशाच प्रकारे निर्भयसिंग व इतर विरुद्ध उत्तर प्रदेश शासन दिनांक ११ ऑगस्ट २०२२ या निर्णयात आणि मुंबई उच्च न्यायालयाने एका निर्णयात म्हटले आहे की, राज्य अधिकाऱ्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा आदर न करता शिक्षकांना शाळा सुरू असताना ही कामे देणे चूक आहे. याशिवाय RTE म्हणजे बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा



अधिकार अधिनियम २००९ मधील कलम २७ नुसार शिक्षकांना अशैक्षणिक कामे करण्यासाठी नियुक्त करण्यास मनाई करण्यात आलेली आहे. एवढे नाही तर, उपसचिव, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक २३ ऑगस्ट २०२४ रोजी निर्गमित केलेला शासन निर्णय (क्रमांक संकीर्ण – २०२३/ प्र. क्र./ ५०६/टीएनटी–१, मंत्रालय, मुंबई ३२) याचे अवलोकन तरी करा. या आदेशात शिक्षकांची अशैक्षणिक कामं नेमकी कोणती ते स्पष्ट करण्यासाठी परिशिष्ट ब यात म्हटले आहे की, प्रत्यक्ष निवडणुकीच्या वेळी आवश्यक कामाव्यतिरिक्त निवडणूकविषयक नियमित चालणारी कामे ही अशैक्षणिक कामे असून ती कामे शासनाच्या कोणत्याही विभागाकडून शिक्षकांना बंधनकारक करण्यात येऊ नये. राज्य शासनाचा इतका सुस्पष्ट आदेश असूनही याकडे मुद्दाम दुर्लक्ष करून कायदा, न्यायालय निर्णय या सर्वांना झुगारून मनमानी करणाऱ्यांवर शासनाने आणि शिक्षक संघटनांनी न्यायालयात याचिका दाखल करायला हवी, अन्यथा गुणवत्तापूर्ण, दर्जेदार शिक्षण हे कागदावरचे विशेषण ठरेल. शिक्षणावर शासन करीत असलेला कोटय़वधींचा निधी व्यर्थ जाईल. राज्यातील लाखो बालके 'शिक्षण म्हणजे काय रे भाऊ?' असाच आर्त प्रश्न विचारतील. मात्र तेव्हा वेळ निघून गेलेली असेल.

आपला देश लोकशाहीप्रधान देश आहे. त्यामुळे अगदी वर्षभर, कधी ग्रामपंचायत तर कधी जिल्हा परिषद, कधी नगरपालिका तर कधी विधानसभा-लोकसभा तर कधी पोटनिवडणुका होत असतात. मग त्यासाठी प्रत्येक जिह्यात एक स्वतंत्र जिल्हा निवडणूक कार्यालय का नसावे? त्याचे उपकार्यालय प्रत्येक तालुक्यात असावे. या कार्यालयात शिपाई, क्लार्क, अधीक्षक इ. आवश्यक अशी पदे निर्माण करून त्यासाठी सुशिक्षित तरुण बेरोजगार तरुण-तरुणींची भरती करावी. त्यांना संबंधित कामाचे प्रशिक्षण द्यावे, जबाबदारी निश्चित करावी. त्यामुळे पुढील लाभ होईल.

- अनेक सुशिक्षित, लायक बेरोजगारांना नोकरी मिळेल.
- निवडणुकीची कामे करण्यासाठी शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांना नियुक्त करणे टळेल.
- जिल्हाधिकारी व त्या कार्यालयातील कार्यभार कमी होऊन उर्वरित काम व्यवस्थित करता येईल.
- निवडणुकीबाबत सर्व काम एकच कार्यालयातून पार पडतील. कारण त्यांना त्याव्यतिरिक्त अन्य कामे नसतील. त्यामुळे अधिक बिनचूक व वेळेवर सर्व कामे होतील.

**प्र. ह. दलाल**

# सिंथेटिक ड्रग्ज; वाढते आव्हान

गेल्या काही दिवसांमध्ये राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर यासारख्या मोठ्या शहरांपर्यंतच नव्हे, तर ग्रामीण भागातील वाड्या-वस्त्यांपर्यंत अमली पदार्थांचे विष पोहोचले आहे. अमली पदार्थांची तस्करी ही केवळ गुन्हेगारी नसून ते एक सुनियोजित ड्रग सिंडिकेट आहे. या जाळ्यामुळे गुन्हेगारी वाढतेच, पण राष्ट्राचे भविष्य असलेली तरुण पिढी शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या उद्ध्वस्त होत आहे. ड्रग्जच्या विळख्यात अडकलेला तरुण केवळ स्वतःचाच नाश करतो, असे नाही तर संपूर्ण कुटुंबाला अंधारात ढकलतो. ही समस्या केवळ कायद्याने सुटणारी नसून त्यासाठी सामाजिक जागृतीची मोठी गरज आहे. अमली पदार्थांच्या व्यापाराचे स्वरूप गेल्या काही वर्षांमध्ये वेगाने बदलले आहे. पूर्वी केवळ नैसर्गिक पदार्थांपुरती मर्यादित असलेली ही नशा आता मेफेड्रोन किंवा एम.डी. सारख्या सिंथेटिक ड्रग्जपर्यंत पोहोचली आहे. लपवून ठेवण्यास सोप्या आणि बनवण्यास स्वस्त असलेल्या या रसायनांनी बाजारात धुमाकूळ घातला आहे. सोशल मीडिया आणि डार्क वेबच्या माध्यमातून या पदार्थांची विक्री अत्यंत गोपनीयरीत्या केली जात आहे. पोलीस प्रशासन आणि नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो (एनसीबी) सातत्याने कारवाया करत असले तरी या जाळ्याची पाळेमुळे खोलवर रुजलेली दिसतात. महाराष्ट्रातील या जाळ्याचे स्वरूप, कारणे आणि त्यावरील उपायांचा आढावा घेऊन यंत्रणांनी पावले उचलणे फार महत्त्वाचे आहे. मुंबई आणि पुण्यासारख्या शहरांमधील वेगवान नागरीकरण अमली पदार्थांच्या प्रसाराला पोषक ठरत आहे. आंतरराष्ट्रीय संपर्क आणि शैक्षणिक केंद्रांमुळे तस्करांचे जाळे विस्तारले असून, आधुनिक पार्टी कल्चर आणि उच्चभ्रू जीवनशैलीच्या आकर्षणापोटी अनेक तरुण या जीवघेण्या व्यसनाच्या जाळ्यात सहज अडकत चालले आहेत.

नार्को-तस्करांनी आता गांजा किंवा चरसऐवजी मेफेड्रोन (एमडी), एलएसडी आणि हेरॉईन यांसारख्या रासायनिक पदार्थांकडे



मोर्चा वळवला आहे. हे पदार्थ कमी प्रमाणात अधिक नशा देतात आणि त्यांचे व्यसन लवकर लागते. नैसर्गिक अमली पदार्थांऐवजी आता घातक सिंथेटिक ड्रग्जचा वापर वाढला आहे. छुप्या प्रयोगशाळांमध्ये तयार होणारे हे स्वस्त पण जीवघेणे ड्रग्ज आरोग्यासाठी अत्यंत विनाशकारी ठरत आहेत. तस्करांचे मुख्य लक्ष्य शाळा आणि महाविद्यालयातील विद्यार्थी असल्यामुळे आता शैक्षणिक संस्थांच्या परिसरात विस्तारणारे जाळे जटिल समस्या बनून राहिली आहे. फॅशन किंवा अभ्यासाचा ताण कमी करण्याचे साधन म्हणून सुरुवातीला मोफत नशा देऊन विद्यार्थ्यांना या जाळ्यात ओढले जाते. एका गुंतागुंतीच्या साखळीद्वारे परदेशातून अमली पदार्थांची तस्करी होते. उत्पादकांकडून माल खरेदी करून आंतरराष्ट्रीय सीमेपार पाठवला जातो. तोच पुरवठादार आणि मुख्य सूत्रधार असतो. अमली पदार्थ विमान, समुद्र किंवा रस्ते मार्गाने छुप्या पद्धतीने देशात आणले जातात. हा माल स्थानिक वितरक मोठ्या प्रमाणात स्वीकारून सुरक्षित ठिकाणी साठवतात. वितरकांकडून लहान साठे घेऊन थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याचे काम फिरत्या विक्रेत्यांसारखे दलाल करतात. हे विक्रेते सर्वसामान्य नागरिकां प्रमाणे राहून समाजात मिसळ तात. त्यामुळे त्यांना ओळखणे कठीण होते. आजचे ड्रग्ज तस्करीचे जाळे तंत्रज्ञानामुळे अधिक हायटेक झाले आहे. होम डिलिव्हरी आणि ऑनलाइन पेमेंटच्या सोयीमुळे अमली पदार्थ थेट तरुणांच्या घरापर्यंत पोहोचत असून, हे छुपे डिजिटल जाळे समाजासाठी मोठे आव्हान ठरत आहे.

ड्रग्जची विक्री आता थेट कोपऱ्यावर न होता टेलिग्राम, व्हॉट्स ॲप आणि डार्क वेबच्या माध्यमातून होते. यामुळे गुन्हेगारांचा मागोवा घेणे पोलिसांनाही कठीण होत आहे. होम डिलिव्हरीसारख्या सोयींमुळे सोशल मीडिया आणि तंत्रज्ञानाचा गैरवापर करून हे जाळे अधिक विस्तारत आहे. अमली पदार्थांवर नियंत्रणासाठी सीमावर्ती भागांमध्ये कडक पाळत, औषध दुकानांचे डिजिटल ट्रॅकिंग आणि खेळांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. जनजागृतीअंतर्गत सोसायट्यांमध्ये दक्षता समित्या स्थापन करून संशयास्पद हालचालींची तक्रार करणे तसेच व्यसनाधीनतेविरुद्धच्या योजनांचा प्रसार केल्यास सामाजिक स्तरावर या जाळ्याचा बिमोड करणे अधिक सुलभ होईल. घरातील वातावरण तणावमुक्त ठेवून रुग्णांना जुन्या व्यसनी मित्रांपासून दूर ठेवण्यासाठी नवनवीन छंद किंवा कामात गुंतवणे हा देखील महत्त्वाचा उपाय ठरतो. संयमी पाठपुरावा आणि योग्य वैद्यकीय उपचार हीच व्यसनमुक्तीची खरी गुरुकिल्ली आहे. व्यसनाधीनतेवर मात करण्यासाठी प्रबोधनात्मक वर्तणूक उपचार अत्यंत प्रभावी ठरतात. समुपदेशनामध्ये वैयक्तिक संवादासोबतच फॅमिली थेरपी महत्त्वाची असते. त्यामुळे कुटुंबातील तणाव कमी होऊन रुग्णाला आधार मिळतो. व्यसनी व्यक्तीला कुटुंबापासून दूर उपचारकेंद्रात ठेवणे, हा अनेकदा अनिवार्य आणि सकारात्मक उपाय असतो.

तिथे तज्ज्ञांच्या देखरेखीखाली २४ तास उपचार मिळतात आणि रुग्ण व्यसनास प्रवृत्त करणाऱ्या वातावरणापासून दूर राहतो.

# कॉर्पोरेट क्षेत्रातील महिलांचे शोषण:एक गंभीर समस्या

नाशिकमधील एका बहुराष्ट्रीय कंपनीत महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण, अश्लील शेरेबाजी आणि मानसिक छळ झाल्याचे प्रकार समोर आले आहेत. धर्मांतर आणि सामाजिक दबाव देखील टाकण्यात आल्याचे उघड झाले आहे. आज ५६ टक्के महिला कर्मचाऱ्यांना मानसिक आजाराचा धोका असल्याचे एका सर्वेक्षणातून समोर आले आहे. कार्पोरेट कर्मचाऱ्यांवर कामाचा इतका ताण असतो की, त्यामुळे त्यांचे मानसिक आरोग्य धोक्यात आले आहे. या कार्यालयीन कामकाजात मोठी स्पर्धा असून टार्गेट पूर्ण करण्यासाठी येथील कर्मचारी जीवाचे रान करतात. त्या कामाच्या ताणाचा परिणाम त्यांच्या कौटुंबिक आयुष्यावर होतो. मुंबई शहर देशातील विविध शहरांमधील ३००० कॉर्पोरेट कर्मचाऱ्यांचा मानसिक आरोग्याच्या दृष्टिकोनातून करण्यात आलेल्या सर्वेक्षणात तब्बल ४८३ कर्मचाऱ्यांना मानसिक आरोग्याचा ठोका असल्याचे लक्षात आले असून त्यापैकी ५६३ महिलांना मानसिक आजाराचा अधिक धोका असल्याचे दिसून आले आहे. एवढेच नव्हे वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून वारंवार अपमानास्पद वागणूक आणि मानसिक छळ केला जातो. पीडित महिलांनी ऑडिओ क्लिप्स, पेन ड्राइव्ह आणि कागदपत्रांच्या स्वरूपात पुरावे सादर केले आहेत.

नाशिक मधील टीसीएस प्रकरणात अनेक महिला कर्मचाऱ्यांना मानसिक आणि शारीरिक छळ करण्यात आला. पिढीतेने दिलेल्या जबाबानुसार मे २००३ मध्ये ट्रेनिंग सुरू असताना ती रूममध्ये एकटी होती तेव्हा वरिष्ठ अधिकारी रझाने तिच्याशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. या छळाबाबत पिढीत येणे हेड यांच्याकडे तक्रार केली असता त्यांनी पिढीतेलाच गप्प राहण्यास सांगितले. त्यांनी रजा दानिश आणि तौशिक यांचा बचाव केला. यामुळे रझा चे धैर्य अधिकच वाढत जात होते आणि तो इतर महिला कर्मचाऱ्यांनाही त्रास देऊ लागला. तक्रारींकडे दुर्लक्ष केल्यामुळे कॉर्पोरेट व्यवस्थापन अशा गुन्ह्यांमध्ये



'मूक भागीदार' बनत असल्याचा आरोप होत आहे. पॉश कायद्याअंतर्गत कंपनी, संस्था आणि कार्यालयासाठी बंधनकारक तरतुदी घालून देण्यात आल्या आहेत. त्यानुसार, प्रत्येक संस्था आणि कंपनीत घ्ण म्हणजे ग्हीर्हेत्म्दर्स्ज्ञ्हे म्दस्स्गा स्थापन करणे बंधनकारक आहे. या समितीकडून महिला कर्मचाऱ्यांनी केलेल्या तक्रारीची चौकशी करते आणि त्यासंदर्भात ९० दिवसांच्या अगोदर निर्णय देणे बंधनकारक असते. महिला कर्मचाऱ्याचा तक्रारीनंतर दोषी आढळल्यास सदर व्यक्तीवर कारवाई करण्याची तरतूद पॉश कायद्यात आहे. पॉश कायदा केवळ दोषींना शिक्षा देण्यासाठी नसून, महिलांना कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण निर्माण करून देण्यासाठी कार्यान्वित करण्यात आलेला आहे.

पॉश कायद्यातील काही महत्वाच्या उणिवा पुढे येत आहेत. अनेक महिलांना कामाच्या ठिकाणी दबाव टाकून नोकरी जाण्याची भीती दाखवली जाते. ज्यामुळे महिला तक्रार देण्यास घाबरतात. कंपनी आणि कार्यालयांमध्ये घ्ण समितीवर व्यवस्थापन नसल्याचे दिसून येते. म्हणून चौकशी निष्पक्ष होत नाही. तसेच दाखल झालेल्या तक्रारींची गोपनीयता ठेवली जात नाही. या समस्येचा सामना करण्यासाठी कॉर्पोरेट कंपन्यांनी कडक धोरणे आखणे आणि महिला कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षित वातावरण तयार करणे आवश्यक आहे.

**प्रा.डॉ. सुधीर अग्रवाल,** वर्धा
मो.९५६१५९४३०६

## विशेष निवेदन

**सर्जक स्वातंत्र्य संघटना**

# सर्जकांच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्या संघटनेचे सभासद व्हा!

***किसानपुत्र आंदोलनाचे रूपांतर सर्जक स्वातंत्र्य संघटनेत करण्यात आले आहे. आता कामाचे स्वरूप विस्तारले आहे. कार्यपद्धतीतही बदल होणार आहे.***

सर्जक म्हणजे गुणाकार करणारा घटक, सर्जक म्हणजे अशी निर्मिती जी पुन्हा निर्मिती करू शकते. शेतकरी आणि स्त्री हे सर्जक घटक आहेत. याशिवाय शास्त्रज्ञ, कलावंत आदी घटक आहेत. याच घटकांनी मानवी विकासात मोठे योगदान दिले आहे. सर्जकांना गुलाम बनवून सत्तेत असलेले किंवा सत्तेच्या अवती भोवती वावरणारे किंवा सत्तेच्या कृपेवर जगणारे घटक भक्षक होत. भक्षकांनी सर्जकांना गुलाम केले आहे. त्यांचे साधन सत्ता राहिले आहे.

सर्जकांची पहिली गरज स्वातंत्र्य असते. ते स्वातंत्र्य हिरावणाऱ्या सर्व व्यवस्था उध्वस्त करणे म्हणजे सर्जकांच्या स्वातंत्र्याला अनुकूल वातावरण निर्माण करणे होय. म्हणून हे आंदोलन प्रामुख्याने सरकारकडून येणाऱ्या अडथड्यांकडे बोट दाखवून तो अडथडा दूर करण्याचा प्रयत्न करणार आहे. स्वातंत्र्याचे वातावरण निर्माण करण्याचा संकल्प करून सर्जक स्वातंत्र्य संघटना स्थापन करण्यात आली आहे.

सर्जक स्वातंत्र्य संघटना सर्जकांची संघटना नव्हे. सर्जकांच्या स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्यांची संघटना आहे. जसे किसानपुत्र आंदोलन हे शेतकरी स्वातंत्र्यांचा संकल्प घेऊन पुढे आले होते, तसेच हे आंदोलन सर्जकांच्या स्वातंत्र्याचा संकल्प घेऊन पुढे आले आहे. या आंदोलनाचा एक अजेंडा शेतकरीविरोधी कायदे रद्द करणे हा आहेच. त्याशिवाय स्त्री व अन्य सर्जकांच्या स्वातंत्र्यासाठी देखील असाच एक कलमी कार्यक्रम जाहीर केला जाईल.

आतापर्यंत संघर्ष-रेषा म्हणून वर्गसंघर्ष आणि वर्णसंघर्षाकडे पाहिले गेले. त्या दोन्ही विचारसरणीच्या मर्यादा काळाने स्पष्ट केल्या आहेत. सर्जक आणि भक्षक यांच्यातच खरी संघर्ष-रेषा आहे, असे सर्जक स्वातंत्र्य संघटना मानते. हे या संघटनेच्या विचारसरणीचे नवेपण आहे.

पूर्वीच्या स्वतंत्रतावादी विचारसरणीने केंद्रस्थानी कोणालाच मानले नाही म्हणून ते भरकटत गेले किंवा त्यांच्या चळवळीला टोकदारपणा आला नाही. सर्जक स्वातंत्र्य संघटनेने स्वतंत्रतावादाच्या केंद्रस्थानी 'सर्जकांच्या मुक्तीला' आणून ठेवले आहे. स्वातंत्र्य आणि स्वैराचार असे दोन वेगळे शब्द आहेत. अनेकजण त्यात गफलत करतात. स्वातंत्र्य म्हणजे बांधनातून मुक्ती. स्वातंत्र्यात इतरांचे स्वतंत्र्य जपणे ही जबाबदारीही येते. याची जाणीव सर्जक स्वातंत्र्य संघटनेला आहे.

किसानपुत्र आंदोलनाला १० वर्षे झाली म्हणून २२ मार्च २६ रोजी महाराष्ट्रातील किसानपुत्रांची व्यापक बैठक झाली. त्यात सर्जक स्वातंत्र्य संघटनेची स्थापना करण्यात आली. त्याचं बैठकीत या संघटनेची राज्य कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. नंदकुमार उगले (नाशिक) हे राज्य संयोजक ठरले. काही विभागीय संयोजकांची नावे ठरली. सभासद नोंदणी अभियान सध्या सुरु आहे.

महाराष्ट्रातील बहुतेक बहुतेक जिल्ह्यात जिल्हा संयोजक नेमल्या नंतर एक शिबीर घेण्यात येईल, त्यात जाहीरनामा ठरेल व आगामी कार्यक्रम जाहीर केला जातील. तुम्हाला या कामात सहभागी होण्याची इच्छा असेल तर तुम्ही देखील पंचवार्षिक सभासद फी ? ५००/-(पाचशे रुपये) भरून तुम्ही सुद्धा सर्जक स्वातंत्र्य संघटनेचे सभासद होऊ शकता.


नंदकुमार उगले यांच्या ९४२१५०७६४२ यां क्रमांकावर पैसे पाठवू शकता. पैसे पाठवल्याची पावती सोबत तुमचे नाव, गाव, जिल्हा व मोबाईल नंबर कळवायला विसरू नका.

**अमर हबीब,** आंबाजोगाई
मो.८४११९०९९०९, मो.९४२२९३१९८६

# पुस्तकांची अमूल्य शक्ती ओळखा

जागतिक पुस्तक दिन हा वाचन, पुस्तके, प्रकाशन, लेखकांचा गौरव आणि कॉपीराइट जागृतीला प्रोत्साहन देण्यासाठी साजरा केला जातो. आजही आधुनिक जीवनात पुस्तकांचे महत्त्व अतुलनीय आहे. पुस्तके शिकवतात, प्रेरणा देतात, मनोरंजन करतात आणि आपल्याला वेगवेगळ्या भाषा, संस्कृती व पिढ्या मध्ये जोडतात. जागतिक पुस्तक आणि कॉपीराइट दिनाची मुख्य उद्दिष्ट्ये सर्व वयोगटातील लोकांसाठी पुस्तके अधिक सुलभ करणे, वाचनाच्या सवयीला प्रोत्साहन देणे, प्रकाशन आणि साहित्यिक संस्कृतीला चालना देणे, बौद्धिक संपदेबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि समाजातील प्रत्येक वाचकाला पुस्तके सहज उपलब्ध होतील याची खात्री करणे हे आहेत. पुस्तके कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलता विकसित करतात, भाषा आणि संवाद कौशल्ये सुधारतात, संस्कृती आणि इतिहासाचे जतन करून विविध पिढ्यांमधील वाचकांना जोडतात, आणि शिक्षण घेण्यास व आजीवन शिकण्यास प्रोत्साहन देतात. नियमित वाचनामुळे शब्दसंग्रह, एकाग्रता, आत्मविश्वास आणि विचारशक्ती सुधारतात.

आजचा 'जागतिक पुस्तक दिन' हा पुस्तकांचा आनंद आणि सामर्थ्य साजरे करण्याची एक उत्तम संधी आहे. एखादे नवीन आवडते पुस्तक वाचून, ग्रंथालयांना भेट देऊन, मित्र, नातेवाईक किंवा ओळखीच्या व्यक्तींसोबत पुस्तकांची देवाणघेवाण करून किंवा इतरांमध्ये वाचनाची आवड निर्माण करून हा दिवस साजरा केला पाहिजे. आपल्याला आवडत्या पुस्तकांवर इतरांशी किंवा मित्रांशी चर्चा करावी, आपल्याला ते पुस्तक का आवडते आणि इतर वाचकांनी ते का वाचले पाहिजे, हे स्पष्ट करावे, जेणेकरून इतर



लोकांनाही प्रेरणा मिळेल आणि ते पुस्तक वाचण्याची उत्सुकता निर्माण होईल. चांगल्या पुस्तकांना नेहमी प्रोत्साहन दिले पाहिजे, जेणेकरून दर्जेदार पुस्तके वाचकांपर्यंत सहज पोहोचू शकतील. जो व्यक्ती पुस्तकांशी मैत्री करतो, त्याला यशाच्या मार्गावर जाण्यापासून कोणीही कधीही रोखू शकत नाही, कारण समस्येचे समाधान पुस्तकांमध्येच दडलेले असते. पुस्तके कधीही तक्रार करत नाहीत; ती केवळ ज्ञानाची नदी वाहत ठेवतात. ज्यांनी त्यांना स्वीकारले ते समृद्ध झाले, तर ज्यांनी त्यांचे महत्त्व दुर्लक्षित केले ते मागे पडले.

### जागतिक पुस्तक आणि कॉपीराईट दिन विशेष

आजच्या इंटरनेटच्या युगात पुस्तकांचे स्वरूप डिजिटल झाले आहे, पुस्तके आपल्याला फक्त एका क्लिकवर सहज उपलब्ध होतात, म्हणजेच पुस्तके सहज उपलब्ध असूनही आज वाचनसंस्कृती कमकुवत होत असल्याचे दिसते. तरुण पिढी सोशल मीडियाच्या विळख्यात अडकत आहे, अभ्यासाच्या नावाखाली ते पुस्तकांऐवजी शॉर्टकट नोट्सवर अवलंबून राहणे पसंत करतात. परंतु या शॉर्टकट नोट्स विद्यार्थ्यांना केवळ काही प्रश्नांची मर्यादित उत्तरे देतात आणि त्यांना फक्त नाममात्र पदवी मिळविण्यात मदत करतात. पण जेव्हा एखाद्या विषयाच्या सखोल ज्ञानाचा किंवा जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर त्या ज्ञानाच्या महत्त्वाचा प्रश्न येतो, तेव्हा हेच विद्यार्थी अपयशी ठरतात, कारण या तरुणांनी गहन ज्ञान असलेल्या पुस्तकांचे महत्त्व कधीच समजून घेतलेले नाही किंवा वाचलेले नाही. अशा वातावरणात, जेव्हा जीवनातील परिस्थिती अस्थिर किंवा कठीण होते, तेव्हा माणूस समस्या सहजपणे सोडवण्याऐवजी डगमगतो आणि त्यापासून पळून जातो किंवा पळवाटा शोधतो. त्यामुळे नैराश्य, आत्महत्या, गुन्हेगारी आणि अमली पदार्थांचे व्यसन यांसारख्या समस्या झपाट्याने निर्माण होतात आणि जीवनात अडचणींचा डोंगर उभा राहतो. पुस्तके प्रत्येक अडचणीत आपल्या पाठीशी उभी राहतात, जे त्यांना ओळखतात ते पुन्हा कोणत्याही समस्येत अडकत नाहीत, कारण त्यांना परिस्थितीला कसे सामोरे जायचे हे माहित असते आणि यश त्यांच्या जवळ येत.

सर्वप्रथम, पुस्तके वाचण्याची सवय लावा, वेळेचा सदुपयोग करा, ज्ञानी बना व जागरूक व्हा आणि आयुष्यभर पुस्तकांशी मैत्री टिकवून ठेवा, म्हणजे पुस्तके नेहमी आपल्यासोबत राहतील. आनंदी, समाधानी आणि यशस्वी आयुष्य जगण्याची ही खूप सोपी पद्धत आहे.

**डॉ. प्रीतम भी. गेडाम**
मो.०८२३७४ १७०४१

# शंभर लिटर डिझेल जप्त करून उरळ पोलिसांनी थोपटून घेतली पाठ

## गायगाव परिसरातील मोठ्या रॅकेटकडे दुर्लक्षाचा आरोप

■ प्रतिनिधी | अकोला ■

जिल्हा पोलीस दलाच्या 'ऑपरेशन प्रहार' मोहिमेअंतर्गत उरळ पोलिसांनी अवैध डिझेल साठ्यावर कारवाई करत १०० लिटर डिझेलसदृश्य द्रव्य, रिकामे कॅन आणि वाहनासह एकूण १ लाख ९ हजार ३६८ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. मात्र, या कारवाईनंतरही परिसरात सुरू असलेल्या मोठ्या इंधन चोरी रॅकेटकडे पोलिसांनी दुर्लक्ष केल्याचा आरोप पुढे येत असल्याने या कारवाईवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली २० एप्रिल रोजी उरळ पोलीस स्टेशन हद्दीतील निमकर बसस्थानक परिसरात गुप्त माहितीच्या आधारे छापा टाकण्यात आला. यावेळी विजय गजानन काळे (रा. भरतपूर, ता. बाळापूर) याच्या ताब्यातून १४ कॅन जप्त करण्यात आले. त्यामध्ये ३ कॅनमध्ये प्रत्येकी ३० लिटरप्रमाणे ९० लिटर व एका कॅनमध्ये अंदाजे १० लिटर असे एकूण १०० लिटर डिझेलसदृश्य द्रव्य आढळून आले. तसेच १० रिकामे कॅन व टाटा एस वाहन (क्र. MH-30 BD 2468) असा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला. या प्रकरणी आवश्यक वस्तू अधिनियम तसेच भारतीय न्याय संहितेअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



दरम्यान, उरळ पोलीस हद्दीतील गायगाव डेपो परिसरात मोठ्या प्रमाणावर पेट्रोल-डिझेलची चोरी होत असल्याच्या तक्रारी स्थानिकांकडून सातत्याने करण्यात येत आहेत. या अवैध व्यवहारामागे संघटित टोळी कार्यरत असून, त्यातील काही जणांचा गुन्हेगारी इतिहास असल्याचेही बोलले जात आहे.

अशा परिस्थितीत पोलिसांकडून केवळ १०० लिटर डिझेल जप्त करून कारवाई केल्याचे दाखवले जात असले, तरी प्रत्यक्षात मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या इंधन चोरीकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत अशा तुटपुंज्या कारवाया करून वरिष्ठांची दिशाभूल केली जात असल्याचीही चर्चा रंगली आहे. गायगाव डेपो परिसरातील इंधन साठा चोरी करून काळ्या बाजारात विक्री करणाऱ्या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश करावा, अशी मागणी आता जोर धरत आहे. अन्यथा 'ऑपरेशन प्रहार' ही मोहीम केवळ कागदोपत्री राहील, अशी टीका व्यक्त होत आहे. दरम्यान या आरोपांबाबत पोलीस प्रशासनाची अधिकृत प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

# मुख्यमंत्र्यांनी ओपन डिबेटसाठी वेळ द्यावी; काँग्रेस कार्यकर्त्यांचे खुले आव्हान

■ महिला आरक्षणावरून राजकीय वाद तीव्र

■ चर्चेसाठी तारीख–वेळ जाहीर करण्याची मागणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

महिला आरक्षण विधेयकाच्या पार्श्वभूमीवर राज्यात राजकीय वातावरण तापले असून, काँग्रेस कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जाहीर चर्चेसाठी खुले आव्हान दिले आहे. स्थानिक शासकीय विश्रामगृह येथे मंगळवारी आयोजित पत्रकार परिषदेत ही मागणी करण्यात आली.

काँग्रेसचे प्रशांत गावंडे व अक्षय राऊत यांनी सांगितले की, भाजपने महिला आरक्षण विधेयकाबाबत मोठा गाजावाजा केला असला तरी प्रत्यक्षात हे विधेयक महिलांच्या सक्षमीकरणापेक्षा राजकीय फायद्यासाठी वापरले जात आहे. डी-लिमिटेशन आयोगाच्या माध्यमातून सत्तास्थैर्य साधण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला.



मुख्यमंत्री फडणवीस यांनी नुकतेच या विषयावर विरोधकांना चर्चेचे आव्हान दिले होते. हे आव्हान काँग्रेस कार्यकर्त्यांनी स्वीकारले असून, लवकरात लवकर तारीख, वेळ, ठिकाण व चर्चेची भाषा निश्चित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. भाजपकडून पत्रकार परिषद व सोशल मीडियाच्या माध्यमातून चुकीची माहिती पसरवली जात असल्याचा आरोप करत, विरोधकांना महिला विरोधी ठरवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी म्हटले. दरम्यान, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी यापूर्वीच महिला आरक्षणाला पाठिंबा दर्शविला असून, विद्यमान ५४३ जागांवर तात्काळ आरक्षण लागू करण्यास काँग्रेस तयार असल्याचे स्पष्ट केले आहे.

मुख्यमंत्री व्यस्त असल्यास स्थानिक भाजप प्रतिनिधींनी चर्चेत सहभागी व्हावे, असेही आवाहन करण्यात आले. यासाठी खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर तसेच इतर नेत्यांनी पुढे यावे, अशी मागणीही पत्रकार परिषदेत करण्यात आली.

यापूर्वी २० एप्रिल रोजी भाजप जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क साधून चर्चेसाठी वेळ मागितली होती. त्यांनी वेळ कळवण्याचे आश्वासन दिले असले तरी अद्याप कोणतीही प्रतिक्रिया मिळालेली नसल्याचा दावा काँग्रेस कार्यकर्त्यांनी केला. दरम्यान, भाजपकडून चर्चेला प्रतिसाद न दिल्यास जनतेची दिशाभूल होत असल्याचा निष्कर्ष काढावा लागेल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

# क्रीडा संकुलातील बेफिकिरीचा कळस; खेळाडू संतप्त

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

शहरासह ग्रामीण भागातील शेकडो खेळाडू दररोज क्रीडा संकुलात सरावासाठी येत असले तरी येथे मूलभूत सुविधांचा गंभीर अभाव असल्याचे चित्र समोर आले आहे.

उन्हाळ्याचा कडाका वाढत असताना थंड पिण्याच्या पाण्याची कोणतीही व्यवस्था नसल्याने खेळाडूंना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. ग्रीझर बंद असल्याने गरम पाणी पिण्याची वेळ येत असून, आरोग्याच्या समस्या उद्भवण्याची भीती व्यक्त होत आहे. कबड्डीपटूंना

**मूलभूत सुविधांचा अभाव;**
**दोन दिवसांत तोडगा न निघाल्यास आंदोलनाचा इशारा**




सरावासाठी आवश्यक असलेली माती उपलब्ध करून दिली जात नसल्याने सरावात अडथळे निर्माण होत आहेत. योग्य सुविधा नसल्यामुळे अनेक होतकरू खेळाडूंचा सराव खंडित होत असून, त्यांच्या प्रगतीवर परिणाम होत असल्याची खंत व्यक्त होत आहे. क्रीडा संकुलातील कर्मचारी नियमितपणे उपस्थित राहत नसल्याने परिसरात अनधिकृत वावर वाढला आहे.

त्यामुळे सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून, कोणतीही अनुचित घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. 'खेळाडूंच्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष का?' असा सवाल उपस्थित करत खेळाडूंनी प्रशासनावर संताप व्यक्त केला आहे. या संदर्भात खेळाडूंनी जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांकडे लेखी निवेदन सादर करून दोन दिवसांत सर्व समस्या सोडवण्याची मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. आता प्रशासन याकडे गांभीर्याने लक्ष देणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## सौ.दीप्ती अग्रवाल यांना राज्यस्तरीय कर्तृत्व महिला शिखर रत्न पुरस्कार

**अकोला :** महानगरातील रहिवासी सौ.दीप्ती अग्रवाल यांना सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बद्दल यंदाचा राज्यस्तरीय कर्तृत्ववान महिला शिखर पुरस्कार २०२६ ने गौरविण्यात आले. युवा विचारपीठ प्रतिष्ठानाच्या वतीने आयोजित या सोहळ्यात प्रमुख पाहुण्यांसह आदी उपस्थित होते. मान्यवरांच्या उपस्थितीत यावेळी सौ दीप्ती अग्रवाल यांना सन्मानित करण्यात आले.

# तेल्हारा पालिकेत दलित वस्तीवर अन्यायाचे आरोप

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

- मालमत्ता हस्तांतरण रखडल्याने नागरिक त्रस्त
- पाढरी प्रश्नावर राजकीय पक्ष एकवटले
- प्रशासनाने ठोस भूमिका घ्यावी, नागरिकांची मागणी

भाजपाची सत्ता असलेल्या तेल्हारा नगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या पांढरी भागातील दलित वस्तीत राहणाऱ्या नागरिकांवर अन्याय होत असल्याचा गंभीर आरोप पुढे आला आहे. मालमत्ता हस्तांतरणाची प्रक्रिया अद्याप पूर्ण न झाल्यामुळे येथील रहिवाशांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत असून मूलभूत सुविधांपासूनही ते वंचित राहिले आहेत.

नगरपालिकेच्या हद्दीत समावेश होऊनही संबंधित भागातील मालमत्तेचे अधिकृत हस्तांतरण रखडल्याने रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता यांसारख्या अत्यावश्यक सुविधांवर परिणाम झाला आहे. 'मालमत्तेचे हस्तांतरण झाल्याशिवाय विकासकामे होऊ शकत नाहीत,' अशी भूमिका स्थानिक प्रशासनाकडून घेतली जात असल्याचे समोर आले आहे. परिणामी नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

या प्रश्नावर नगरपरिषद सदस्या कान्होपात्रा रामभाऊ फाटकर यांनी सुरुवातीपासून पाठपुरावा करत पत्रव्यवहार केला आहे. मुख्याधिकाऱ्यांनीही दखल घेत सर्वेक्षणासाठी कर्मचारी पाठविले होते; मात्र काही अडथळ्यांमुळे सर्वेक्षण पूर्ण होऊ शकले नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे मालमत्ता हस्तांतरणाचा प्रश्न अजूनही प्रलंबित राहिला आहे.

दरम्यान, पांढरी येथील दलित नागरिकांवर होत असलेल्या कथित अन्यायाविरोधात विविध राजकीय पक्ष कवटल्याचे चित्र दिसत आहे. नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर गदा येत असल्यास प्रशासनाने तातडीने ठोस व निष्पक्ष भूमिका घेणे आवश्यक असल्याची मागणी जोर धरत आहे.

**संविधानिक हक्कांचे संरक्षण गरजेचे**

भारतीय संविधानाने नागरिकांना स्वातंत्र्य, समानता आणि न्यायाचे मूलभूत हक्क दिले आहेत. या हक्कांवर कुठल्याही प्रकारे गदा येत असल्यास प्रशासनाने संवेदनशीलता दाखवत त्वरित हस्तक्षेप करणे अपेक्षित आहे. यासंदर्भात तेल्हारा विकास मंचाचे अध्यक्ष रामभाऊ फाटकर म्हणाले, 'नागरिकांच्या हक्कांवर शासनकर्त्यांकडून आघात होत असेल, तर प्रशासनाने संविधानाचे रक्षणकर्ते म्हणून ठोस पावले उचलली पाहिजेत.' पांढरी भागातील प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावून नागरिकांना न्याय मिळवून देण्याची मागणी आता जोर धरत असून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे तातडीने लक्ष देण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# लग्नमंडपातच 'सोने चोरी'चा बनाव

## वधू पक्षाचा काढता पाय, वरपक्षाची पोलिसांत तक्रार

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील बाभुळगाव परिसरात एका लग्नसमारंभात नाट्यमय घडामोड घडल्याचे समोर आले आहे. वधू पक्षाने सोने चोरी गेल्याचा बनाव करून ऐनवेळी लग्नमंडपातून काढता पाय घेतल्याची धक्कादायक घटना बुधवारी (दि. २१ एप्रिल ) उघडकीस आली. या प्रकरणी वरपक्षाने एमआयडीसी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अमरावती जिल्ह्यातील चांदूरबाजार येथील ठाकरे परिवारातील युवतीचे अकोला येथील चौधरी परिवारातील युवकासोबत लग्न जुळले होते. दोन्ही कुटुंबांच्या संमतीने आणि पारंपरिक पद्धतीने लग्नाची सर्व तयारी पूर्ण करण्यात आली होती. बाभुळगाव परिसरातील मंगल कार्यालयात मोठ्या उत्साहात लग्नसोहळा पार पडत असताना अचानक घडलेल्या या प्रकारामुळे उपस्थितांमध्ये एकच खळबळ उडाली.

वरपक्षाच्या म्हणण्यानुसार, लग्नाच्या अनुषंगाने वधूसाठी सुमारे अडीच लाख रुपयांचे सोन्याचे दागिने खरेदी करून देण्यात आले होते. तसेच लग्न समारंभासाठी सुमारे तीन लाख रुपयांचा खर्चही करण्यात आला होता. मात्र, लग्नाच्या विधीपूर्वी वधूच्या अंगावर ते दागिने दिसत नसल्याने वरपक्षाने याबाबत चौकशी केली.

यावेळी वधूपक्षाने 'सोने चोरीला गेले' असा दावा करत गोंधळ उडवून दिला. मात्र, वरपक्षाने या दाव्यावर संशय व्यक्त करत अधिक माहिती विचारताच वधूपक्षाने अचानक मंडप सोडून निघून गेल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे लग्नसोहळा अक्षरशः अर्धवटच राहिला.

या प्रकारामुळे वरपक्षाची आर्थिक व मानसिक फसवणूक झाल्याचा आरोप करण्यात आला असून, संबंधित वधूपक्षाविरुद्ध कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. एमआयडीसी पोलिसांनी तक्रार नोंदवून घेतली असून, नेमका प्रकार काय घडला याचा तपास सुरू असल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले. दरम्यान, या घटनेमुळे शहरात विविध चर्चा रंगू लागल्या असून लग्नसमारंभात घडलेल्या या अनपेक्षित प्रकारामुळे नातेसंबंधातील विश्वासावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# दहिगाव रोडवर भीषण अपघात; एकाचा जागीच मृत्यू

## एक गंभीर जखमी



■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

तालुक्यातील वाडी अदमपूर ते जाफरापूर-दहिगाव मार्गावर सोमवारी सायंकाळी सुमारे ५ वाजताच्या सुमारास झालेल्या भीषण अपघातात एका व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

प्राप्त माहितीनुसार, कालखेड येथील रमेश भाऊ महादेव रावजी गुरव (वय ४५) हे आपल्या भावाच्या मुलाची लग्नपत्रिका देण्यासाठी तुदगाव येथे गेले होते. तेथून परतत असताना त्यांच्या सोबत पातुर्डा येथील युवाई हरिभाऊ बाबन पुंडे हे होते. जाफरापूरपासून सुमारे एक किलोमीटर अंतरावर दहिगाव रोडवर माती वाहून नेणाऱ्या अज्ञात ट्रॅक्टरने त्यांच्या मोटारसायकलला जोरदार धडक दिली.

या अपघातात रमेश गुरव यांचा जागीच मृत्यू झाला. तर युवाई पुंडे हे गंभीर जखमी झाले असून त्यांना पुढील उपचारासाठी अकोला येथे हलविण्यात आले आहे.

अपघातानंतर ट्रॅक्टर चालक घटनास्थळावरून फरार झाला. रात्री उशिरापर्यंत पोलिसांनी ट्रॅक्टर मालक व चालकाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, मात्र तो निष्फळ ठरला. या प्रकरणी अज्ञात ट्रॅक्टर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास तेल्हारा पोलीस करत असून, अपघातामुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

# महाराष्ट्र प्रादेशिक मारवाडी सम्मेलनची प्रांतीय कार्यकारिणीची सभा संपन्न

**अकोला :** राजस्थानी समाजाच्या सेवेत सक्रिय महाराष्ट्र प्रादेशिक मारवाडी सम्मेलनाची द्वितीय प्रांतीय कार्यकारिणी सभा नुकतीच जालनेत यशस्वीपणे पार पडली.

प्रांतीय अध्यक्ष निकेश गुप्ता यांच्या अध्यक्षतेत व मारवाडी सम्मेलन जालना यांच्या आतिथ्यात आयोजित या सभेला राज्याचे माजी मंत्री व सम्मेलनाचे माजी अध्यक्ष रमेशचंद्र बंग (नागपूर), माजी मंत्री व माजी अध्यक्ष जयप्रकाश मुंदडा (बसमत नगर), राष्ट्रीय समन्वयक वीरेंद्रप्रकाश धोका (जालना) प्रांतीय महामंत्री सुदेश करवा यांची उपस्थिती होती. त्यांनी आपल्या अनुभवांद्वारे सभेला मार्गदर्शन केले.सभेचा प्रारंभ मनीष तवरावाला यांच्या स्वागत उद्बोधनाने झाला. त्यानंतर प्रांतीय अध्यक्ष निकेश गुप्ता यांनी अध्यक्षीय प्रस्तावना सादर करून गेल्या वर्षातील कामगिरीचा विस्तृत अहवाल मांडला आणि पुढील योजनांचा आराखडा सभासमोर ठेवला.

# थकित मालमत्ता करावर १००टक्के शास्ती माफीला मुदतवाढ

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला महानगरपालिकेच्या शास्ती अभय योजनेला मुदतवाढ देत प्रशासनाने शहरातील मालमत्ता धारकांना मोठा दिलासा दिला आहे. यापूर्वी दि. २० एप्रिलपर्यंत लागू असलेली थकबाकीवरील शास्ती (दंड) माफी योजना आता दि. ३० एप्रिल २०२६ पर्यंत वाढविण्यात आली असून, या कालावधीत १०० टक्के शास्ती माफीचा लाभ मिळणार आहे.

महानगरपालिकेकडून राबविण्यात येणाऱ्या या योजनेचा उद्देश थकित मालमत्ता कराची वसुली वाढविणे आणि नागरिकांना आर्थिक दिलासा देणे हा आहे. अनेक नागरिकांनी या योजनेचा लाभ घेतला असला तरी काही मालमत्ता धारक अद्याप बाकी असल्याने त्यांच्या सोयीसाठी मुदतवाढ देण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

महानगरपालिकेने आवाहन केले आहे की, ज्या मालमत्ता धारकांनी अद्याप थकबाकी भरलेली नाही, त्यांनी त्वरित एकरकमी कर भरून १०० टक्के शास्ती माफीचा लाभ घ्यावा. ही योजना मर्यादित कालावधीसाठीच उपलब्ध असल्याने अंतिम मुदतीपूर्वी संधी साधावी, असेही प्रशासनाने नमूद केले. दरम्यान, या निर्णयामुळे करदात्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, महानगरपालिकेच्या महसुलातही वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# घंटागाडी शुल्कवाढीविरोधात वंचित बहुजन आघाडीचे आंदोलन सुरू

## किताब घर चौकातून स्वाक्षरी अभियानाला प्रारंभ ; ठराव मागे घेण्याची मागणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला महानगरपालिकेने मंजूर केलेल्या घंटागाडी (घनकचरा व्यवस्थापन) सेवेसाठी ६०० शुल्कवाढीच्या विरोधात वंचित बहुजन आघाडीने आंदोलनाचा श्रीगणेश केला आहे. अकोला पूर्वच्या वतीने मंगळवारी किताब घर चौकातून स्वाक्षरी अभियानाला सुरुवात करण्यात आली. या आंदोलनाचे नेतृत्व जिल्हाध्यक्ष प्रमोद देडवे यांनी केले. यावेळी जिल्हा महासचिव मिलिंद इंगळे, गटनेते निलेश देव, मनोहर बनसोड, प्रदीप खंडारे, संजय वानखेडे, मुकुंदराव सातपुते, प्रदीप शिरसाट, राजेश मोरे, आशिष सोनोने, दामोदर जगताप, दिलीप मोहोड, सुनील इन्नाणी, पराग गवई यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आंदोलनकर्त्यांनी नागरिकांशी संवाद साधताना सांगितले की, शहरातील अनेक भागांत घंटागाडी सेवा नियमित व समाधानकारक नाही. अशा परिस्थितीत थेट ६०० शुल्कवाढ करणे



अन्यायकारक असून, नागरिकांवर आर्थिक भार टाकणारे आहे. तसेच, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ९९ ते १०१ तसेच १५२ व १५३ नुसार शुल्कवाढीसाठी आवश्यक असलेली प्रक्रिया—सार्वजनिक नोटीस देणे व नागरिकांकडून हरकती मागविणे—पालन न केल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. विरोधी सदस्य निलंबित असताना घेतलेला हा निर्णय लोकशाही मूल्यांना बाधा देणारा असल्याचेही नमूद करण्यात आले.

**मुख्य मागण्या:**

घंटागाडी शुल्कवाढीचा १३ एप्रिलचा ठराव तात्काळ स्थगित करावा, तो पूर्णतः रद्द करावा, सेवा नियमित करूनच पुढील निर्णय घ्यावा, नागरिकांकडून हरकती मागवाव्यात आणि कायदेशीर तरतुदींचे पालन करावे, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्या.

दरम्यान, आंदोलनाचा पुढील टप्पा म्हणून अकोला पूर्वमधील सर्व प्रभागांत स्वाक्षरी अभियान राबविण्यात येणार असून, प्रशासनाने निर्णय मागे न घेतल्यास तीव्र जनआंदोलन छेडण्याचा तसेच उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्याचा इशाराही वंचित बहुजन आघाडीने दिला आहे.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १३९
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

### उष्णतेच्या संकटावर राज्य सज्ज, नागपूरमध्ये 'सेंटर ऑफ एक्सलन्स' चा शुभारंभ

# शाश्वत शीतकरण व हीट ॲक्शन प्लॅनवर भर : मुख्यमंत्री

**मुंबई/जनमाध्यम**

हवामान बदलामुळे वाढत्या उष्णतेच्या संकटाचा सामना करण्यासाठी राज्य सरकारने ठोस पावले उचलण्यास सुरुवात केली असून, नागपूर येथे उष्णता प्रतिसादक्षम व शाश्वत शीतकरणासाठी सेंटर ऑफ एक्सलन्स' सुरू करण्यात आले आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे इंडियन इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट नागपूर येथे उभारण्यात आलेल्या या केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.मुख्यमंत्री फडणवीस



म्हणाले, की विदर्भासह राज्यातील अनेक भागांत उष्णतेच्या लाटेमुळे परिस्थिती गंभीर होत आहे. त्याचा सर्वाधिक फटका शेतीला आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना बसत आहे. या पार्श्वभूमीवर उष्णलाट कृती आराखडा अधिक सक्षम करण्यासाठी तसेच शहरी हवामान नियोजन सुधारण्या साठी हे केंद्र महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.राज्यातील शहरे व जिल्ह्यांना तांत्रिक सहाय्य देणे, अधिकारी व आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे, तसेच उष्णतेच्या परिणामांवर संशोधन करणे, ही या केंद्राची प्रमुख उद्दिष्टे असतील. याशिवाय, राज्य सरकारने ऊर्जा क्षेत्रातही मोठी उद्दिष्टे ठेवली असून २०३० पर्यंत ५२ टक्के ऊर्जा नवीकरणीय स्रोतांतून आणि २०३५ पर्यंत ६५ टक्के ऊर्जा अपारंपरिक स्रोतांतून मिळवण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांसाठी सौर ऊर्जेवर आधारित वीज पुरवठा वाढवण्यावरही भर देण्यात येत आहे.

दरम्यान, मनीष बापना, अध्यक्ष, नैसर्गिक संसाधन संरक्षण परिषद यांनी या उपक्रमाचे स्वागत करत नागपूरमधील हे केंद्र आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्वाचे ठरेल, असे मत व्यक्त केले.

नागपूरसारख्या शहरांमध्ये दरवर्षी तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या पुढे जात असल्याने नागरिकांच्या आरोग्य, पाणी व वीज वापरावर त्याचा मोठा परिणाम होतो. या पार्श्वभूमीवर हे केंद्र संशोधन, प्रशिक्षण आणि धोरणात्मक मार्गदर्शनाद्वारे उष्णतेवर प्रभावी उपाय सुचवणार आहे.राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेच्या माध्यमातून मिहान, नागपूर येथे हे केंद्र कार्यरत राहणार असून, भविष्यात राज्यातील उष्णतेच्या संकटावर मात करण्यासाठी ते मार्गदर्शक ठरणार आहे.

## प्रधानमंत्री आवासचे हप्ते रखडले लाभार्थी आर्थिक अडचणीत

**साहूर/जनमाध्यम**

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मंजूर घरकुलांचे हप्ते रखडल्याने साहूर व परिसरातील अनेक लाभार्थी आर्थिक संकटात सापडले आहेत. घरकुलांचे बांधकाम पूर्ण होऊनही शेवटचा हप्ता मिळालेला नसल्याने लाभार्थ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

साहूर परिसरातील अनेक कुटुंबांना या योजनेअंतर्गत घरकुल मंजूर करण्यात आले. शासनाकडून पहिला, दुसरा आणि तिसरा हप्ता वितरित करण्यात आला. या निधीच्या आधारे लाभार्थ्यांनी घरकुलांचे बांधकाम पूर्ण केले. मात्र, अंतिम हप्ता अद्याप मिळालेला नसल्याने लाभार्थ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.घर पूर्ण करण्यासाठी अनेकांनी नातेवाईक व परिचितांकडून उसनवारीने पैसे घेतले. अंतिम हप्ता वेळेत मिळेल, या अपेक्षेवर बांधकाम पूर्ण करण्यात आले. परंतु, अनुदान रखडल्याने कर्जफेडीचा ताण वाढला असून कर्जदारांकडून परतफेडीसाठी दबाव वाढत आहे.यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांकडे चौकशी केली असता, शासनाकडून निधी उपलब्ध झाला नसल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे लाभार्थ्यांची प्रतीक्षा अधिकच लांबली आहे.दरम्यान, या प्रश्नाची दखल घेत खासदार अमर काळे यांनी केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चव्हाण यांच्याकडे निवेदन देऊन रखडलेले हप्ते तात्काळ वितरित करण्याची मागणी केली आहे.घरकुल लाभार्थ्यांनी शासनाने लवकरात लवकर अनुदान उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी केली असून, या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## औद्योगिक गावात 'आरोग्य संपन्न' संकल्पनेचा पाया

### देवळीत कुटुंब आरोग्य कार्डाचे मोफत वितरण



**गौळ/जनमाध्यम**

औद्योगिक परिसरात वसलेल्या गावांतील नागरिकांचे आरोग्य सुदृढ ठेवणे हे मोठे आव्हान असले, तरी सामूहिक प्रयत्नांतून ते साध्य होऊ शकते, असा विश्वास आमदार राजेश बकाणे यांनी व्यक्त केला. देवळी येथे जागतिक आरोग्य दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

माझं गाव, आरोग्य संपन्न गाव या अभियानांतर्गत कुटुंब आरोग्य कार्डांचे मोफत वितरण करण्यात आले. एस.एम.डब्ल्यू इस्पात प्रा. लि. यांच्या पुढाकारातून व आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सावंगी (मेघे) यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. राजे छत्रपती शिवाजी महाराज नाट्य सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.अध्यक्षस्थानी आमदार बकाणे होते. प्रास्ताविक एस.एम.डब्ल्यू इस्पातचे संचालक दीपक सुमड यांनी केले. यावेळी राहुल चोपडा, मिलिंद देशपांडे, डॉ. आशिष लांडे, डॉ. मोनाली मामिलवार, श्याम मुंदडा यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. माजी खासदार रामदास तडस यांनीही उपस्थिती दर्शविली.या उपक्रमांतर्गत वितरित करण्यात आलेल्या कुटुंब आरोग्य कार्डामुळे नियमित आरोग्य तपासणी, वैद्यकीय सल्ला आणि उपचार सुविधा सुलभ होणार आहेत.कार्यक्रमातून 'आरोग्य संपन्न गाव' ही संकल्पना प्रत्यक्षात साकार करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. नागरिकांच्या सक्रिय सहभागा मुळे उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचे आयोजकांनी सांगितले.

# बुद्ध पौर्णिमेला 'बोर'मध्ये निसर्गरंग

### ८२ निसर्गप्रेमींची झपाट्याने नोंदणी

**वर्धा/जनमाध्यम**

बुद्ध पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर बोर व्याघ्र प्रकल्पात आयोजित करण्यात येणाऱ्या निसर्ग अनुभव कार्यक्रमाला निसर्गप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. १ मे दुपारी ३ वाजता सुरू होणाऱ्या आणि २ मे सकाळी ८ वाजेपर्यंत चालणाऱ्या या विशेष उपक्रमा साठी २१ एप्रिल दुपारी २ वाजेपर्यंत तब्बल ८२ निसग 'प्रेमींनी ऑनलाईन नोंदणी केली आहे.

वन्यजीव विभागामार्फत बोर व्याघ्र प्रकल्पाच्या बफर व कोअर क्षेत्रातील पाणवठ्यांवर हा निसर्ग अनुभव कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. रात्रीच्या वेळी वन्यजीवांच्या हालचालींचे निरीक्षण, जंगलातील शांतता आणि निसर्गाचा थरार अनुभवण्याची अनोखी संधी या उपक्रमातून मिळणार आहे.मागील वर्षीही या कार्यक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला होता. त्यावेळी ६० हून अधिक अर्ज प्राप्त झाले होते, मात्र मर्यादित मचाण उपलब्ध असल्याने केवळ ३६ जणांनाच सहभागाची संधी मिळाली होती. यंदा हीच परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याने इच्छुकांमध्ये मोठी उत्सुकता दिसून येत आहे.

यावर्षी बफर आणि कोअर क्षेत्रातील एकूण ५ वनपरीक्षेत्रांत हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. यामध्ये हिंगणी बफर, बांगडापूर बफर, हिंगणी कोअर (न्यू बोर अभयारण्य), बोरधरण कोअर आणि कवडस कोअर या क्षेत्रांचा समावेश आहे. या सर्व भागांमध्ये मिळून एकूण ४४ मचाणांवर निसर्गप्रेमींना पाणवठ्यांजवळ बसून वन्यजीवांचे निरीक्षण करता येणार आहे.

या कार्यक्रमासाठी सहभागी होणाऱ्या व्यक्तीचे वय १८ ते ६० वर्षांच्या दरम्यान असणे आवश्यक आहे.

इच्छुकांनी २० ते २२ एप्रिल दरम्यान दुपारी ३ वाजेपर्यंत अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक आहे.बोर व्याघ्र प्रकल्प प्रशासनाकडून नोंदणी प्रक्रियेवर बारकाईने लक्ष ठेवले जात असून, अंतिम निवड ही उपलब्ध मचाणांच्या संख्येनुसार केली जाणार आहे.


त्यामुळे निसर्गप्रेमींमध्ये निवडीची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.दरम्यान, या उपक्रमामुळे निसर्ग पर्यटनाला चालना मिळण्यासोबतच वन्यजीव संवर्धनाबाबत जनजागृती होण्यास मदत होणार असल्याचा विश्वास वन विभागाने व्यक्त केला आहे.

## रेशीम शेतीतून घोराड येथील शेतकऱ्याने साधली आर्थिक प्रगती

**वर्धा/जनमाध्यम**

पारंपारिक शेतीमध्ये वाढलेला खर्च आणि अनिश्चित उत्पन्न यामुळे अनेक शेतकरी हवालदील होत असताना. सेलू तालुक्यातील घोराड येथील पदवीधर असलेले प्रयोगशील शेतकरी विवेक ज्ञानेश्वर माहूरे यांनी मात्र रेशीम शेतीचा यशस्वी प्रयोग राबविला. जिद्द आणि योग्य नियोजनाच्या जोरावर त्यांनी केवळ अडीच एकर क्षेत्रावर रेशीम कोषाचे दर्जेदार उत्पादन घेऊन इतर शेतकऱ्यांसमोर एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

पुर्वी विवेक माहुरे कपाशी, सोयाबीन, तुर ही पिके घेत होते. परंतु खर्च वजा जाता हाती फारसे शिल्लक उरत नसायचे. त्यामुळे आर्थिक उत्पन्न वाढू शकेल यासाठी कोणते पिक स्विकारायचे याचा शोध विवेक माहुरे घेत होते. बीकॉम शिक्षण झाले असल्याने इंटरनेटचे ज्ञान त्यांना होते. त्यांनी युट्युबवर वेगवेगळया शेती बाबत शोध घेतला त्यात अनेक शेतकऱ्यांचे रेशीम शेतीबाबतचे व्हीडीओ त्यांनी पाहिले आणि २०१७ मध्ये रेशीमशेती करण्यास सुरुवात केली.पारंपारीक पीक हे बेभरवश्याचे झाल्यामुळे व उत्पन्न मिळत नसल्याने पारंपारीक पिकाला जोडधंदा म्हणुन एक एकरवर मनरेगा योजनेमधून रेशीम शेती करण्याचे ठरविले. शेतात तुती लागवड करावी लागते. तुतीचे रोपे तयार करणे, किटकांचे संगोपन करण्यासाठी शेडचे बांधकाम, किटक संगोपनाचे साहित्य, त्याची



व्यवस्था याबाबत त्यांना रेशीम कार्यालयाकडून मोग्य मार्गदर्शन मिळाल्याने त्यांचा विश्वास वाढला. त्यांनी शेड बांधकाम केले. अंडीपुंजाचे संगोपन करतांना स्वच्छतेवर विशेष भर दिला. वेळेवर तुतीचा पाला देणे आणि तापमानाचे योग्य नियंत्रण राखणे यामुळे कोशाचा दर्जा सुधारतो, असे सेतकरी विवेक माहुरे सांगतात.शेतकरी विवेक माहुरे सन २०१७ पासून रेशीम शेती करीत आहेत. गेल्या वर्षभरात त्यांनी ९ बॅचेस काढल्या असून अंदाजे ७.५ लक्ष रुपयांचे खर्च वजा जाता निव्वळ नफा मिळाले आहे. चालु वर्षात जानेवारी, फेब्रुवारी व मा च या तीनही महिन्याचे एकुण रेशीम कोषाचे उत्पादन ६५५.७९ किलो ग्रॅम घेतले असून त्यांनी कोष विक्री कर्नाटक राज्यात रामनगरम मार्केटला केली. सद्याच्या बाजारभावानूसार त्यांनी ४ लक्ष ७५ हजार ९६१ रुपयांचे विक्रमी उत्पन्न तीन महिन्यांमध्ये मिळवले आहे. ही किमया फक्त रेशीम शेतीमुळेच होऊ शकली, असे विवेक माहुरे सांगतात. सन २०२२-२३ मध्ये त्यांना तत्कालीन वस्त्रोद्योग मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याहस्ते रेशीम रत्न पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले आहे. रेशीम शेती हा कमी कष्टात आणि शाश्वत उत्पन्न देणारा व्यवसाय आहे. तरुण शेतकऱ्यांनी केवळ पारंपारिक पिकांवर अवलंबून न राहता रेशीम शेतीसारख्या जोडधंद्यांकडे नक्कीच वळावे व प्रत्येक तरुण शेतकऱ्याने किमान एक एकरमध्ये रेशीम शेती करावी, असा मोलाचा सल्ला विवेक माहुरे यांनी दिला आहे.

## गावाला आरोग्य संपन्न बनविण्यासाठी लोक सहभागाची चळवळ उभारावी-पराग सोमण

**वर्धा/जनमाध्यम**

राज्यातील प्रत्येक नागरिकाचे आरोग्यमान उंचाविण्यासाठी आणि ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा घरापर्यंत पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने माझं गाव आरोग्य संपन्न गाव' हे महत्वाकांक्षी अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या अभियानांतर्गत गावाला आरोग्य संपन्न बनविण्यासाठी लोकसहभागाची चळवळ उभी करण्याचे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांनी केले आहे.

ग्रामीण भागातील संसर्गजन्य आणि असंसर्गजन्य आजारांचे प्रमाण कमी करणे, माता व बाल मृत्यूदर शून्यावर आणणे आणि प्रत्येक नागरिकाला प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. अभियान केवळ एक तपासणी मोहीम नसून आरोग्याला ग्रामविकासाच्या केंद्रस्थानी आणणारे एक व्यापक व्यासपीठ आहे, असे पराग सोमण यांनी सांगितले.अभियानाची प्रमुख वैशिष्ट्ये आणि आरोग्य बाबी : क्षयरोग, कुष्ठरोग, डेंग्यू, मलेरिया आणि जलजन्य आजारांचे १०० टक्के निर्मूलन व नियंत्रण करणे. यासारख्या संसर्गजन्य रोगावर नियंत्रण आणणे, २० वर्षावरील प्रत्येक व्यक्तीची मधुमेह, उच्च रक्तदाब आणि कर्करोगासाठी मोफत तपासणी करणे, १०० टक्के संस्थात्मक प्रसूती, गरोदर मातांच्या किमान ४ तपासण्या आणि बालकांचे संपूर्ण लसीकरण सुनिश्चित करणे, स्वच्छता आणि पोषण, शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि कुपोषण निर्मूलनावर अभियानात विशेष भर दिला जाणार आहे. या अभियानात ग्रामपंचायत स्तरावर सरपंच, ग्राम आरोग्य समिती, महिला बचत गट, युवक मंडळ आणि आशा स्वयंसेविका यांचा सहभाग अत्यंत महत्वाचा आहे. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींना आणि आरोग्य संस्थांना आरोग्य संपन्न ग्राम मानांकन देऊन राज्यस्तरावर पुरस्कार व सन्मानचिन्हाने गौरविण्यात येणार आहे.अभियानात सहभागी होण्यासाठी सर्व ग्रामपंचायतींनी ३० एप्रिल पर्यंत ऑनलाइन नोंदणी करणे बंधनकारक आहे. आरोग्य ही केवळ वैयक्तिक बाब नसून ती सार्वजनिक जबाबदारी आहे. आपल्या गावाला आजारमुक्त आणि आरोग्य संपन्न बनवण्यासाठी प्रत्येक ग्रामस्थांनी या मोहिमेत स्वतःला झोकून द्यावे.

आपल्या गावातील आरोग्य केंद्रांच्या सुविधांचा लाभ घ्यावा आणि निरोगी जीवनशैलीचा अंगीकार करावा,' असे आवाहन पराग सोमण यांनी केले आहे, असे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.स्वप्नील बेले तसेच जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुमत वाघ यांनी कळविले आहे.

# प्रधानमंत्री मातृवंदना योजना सुरक्षित मातृत्वासाठी आर्थिक सहाय्य

### दुसरे अपत्य मुलगी असल्यास पुन्हा ६ हजार

**वर्धा / जनमाध्यम**

गरोदरपणात महिलेचे आरोग्य उत्कृष्ट राहिल्यास बाळाचे आरोग्य देखील सुदृढ राहण्यास मदत होते. त्यामुळे मातेसह बालकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी केंद्र शासनाच्यावतीने प्रधानमंत्री मातृवंदना योजना राबविण्यात येत आहे. या योजनेतून पहिल्या अपत्यासाठी बाळाच्या जन्मापूर्वी व जन्मानंतर अशा दोन टप्प्यात पाच हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. दुसरे अपत्य मुलगी असल्यास या अपत्यासाठी देखील सहा हजार रुपयांचे सहाय्य केले जातात.

माता व बालकांचे आरोग्य सुधारण्याच्यादृष्टीने गर्भवती मातेला सकस आहार उपलब्ध व्हावा तसेच मातेच्या आरोग्यात सुधारणा व्हावी व जन्माला येणाऱ्या नवजात बालकांचे आरोग्यही सुदृढ रहावे यासाठी प्रधानमंत्री मातृवंदना योजना राबविण्यात येते. मातामृत्यू व बालमृत्युचे प्रमाण कमी करुन ते नियंत्रित ठेवण्यासाठी योजना अतिशय उपयुक्त ठरत आहे. योजनेंतर्गत महिला गरोदर राहिल्यापासुन तर बाळ जन्माला आल्यानंतर त्याचे आवश्यक सर्व लसीकरण होईपर्यंत महिलेस दोन टप्प्यात ५ हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान दिले जाते.

पुर्वी आर्थिक मदतीची रक्कम तीन टप्प्यात दिली जात होती. जुलै २०२२ च्या सुधारीत मार्गदर्शक सुचनांनुसार ही मदत आता दोन टप्प्यात दिली जाते. त्यात मदतीची पहिली ३ हजार रुपयांची रक्कम मासिक पाळीच्या शेवटच्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत मान्यताप्राप्त आरोग्य संस्थेमध्ये गरोदरपणाची नोंदणी व किमान एक प्रसुतीपुर्व तपासणी केल्यानंतर दिली जाते. दुसरी २ हजार रुपयांची रक्कम प्रसुतीनंतर प्राथमिक लसिकरण पुर्ण झाल्यानंतर तसेच बालकाचे जन्म नोंदणी प्रमाणपत्र मिळाल्यानंतर दिली जाते.दाम्पत्यास दुसरे अपत्य मुलगी असल्यास या अपत्यासाठी देखील ६ हजार रुपयांचा लाभ दिला जातो. दुसऱ्या गरोदरपणात एकापेक्षा जास्त अपत्ये झाली असतील




आणि त्यात एक अपत्य मुलगी असेल तरी दुसऱ्या मुलीसाठीचा लाभ दिला जातो. मातृवंदना योजनेचा लाभ घेण्यासाठी गर्भधारणेदरम्यान कार्यक्षेत्रातील आशा, अंगणवाडी कार्यकर्ती, आरोग्य सेविका किंवा कोणत्याही शासकीय आरोग्य संस्थेत नोंदणी करणे अनिवार्य आहे. योजनेच्या पात्र महिलेस आधार संलग्न बॅंक खात्यात किंवा पोस्ट ऑफीस मधील खात्यात डीबीटीद्वारे रक्कम दिली जाते.वेतनासह मातृत्व रजा मिळणाऱ्या महिला तसेच केंद्र व राज्य शासन किंवा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमध्ये नियमित नोकरीवर असलेल्या महिलांना या योजनेचा लाभ दिला जात नाही. योजनेचा लाभ मिळविण्यासाठी महिलेचे निव्वळ कौटुंबिक उत्पन्न प्रतिवर्ष ८ लाख रुपयांपेक्षा कमी असावे. योजनेच्या लाभासाठी लाभार्थ्यांस ओळखीचा पुरावा म्हणून शासनाने विहीत केलेला कोणताही एक पुरावा सोबत जोडणे आवश्यक आहे.

**२० हजार ७९३ महिलांना मदतीचे वितरण**

केंद्र शासनाच्यावतीने ही योजना जानेवारी २०१७ मध्ये सुरु करण्यात आली. योजनेची अंमलबजावणी आरोग्य विभागामार्फत करण्यात येत होती.

जून २०२५ पासून ही योजना महिला व बालविकास विभागाकडे वर्ग करण्यात आली आहे. या विभागाकडे योजना वर्ग झाल्यापासून आतापर्यंत जिल्ह्यातील २० हजार ७९३ गर्भवती व स्तनदा मातांना योजनेचा लाभ देण्यात आला आहे.

## बेवारस मुक्या जीवांसाठी माणुसकीचा ओलावा

**वर्धा/जनमाध्यम**

दुष्काळाच्या झळांनी चहूबाजूंनी होरपळून निघालेल्या या भूमीत माणसांबरोबरच मुक्या जनावरांचीही अवस्था दयनीय झाली आहे. रखरखत्या उन्हात ४० ते ४५ अंशांपर्यंत पोहोचलेल्या तापमानामुळे रस्त्याच्या कडेला भटकणाऱ्या बेवारस जनावरांची तहान व्याकूळ करणारी ठरत आहे. अशा भीषण



परिस्थितीत सामाजिक कार्यकर्ते विल्सन मोखाडे यांनी पुढाकार घेत माणुसकीचे दर्शन घडवणारा स्तुत्य उपक्रम सुरू केला आहे.

सावंगी (मेघे) बायपास ते डोडाणी स्टील कंपनी या मार्गावर तसेच निर्जन रस्त्यांच्या कडेला, जिथे मुक्या जनावरांचा वावर अधिक असतो, तिथे पसरट भांड्यांमध्ये नियमित पाणी ठेवण्याची व्यवस्था मोखाडे यांनी सुरू केली आहे. केवळ एकदाच नव्हे तर सातत्याने गेल्या वर्षापासून त्यांनी हा उपक्रम अखंडपणे राबवला असून दरवर्षी एप्रिल आणि मे महिन्यात त्याला विशेष गती दिली जाते.गेल्या वर्षी अपुऱ्या पावसामुळे दुष्काळाचे सावट अधिक गडद झाले आहे. भूजल पातळी घटली असून जलस्रोत आटत चालले आहेत. अशा वेळी मानव समाज विविध मार्गांनी परिस्थितीशी झुंज देत असला तरी मुक्या जनावरांच्या वेदनेला कुणी वाली आहे का, हा प्रश्न अधिक तीव्र झाला होता. याच प्रश्नातून विल्सन मोखाडे यांच्या मनात संवेदनशीलतेची ठिणगी पेटली आणि त्यांनी स्वतः पुढाकार घेत जनावरांसाठी पाण्याची सोय सुरू केली.या मुक्या जीवांच्या डोळ्यातील तहान पाहून शांत बसणे शक्य नाही, असे सांगत त्यांनी सामाजिक बांधिलकीची खरी व्याख्या कृतीतून मांडली आहे.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - १४६
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
**ई-मेल**-atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

# मेळघाट हाट : दुर्गम भागातील महिलांच्या उत्पादनांना मिळाले हक्काचे व्यासपीठ

## -स्वतंत्र गोदाम, पॅकेजिंग आणि लेबलिंग युनिटची व्यवस्था





अमरावती जिल्ह्यातील मेळघाट क्षेत्रातील दुर्गम भागात राहणाऱ्या स्वयंसहाय्यता महिला बचतगटांच्या श्रमाला आणि त्यांच्या कौशल्यातून साकारलेल्या उत्पादनांना 'मेळघाट हाट' विक्री केंद्राच्या माध्यमातून हक्काचे व्यासपीठ प्राप्त झाले आहे. महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक सशक्तीकरणासाठी राबविण्यात आलेल्या अशा अभिनव उपक्रमांना सर्व स्तरावरून प्रोत्साहन मिळत आहे. जिल्हा वार्षिक योजनेतून जिल्हा परिषद, महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने अमरावती येथे सायन्सकोर प्रांगणालगत आधुनिक महिला बचत गट उत्पादन विक्री केंद्र सुरु आहे. हे विक्री केंद्र ५ जानेवारी २०२५ पासून नागरिकांच्या सेवेत आहे.

मेळघाट हाटच्या माध्यमातून आदिवासी क्षेत्रातील उत्पादित साहित्याला प्रथमच शहराच्या मध्यवस्तीत हक्काचे विक्री केंद्र मिळाले आहे. या मॉलच्या माध्यमातून उत्पादित वस्तूंची थेट ग्राहकांना विक्री होत असल्याने मध्यस्थांची साखळी मोडीत निघत असून बचत गटातील महिलांच्या उत्पन्नात विशेष वाढ होत आहे. या ठिकाणी ग्राहकांसाठी मेळघाटातील वैविध्यपूर्ण वनौषधी, बांबूपासून बनविलेल्या कलाकुसरीच्या वस्तू, रानमेवा आणि शुद्ध मध यासारख्या दुर्मिळ वस्तूंची मोठी श्रेणी खरेदीसाठी उपलब्ध आहे. आदिवासी महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी महिला बचत गटांना सातत्याने प्रोत्साहन देऊन आदिवासी क्षेत्रात जास्तीत-जास्त बचत गटांचे जाळे निर्माण करणे हे प्रशासनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. महिलांच्या कला-कौशल्याला योग्य दिशा मिळावी तसेच ग्राहकांच्या मागणीनुसार उत्पादनात वैविध्य आणून त्यांना मोठी बाजारपेठ मिळवून देण्यासाठी मेळघाट हाटची निर्मिती करण्यात आली आहे.

विक्रीसाठी आणलेल्या साहित्यांना राष्ट्रीय स्तरावर योग्य भाव मिळण्यासाठी विक्री साहित्याचे उत्तम मार्केटिंग, आकर्षक पॅकिंग व प्रभावी ब्रँडिंग करणे ही काळाची गरज आहे. हीच बाब लक्षात घेऊन महिला बचत गटांना या तांत्रिक बाबींचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. या उत्पादित मालाला राज्यासह संपूर्ण देशात बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनामार्फत विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. मेळघाटातील धारणी तसेच चिखलदरा तालुक्यातील स्वयंसहाय्यता महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाला कायमस्वरूपी बाजारपेठ मिळावी, याच हेतूने हे मेळघाट हाट विक्री केंद्र सुरू करण्यात आले आहे. या केंद्राचे वैशिष्ट्य म्हणजे येथे एकाच छताखाली मेळघाटातील ४७ प्रकारच्या विविध वस्तू विक्रीसाठी उपलब्ध आहेत. प्रथम टप्प्यात एकूण ६० स्वयंसहाय्यता महिला बचत गटांच्या उत्पादनांचा यात समावेश करण्यात आला होता. त्यामध्ये प्रामुख्याने बांबूपासून निर्मित विविध उत्पादने, तृणधान्यांमध्ये सावा, कुटकी, ज्वारी, बाजरी तसेच कडधान्य, गहू, लाल तांदूळ, तूर दाळ, विविध प्रकारची लोणची, चिखलदऱ्याची जगप्रसिद्ध कॉफी, मध आणि शुद्ध तूप यांचा समावेश आहे. याशिवाय गृहशोभेच्या वस्तू आणि आरोग्याच्या दृष्टीकोनातून पौष्टिक खाद्यान्ने देखील येथे उपलब्ध आहेत. या केंद्राला आधुनिक मॉलचे स्वरूप देण्यात आले असून, येथे स्वतंत्र गोदाम, पॅकेजिंग आणि लेबलिंग युनिटची व्यवस्था करण्यात आली आहे, ज्यामुळे ग्राहकांना खरेदीचा एक वेगळा अनुभव मिळत आहे.

खादी व ग्रामोद्योग मंडळ आणि महिला आर्थिक विकास महामंडळाच्या वतीने स्वातंत्र्यदिनानिमित्त मेळघाट हाट येथे 'खादी महोत्सवा'चेही आयोजन करण्यात आले होते. यावेळी कस्तुरबा सोलर खादी महिला समिती अंतर्गत धारणी तालुक्यातील महिलांनी कापसापासून सूत आणि सुतापासून कापड ते गारमेंटपर्यंतच्या उत्पादनांची निर्मिती करून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या क्लस्टरतर्फे महिलांनी उत्पादीत केलेला माल खादी महोत्सवात विक्रीसाठी ठेवण्यात आला होता. विकेंद्रित सोलर चरखा समूहाच्या कार्यक्रमांतर्गत लाभार्थी महिलांनी तयार केलेली दर्जेदार खादी आणि सौर खादी उत्पादने येथे सवलतीच्या दरात नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आली होती, ज्याला अमरावतीकरांचा चांगला प्रतिसाद मिळाला. प्रशासनाच्या या अभिनव उपक्रमामुळे मेळघाटातील आदिवासी महिला भगिनींच्या बचत गटांना विक्री आणि विपणनासाठी एक सक्षम प्लॅटफॉर्म मिळाला असून, यामुळे महिला सक्षमीकरणासह आदिवासी क्षेत्रातील आर्थिक विकासाला निश्चितच मोठी गती मिळणार आहे.

**-अपर्णा यावलकर**
माहिती अधिकारी,
जिल्हा माहिती कार्यालय,
अमरावती


## पाहिजे

ऑटोमोबाईल स्पेअर पार्टच्या गोडाऊनमध्ये काम करण्याकरीता दोन मुले पाहिजेत.
तसेच अकौन्टींग करीता एक मुलगी पाहिजे.
--पत्ता--
सी-१२, सातुर्णा,
एम.आय.डी.सी.-बडनेरा रोड,
अमरावती
मो.नं.७०२०८७९१६८/८००७३४२३३५


## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.१८७/२०२६ — ने.ता.११.०६.२०२६

**अर्जदार :**
१. वेणुताई एकनाथराव भुस्कडे, वय ८२ धंदा - घरकाम
रा.हिरुळपूर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२. निर्मलाबाई जगन्नाथ पाचसे, वय ८० धंदा - घरकाम
रा.सी-२ टी-२, सेमिनरी हील, गौरखेडे कॉम्प्लेक्स, नागपूर
३. वच्छला महादेवराव व्यवहारे (मयत)
३अ) विजय महादेवराव व्यवहारे, वय ६४ धंदा - मजुरी
रा.कोल्हा, ता.अचलपूर, जि.अमरावती
३ब) ज्ञानेश्वर महादेवराव व्यवहारे, वय ५८ धंदा - मजुरी
रा.साईनगर, अमरावती, ता.जि.अमरावती
३क) संजय महादेवराव व्यवहारे, वय ५७ धंदा - मजुरी
रा.कोल्हा, ता.अचलपूर, जि.अमरावती
४. मारोती महादेवराव धाडसे (मयत)
४अ) बेबी मारोतराव धाडसे, वय ६४ धंदा - घरकाम
रा.तळेगांव मोहना, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
४ब) अनिता प्रविण काळबांडे, वय ४१ धंदा - घरकाम
रा.विजय नगर, अमरावती, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत कलावंताबाई महादेवराव धाडसे** हे रा.तळेगांव मोहना ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील कायमचे रहिवासी होते. यांचा मृत्यू दिनांक **२४.०५.२०११** रोजी रा.तळेगांव मोहना, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. तसेच मयत वच्छला महादेव व्यवहारे ही दिनांक २०.०१.२०१३ रोजी कोल्हा, ता.अचलपूर, जि.अमरावती येथे मरण पावली. तसेच मयत मारोती महादेवराव धाडसे हे रा.तळेगांव मोहना, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील कायमचे रहिवासी होते. ते दिनांक २४.०९.१९८८ रोजी तळेगांव मोहना, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मरण पावले. त्यामुळे मयत कलावंताबाई महादेवराव धाडसे व मयत मारोती महादेवराव धाडसे यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.१८७/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२१.०४.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
चांदूर बाजार

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.२००/२०२६ — ने.ता.१८.०६.२०२६

**अर्जदार :**
१. सगीरा बानो मोहम्मद युसूफ, वय ७३ धंदा - घरकाम
२. फिरोज अहमद म.युसूफ, वय ५३ धंदा - मजुरी
३. मोहम्मद फाजील मोहम्मद युसूफ, वय ४९ धंदा - मजुरी
४. फारुक अहमद मोहम्मद युसूफ, वय ४८ धंदा - नोकरी
५. परवेज अहमद म.युसूफ, वय ४५ धंदा - मजुरी
६. नुरेज अहमद मोहम्मद युसूफ, वय ४४ धंदा - मजुरी
७. नुरुस्सुबह यास्मीन मो.युसूफ, वय ४७ धंदा - मजुरी
सर्व रा.रामभट प्लॉट, चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत महम्मद युसूफ शे.उस्मान** हे रा.चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील कायमचे रहिवासी होते. यांचा मृत्यू दिनांक **०२.०६.२०११** रोजी रा.चांदूर बाजार, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. **त्यामुळे मयत महम्मद युसूफ शे.उस्मान** यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.२००/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२१.०४.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
चांदूर बाजार

## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.१९०/२०२६ — ने.ता.११.०६.२०२६

**अर्जदार :**
१. स्नेहल गिरीषराव पाथरकर, वय ५६ धंदा - घरकाम
२. राम गिरीषराव पाथरकर, वय २६ धंदा - शेती
सर्व रा.खेल चौधर करजगांव, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत गिरीष ज्ञानेश्वरराव पाथरकर** हे रा.खेल चौधर, करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील कायमचे रहिवासी होते. यांचा मृत्यू दिनांक **२३.०१.२०२६** रोजी रा.खेल चौधर, करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. **त्यामुळे** मयत **गिरीष ज्ञानेश्वरराव पाथरकर** यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.१९०/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२१.०४.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
चांदूर बाजार

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६१९/२०२६
**नानीबाई व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०५.०५.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Nanibai Bhimraoji Durge, Age 79 Yrs. Occu.: Household
2. Mohan Bhimraoji Durge, Age 55 Yrs. Occu.: Agriculturist
Both R/o Vilas Nagar, Amravati.
3. Shri Shoban Bhimraoji Durge, Age 50 Yrs. Occu.: Agriculturist
R/o Near Z.P.School, Dagdagad, Post.Waigaon, Tq.Bhatkuli, Dist.Amt.
4. Sarita Arunrao Sanke, Age 56 Yrs. Occu.: Household
R/o Parvati Nagar No.3, Sai Nagar, Amravati.
5. Anita Mayurdhwaj Sanke, Age 51 Yrs. Occu.: Household
R/o Vithai Nagar, Kathora Naka V.M.V. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत भिमराव रामजी दुर्गे** हे दिनांक 2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **नानीबाई व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **नानीबाई व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **३०.०३.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २२५**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.१८८/२०२६ — ने.ता.१८.०६.२०२६

**अर्जदार :**
१. पंचफुला अजाबराव शेंडे, वय ८५ धंदा - घरकाम
२. अरुण अजाबराव शेंडे वय ४८ धंदा - मजुरी
३. दिलीप अजाबराव शेंडे, वय ४६ धंदा - मजुरी
४. रजनी अनिल गेडाम, वय ३८ धंदा - मजुरी
५. मिना नितीन मेश्राम, वय ३६ धंदा - मजुरी
अर्जदार नं.१ ते ३ रा.तळवेल, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
अर्जदार नं.४ रा.यावली शहीद, ता.जि.अमरावती
अर्जदार नं.५ रा.माहुली जहांगीर, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत अजाबराव भोमाजी शेंडे** हे रा.तळवेल, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील कायमचे रहिवासी होते. यांचा मृत्यू दिनांक **३०.१२.२००६** रोजी रा.नागपूर, ता.जि.नागपूर येथे झाला. **त्यामुळे मयत अजाबराव भोमाजी शेंडे** यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.१८८/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
चांदूर बाजार

प्रो.नं.११०४/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.२१.०४.२०२६

वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय

किरकोळ अर्ज क्र./१९०/२०२६ — दिनांक ०९.०६.२०२६

## जाहीर नोटीस

**अर्जदार -**
१. श्रीकृष्ण महादेव पिलात्तर, वय ८४ वर्षे, धंदा - मजुरी
२. प्रवीण श्रीकृष्ण पिलात्तर, वय ४७ वर्षे, धंदा - मजुरी
३. राजेंद्र श्रीकृष्ण पिलात्तर, वय ४३ वर्षे, धंदा - मजुरी
अ.नं.१ ते ३ रा.चंडीकापूर, ता.अकोट, जि.अकोला
४. अर्चना प्रविण मालठाणे, वय ५० वर्षे, धंदा - घरकाम
रा.देवरडा दैवारदा पलसोड, ता.अकोट, जि.अकोला
५. वर्षा देवानंद पातोंड, वय ४५ वर्षे, धंदा - घरकाम
रा.चिंचोली बु., ता.अंजनगांव सुर्जी, जि.अमरावती

--- विरुध्द ---

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **सूर्यकांता श्रीकृष्ण पिलात्तर** हे दिनांक **०९.०२.२०२१** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन** मयत **सूर्यकांता श्रीकृष्ण पिलात्तर** यांचे नांवे मौजा बाभळी, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील शेत गट नं.१५८ क्षेत्र ३.३६ हे.आर पो.ख.१.०८ हे.आर यामधील क्षेत्र ०.७३ हे.आर, आ.रु.५.४२ मध्ये सामाईकात हिस्सा आहे. अशी मिळकत असून त्याची अंदाजे किंमत ५०,००० रु.आहे.

आज दि.**२१.०४.२०**[illegible] रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७४५/२०२६
**अरुणा अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.०८.०५.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Aruna Wd/o Laxmanrao Kharad, Age 74 Yrs. Occu.: Homemaker
R/o C/o Ajay Natthuji Ambulkar, 54, Mangalmay Gruh Nirman Society Near Ajanta Marbal, Narendra Nagar, Vivekanand Nagar, Nagpur
2. Nitin S/o Laxmanrao Kharad, Age 50 Yrs. Occu.: Service
R/o 10, Saraswati Vihar, Opp.S.B.I. Malkapur Road, Akola
3. Sachin S/o Laxmanrao Kharad, Age 48 Yrs. Occu.: Service
R/o Flat No.504, Bldg.No.K-7, Katepuram Phase-2, Katepuram Chowk Pimpale Gurav, Pune
4. Rita W/o Ajay Ambalkar, Age 52 Yrs. Occu.: Homemaker
R/o Ghat No.54, Padmavati Nagar Road, Near Dipxali Hair Dresser, Narendra Nagar, Somalwada, Nagpur

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Laxmanrao Ganpatrao Kharad हे दिनांक 18.09.2000 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Aruna Laxmanrao Kharad + 3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Aruna Laxmanrao Kharad + 3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१७.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६९६/२०२६
**श्री.भोला अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.०६.०५.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Bhola Papa Tambole, Age 42 Yrs. Occu.: Retired
R/o Behind Shadani Darbar, Sindhu Nagar, Rukhmini Nagar, Amravati
2. Sunita Himmat Chandaliya, Age 51 Yrs. Occu.: Nil
R/o College Road, Walmik Nagar, Akot, Dist. Akola
3. Anita W/o Vinay Chauvhan, Age 49 Yrs. Occu.: Nil
R/o Behind Shadani Darbar, Sindhu Nagar, Rukhmini Nagar, Amravati
4. Kavita W/o Sanju Boyat, Age 45 Yrs. Occu.: Nil
R/o Chaure Nagar, Near Jay Nagar, Amravati. Dist.Amravati
4B) Roshan Balasaheb Ghode, Age 33 Yrs. Occu.: Agriculturist
R/o Behind Remand Home Gadge Nagar, Amravati. Dist.Amravati
4C) Akshay Balasaheb Ghode, Age 29 Yrs. Occu.: Agriculturist
R/o Shobha Nagar, Amravati, Tq.Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत मिरा पापा तंबोले** हे दिनांक 21.08.2022 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **भोला** + 3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **भोला** + 3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१७.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६३४/२०२६
**श्रीमती अल्का अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.०८.०५.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Smt.Alka Hariom Gupta, Age 63 Yrs. Occu.: Housewife
2. Rupal Hariom Gupta @ Rupal Shreyas Kittur, Age 32 Yrs. Occu.: Pvt.Job
3. Minal Hariom Gupta, Age 29 Yrs. Occu.: Student
4. Sajal Hariom Gupta, Age 24 Yrs. Occu.: Student
Appli.No.1 to 4 R/o Peth Pura, Hiwarkhed Ruprao, Tq.Telhara, Dist.Akola
Present Address : App.No.1 to 4 R/o Plot N-99, Samra Nagar No.1, Amravati, Tq.Dist.Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत हरिओम बद्रीलाल गुप्ता** हे दिनांक 06.02.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **अल्का अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अल्का अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२०.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## जाहीर नोटीस

माझे पक्षकार याद्वारे सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, **नामे उषा दीपक चिंचमलातपुरे व सचिन दीपकराव चिंचमलातपुरे** यांनी **इंडिया शेल्टर फायनान्स कार्पोरेशन लिमिटेड, शाखा अमरावती** येथे गृह कर्जाकरीता अर्ज केला असून खालील नमुद मालमत्ता ही **प्रमोदराव जानरावजी हिवसे** यांच्याकडून दस्ताऐवज नं.१५०१, दिनांक १९.०७.२००२ रोजी खरेदी केला आहे. परंतु या रजिस्टर मिळकती संबंधीत या दस्ताऐवज नं.१५०१ मधील दोन पाने चांदूर बाजार परिसर मध्ये गहाळ झाली आहेत. यामध्ये १ ते १४ पानांची खरेदी आहे. यामध्ये पान नं.१ व ११ ही दोन पाने गहाळ झाली आहेत.

**मालमत्तेचे वर्णन** - वार्ड क्र.१० (जुना), मालमत्ता क्र.६८, झोन नं.३, मौजे चांदूर बाजार, प्रगणे करजगांव, ता. व सब डी.चांदूर बाजार, जि.अमरावती

सदर मालमत्तेवर कोणाचा वारसा हक्क, बोजा, गहाण, पतसंस्था कर्ज, इत्यादी असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून तीन दिवसांचे आत प्रत्यक्ष कागदपत्रासह खालील पत्त्यावर संपर्क करुन आपली लेखी हरकत न ंदवावी. त्यानंतर आपली हरकत विचारात घेता येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

(ॲड.अनिकेत देशमुख)
इंडिया शेल्टर फायनान्स कॉर्पो.लि.
अमरावती
मो.९५६१२४३२१५

## सार्वजनिक जाहीर नोटीस

ज्याअर्थी, माझे पक्षकार श्री. संदीप कृष्णराव गोडबोले, वय ६० वर्षे, व्यवसाय–धंदा/व्यापार, रा. प्रतापगड अपार्टमेंट, खापर्ड बगीचा, अमरावती यांनी

श्री. सुरज नंदकिशोर बेलके, वय २८ वर्षे, व्यवसाय–शेती, रा. कोडण्यपुर, ता. तिवसा, जि. अमरावती यांचे मालकीची व ताब्यातील खालील नमुद शेती जमीन खरेदी करण्याचे ठरविले आहे.

सदर शेती मालमत्तेचा तपशील पुढीलप्रमाणे आहे:

मौजे कोडण्यपुर, ता. तिवसा, जि. अमरावती येथील शेत भूमापन व उपविभाग क्र. २/१, भो. वर्ग-१, याचे एकूण क्षेत्र ३ हे. १० आर, यापैकी १ हे. ५५ आर, पोट खराब ०.०७, आ.रु. १२.०० पैसे खाता क्र. ५०२४९ चे शेत सालोम पूर्ण ताब्यात वस्तूसह ईतर झाड झुडपांसह माती गोटे सह आहे.

**या शेतीची चतुःसीमा :-**
**पूर्वेस – वर्धा नदी**
**पश्चिमेस – कोडण्यपुर ते अंबिकापुर डांबर रोड**
**उत्तरेस – रामेश्वर बेलके यांचे शेत**
**दक्षिणेस – श्री वासुदेव केवटे यांचे शेत**

ज्याअर्थी, माझ्या पक्षकारांनी सदर मालमत्तेचा व्यवहार करण्यापूर्वी कोणत्याही तृतीय पक्षाचा हक्क, हिस्सा, ताबा, बोजा, तारण, कर्ज, वाद, न्यायालयीन प्रकरण, मृत्युपत्र, वारसा/उत्तराधिकार हक्क, करार किंवा इतर कोणताही दावा असल्यास तो जाहीर व्हावा या उद्देशाने ही नोटीस प्रसिद्ध केली आहे.

म्हणून, सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, वरील मालमत्तेबाबत कोणास काही हक्क/दावा/हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खाली सही करणाऱ्या वकिलांकडे लेखी स्वरूपात कळवावे.

निर्धारित मुदतीनंतर प्राप्त होणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही. तसेच, सदर मालमत्तेबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास त्यासंबंधित सर्व खर्च व जबाबदारी संबंधित हरकतदार/दावेदार यांच्यावर राहील.

अन्यथा, कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास माझे पक्षकार पुढील खरेदी खत व्यवहार पूर्ण करतील व त्याबाबत कोणतीही हरकत ग्राह्य धरली जाणार नाही.

दिनांक : २३/४/२०२६
ठिकाण : अमरावती

**ॲड. निखिल पी. देशमुख**
१२ बी, शिवप्रस्थ वृंदावन कॉलनी, स्कूल ऑफ स्कॉलर्सच्या मागे,
स्वामी समर्थ लेआउट, निंभोरा, अमरावती

## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.१९९/२०२६ — ने.ता.१६.०६.२०२६

**अर्जदार :**
१. देवेंद्र किसनराव गजबे, वय ५९ धंदा - शेती
रा.गोविंदपूर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
२. मनोज किसनराव गजबे, वय ५५ धंदा - शेती
रा.साकीनाका, मुंबई, ता.जि.मुंबई
३. बेबी गोपीचंद रामटेके, वय ६६ धंदा - घरकाम
रा.वलगांव, ता.जि.अमरावती
४. किर्तीमाला रमेश मेश्राम, वय ६० धंदा - घरकाम
रा.दत्तकृपा सोसायटी, बिल्डीग नं.३, ए-विंग, रुम नं.१०१, म्हाडा कॉलनी, सुभाष नगर रोड, नाहुर वेस्ट, मुंबई, ता.जि.मुंबई
५. शिला रमेश गजबे, वय ६३ धंदा - घरकाम
६. आदर्श रमेश गजबे, वय ४१ धंदा - मजुरी
अर्जदार नं.५ व ६ रा.आंबेडकर नगर, चिखलदरा ता.चिखलदरा, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत वेणु किसनराव गजबे** ही दिनांक **२४.११.२०१९** रोजी रा.गोविंदपूर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. तसेच मयत किसनराव संभाजी गजबे यांचा दिनांक ०२.०६.१९९३ रोजी गोविंदपूर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे मृत्यू झाला. तसेच मयत रमेश किसनराव गजबे हे दि.३१.१२.२००९ रोजी चिखलदरा, ता.चिखलदरा, जि.अमरावती येथे मयत झाले. **त्यामुळे** मयत **वेणु किसनराव गजबे व मयत किसनराव संभाजी गजबे** यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.१९९/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**२१.०४.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय,चांदूर बाजार

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७४०/२०२६
**यमुना अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.०८.०५.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Yamuna Madhukar Virulkar, Age 62 Yrs. Occu.: Household
2. Vinaykumar Madhukar Virulkar, Age 41 Yrs. Occu.: Service
3. Amarkumar Madhukar Virulkar, Age 39 Yrs. Occu.: Pvt.Job
4. Mangesh Madhukar Virulkar, Age 37 Yrs. Occu.: Pvt.Job
All R/o Sut Girni Road, Kailash Nagar, Near Gopal Nagar, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Madhukar Shrawanji Virulkar हे दिनांक 26.01.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Yamuna Madhukar Virulkar + 3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Yamuna Madhukar Virulkar + 3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१७.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.६८०/२०२६
**कमलादेवी -वि- निरंक**
पुढील ता.०४.०५.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Kamaladevi Rameshchandra Rathi, Age 75 Yrs. Occu.: Nil
2. Nitin Rameshchandra Rathi, Age 49 Yrs. Occu.: Business
Both R/o Dhanraj Lane, Near Hanuman Temple, Amravati
3. Namrata Gogeshwar Kasat, Age 48 Yrs. Occu.: Housewife
R/o 7, Vijay Colony, Ashok Bakery Samor, Jalgaon, Tq.Dist.Jalgaon

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Rameshchandra Shrikisanji Rathi हे दिनांक 01.12.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Kamaladevi Rameshchandra Rathi + 2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Kamaladevi Rameshchandra Rathi + 2 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१७.०४.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

# शिक्षण सेवक कालावधीत मृत्यू झाल्यास २० लाख रुपये सानुग्रह अनुदान लागू करा



## प्राथमिक शिक्षक समितीचे मुख्यमंत्री व शिक्षणमंत्र्यांना निवेदन

**अमरावती/क्रा.प्र.**
महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती या निवेदनाद्वारे राज्यातील शिक्षण सेवकांच्या अत्यंत गंभीर आणि संवेदनशील प्रश्नांकडे वेधत आहे. राज्यातील प्राथमिक शाळांमध्ये कार्यरत असणारे शिक्षण सेवक तुटपुंज्या मानधनावर आणि अत्यंत कठीण परिस्थितीत आपले कर्तव्य बजावत आहेत.त्यांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्याची मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेन्द फडणविस व शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांना केल्याचे प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी दिली कळविले आहे. या मध्ये २० लाख रुपये सानुग्रह अनुदानाची तरतूद-शिक्षण सेवक म्हणून काम करत असताना, दुर्दैवाने एखाद्या शिक्षकाचा मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ येते. शिक्षण सेवक हे 'नियमित' कर्मचारी नसल्याच्या तांत्रिक कारणामुळे त्यांच्या कुटुंबाला पुरेशी आर्थिक मदत मिळत नाही. शिक्षण सेवक कालावधीत (तीन वर्षांत) मृत्यू झाल्यास, त्या शिक्षकाच्या कुटुंबाला २० लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्याची विशेष योजना तातडीने लागू करावी. विमा संरक्षण (सुरक्षा कवच)-शिक्षण सेवक म्हणून काम करणा-या प्राथमिक शिक्षकांना तीन वर्षे कालावधीसाठी विमा संरक्षणाची एखादी योजना दयावी. जे त्यांच्या अकाली दुर्दैवी घटनांमध्ये त्यांच्या पश्चात त्यांच्या कूटुंबासाठी उपयुक्त ठरेल. 'समान काम, समान वेतन' तत्त्वाचा अभाव-सध्या शिक्षण सेवकांना दरमहा केवळ १६,००० रुपये इतके अत्यल्प मानधन दिले जाते. आजच्या महागाईच्या काळात ही रक्कम कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी अत्यंत अपुरी आहे. शिक्षण सेवक हे अनुभवी शिक्षकांप्रमाणेच अध्यापनाचे पूर्ण काम करतात. अनेक ठिकाणी ते मुख्याध्यापकाची जबाबदारी आणि सर्व प्रशासकीय कामे चोख पार पाडतात. असे असूनही त्यांना 'समान काम समान वेतन' या न्यायापासून वंचित ठेवले जात आहे. घरापासून दूरवर नियुक्ती आणि आर्थिक ओढाताण-बहुतेक शिक्षण सेवकांची नियुक्ती त्यांच्या मूळ जिल्ह्यापासून किंवा घरापासून शेकडो किलोमीटर दूर दुर्गम भागात झालेली आहे. १६,००० रुपयांच्या मानधनात घराचे भाडे, प्रवास खर्च आणि स्वतःचा उदरनिर्वाह करणे अशक्य झाले आहे. यामुळे हे तरुण शिक्षक प्रचंड मानसिक आणि आर्थिकतणावाखाली वावरत आहेत.शासन स्तरावर शिक्षण सेवकांच्या या समस्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून, त्यांच्या मानधनात भरघोस वाढ करावी आणि सेवाकाळात मृत्यू ओढवल्यास त्यांच्या वारसांना २० लाख रुपयांचे कवच प्रदान करणारा शासन निर्णय त्वरित निर्गमित करावा. राज्यातील हजारो शिक्षण सेवकांच्या भवितव्यासाठी शासन सकारात्मक निर्णय घेईल, अशी शिक्षक समितीला आशा आहे.

# इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालयात सामाजिक उपक्रम

**अमरावती-** स्थानिक विदर्भ युथ वेलफेयर सोसायटी अमरावती संचालित इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालय अमरावती समाजशास्त्र विभाग अभ्यास मंडळातर्फे मिशनरीज ऑफ चॅरिटी अमरावती ईशदया संस्था येथे गरजू अंध अपंग स्त्रियांना फळ,बिस्कीट वाटप करून सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

समाजात वावरतांना समाजाप्रती आपलं कर्तव्य असते ही बाब अनुसरून सामाजिक व मानवतेच्या दृष्टीकोनातून समाजशास्त्र अभ्यास मंडळ इंदिराबाई मेघे महिला महाविद्यालयातर्फे अनाथ,अपंग गरजू स्त्रियांना फळ,बिस्कीट वाटप सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमा दरम्यान विध्यार्थिनींनी तेथील स्त्रियांचे दुःख व समस्या जाणून घेतल्या.आपणही आपल्या समाजाचा एक घटक आहे ही भावना विद्यार्थीनींनी स्त्रियांमध्ये जागृत केली व मदतीचा एक हात म्हणून या कार्यक्रमा मागची भावना विशद केली.या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय कोल्हे, संस्थेच्या कार्यकारिणी सदस्य डॉ. पूनमताई चौधरी, प्रा. गजानन काळे यांचे मार्गदर्शनात केले असून, कार्यक्रमाला डॉ. सीमा अढाऊ, प्रा. वंदना भोयर, प्रा.अरुणा तसरे,प्रा. वंदना गावंडे,प्रा. संजय काळे, प्रा. अनुप आत्राम, प्रा. वामन जवंजाळ, प्रा. भेटाळू, प्रा. ढगे, प्रा. बारबुदे, प्रा.ढोमणे, प्रा. देशमुख, प्रा.कोरडे व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ.मंगेश ठाकरे व आभार प्रदर्शन प्रा. डॉ. विभांगी देशमुख यांनी केले.



## संक्षिप्त



### मनपा शाळेत नव प्रवेशित विद्यार्थ्यांना स्कूल बॅगचे वाटप

**अमरावती-** अमरावती महानगरपालिका शाळांमध्ये विद्यार्थी संख्या वाढावी याकरिता शिक्षक सतत प्रयत्नशील असून महानगरपालिका उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळा क्रमांक १४ वडाळी येथे इयत्ता पहिली मध्ये नवप्रवेशित विद्यार्थ्यांना नुकतेच शिक्षकांच्या सहकार्यातून स्कूल बॅग चे वाटप करण्यात आले विद्यार्थ्यांना शाळेबद्दल आकर्षण व्हावे तसेच नवप्रवेशित विद्यार्थ्यांचा व पालकांचा उत्साह वाढावा याकरिता शिक्षकांनी स्वखर्चाने विद्यार्थ्याकरिता स्कूल बॅग खरेदी करून ज्या विद्यार्थ्यांनी इयत्ता पहिली मध्ये प्रवेश घेतला आहे अशा नव प्रवेशित मुलांना स्कूल बॅगचे वाटप मुख्याध्यापक योगेश पखाले व शिक्षक वृंदांच्या हस्ते करण्यात आले. अमरावती महानगरपालिका शाळेमधील शिक्षक पटनोंदणी सर्वेक्षण घरोघरी जाऊन करीत असून परिसरातील कोणताही विद्यार्थी शाळाबाह्य राहू नये प्रत्येक विद्यार्थी या शाळेत प्रवेशित व्हावा याकरिता प्रयत्न सुरू असून अमरावती महानगरपालिका उच्च प्राथमिक शाळा क्रमांक १४ वडाळी च्या मुख्याध्यापक व स्टाफ मिळून परिसरात सर्वेक्षण करत असून पात्र याकरिता शाळेतील शिक्षिका कुमारी नीलिमा लव्हाळे, वैशाली देशमुख, मनीषा वाकोडे, सुलोचना डाखोळे,ज्योत्स्ना गवई, स्मिता वानखडे, चेतना बोंडे, ज्योती सातपुते, अनिता विधाते, मोनिका पंधरे, निशा चव्हाण, अनुप भारंबे हे प्रयत्नशील आहेत.

### रोजगार मेळाव्यात ६३ उमेदवारांची निवड

**अमरावती-** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि मॉडेल करिअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि. २१ एप्रिल रोजी आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यात ६३ उमेदवारांची निवड करण्यात आली.जिल्हा कौशल्य विकास केंद्राच्या सहायक आयुक्त प्रांजली बारस्कर अध्यक्षस्थानी होत्या. यावेळी तयांनी उमेदवारांनी आपल्या रोजगाराप्रती नेहमी जागृत आणि उत्साही असावे, असे सांगून कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या कामाचेही कौतुक केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कृपा अर्गुलेवर, संदीप यादव, पंकज कचरे उपस्थित होते.मेळाव्यात ६ नामांकित कंपन्यांनी सहभाग नोंदविला. यात १०० रिक्त पदांसाठी १४२ उमेदवारांनी नोंदणी केली. यात प्रत्यक्ष मुलाखतीनंतर ६३ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली. निवड झालेल्या उमेदवारांपैकी ३ उमेदवारांना मान्यवरांच्या हस्ते जागीच नियुक्ती पत्रे प्रदान करण्यात आली. आकाश येवले यांनी सूत्रसंचालन केले, पंकज कचरे यांनी आभार मानले.

### तुंबलेल्या नालीत पडून वृध्दाचा मृत्यू

**बेलोरा-** मोर्शी व तालुक्यातील रिध्दपूर वार्ड क्रमांक १ मधील



मुख्य नाली घाणपाणी काडीकचऱ्याने तुंबली आहे. याच नालीत पडून पंजाबराव उकंडराव गवांदे या ८६ वर्षीय वृध्दाचा जानेवारी महिन्यात मृत्यू झाला होता. रिध्दपूर ग्रामपंचायतच्या निष्काळजीपणामुळे माझ्या वडिलांना मृत्यू झाला, असा आरोप त्यांचा मुलगा देविदास गवांदे यांनी बीडीओंना दिलेल्या तक्रारीत केला आहे.गवांदे यांच्या घरासमोर सांडपाणी वाहून नेणारी नाली आहे. ती नाली घाणपाण्याने तुंबलेली आहे. त्यामुळे परिसरात रोगराईसुध्दा पसरत आहे. ग्रा. पं. कडे तक्रारी करूनही नालीची साफसफाई करण्यात आली नाही. पंजाबराव गवांदे हे नालीवरून जात असताना ते नालीत पडले. त्यांच्या हाताला, कंबरेला व डोक्याला गंभीर मार लागला. गंभीर अवस्थेत त्यांना खाजगी रुग्णालयात भरती केले; मात्र त्यांचा मृत्यू झाला.

### गीता सारवे यांचे निधन

**कुऱ्हा-** येथील वार्ड नं. १ मधील गिता हरिभाऊ सारवे यांचे



वयाच्या ५८ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले त्यांच्या पश्चात पती, एक मुलगी, दोन मुले, जावाई, स्नुषा, नातू नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे स्व.गिताबाई सारवे यांच्या अंत्यविधी करिता सर्वच स्तरातील नातेवाईक व गावकरी उपस्थित होते यावेळी सामूहीक श्रध्दांजली वाहण्यात आली.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कर्मचाऱ्यांचे आंदोलन



**अमरावती/क्रा.प्र.**
माध्यमिक (इ.१०वी) व उच्च माध्यमिक (इ१२वी) शिक्षण मंडळ, पुणे यांचे अंतर्गत असलेले अमरावती विभागीय मंडळ, येथील कर्मचारी महासंघटना व बहूजन कर्मचारी कल्याण महासंघ यांचे संयुक्त कृती समितीचे २० एप्रिल २०२६ पासून आंदोलन सुरु झालेले आहे. मागण्या मान्य न झाल्यात २८ एप्रिल २०२६ पासून मंडळ प्रशासनास काम बंद आंदोलनाचा इशारा देण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ ही १९६५ च्या अधिनियमान्वये स्वायत्त शैक्षणीक संस्था शासन मान्यतेनुसार स्थापन करण्यात आलेली आहे. त्यानूसार मंडळाची स्वतंत्र विनियम व उपविधी आहेत. या संस्थेची महाराष्ट्र राज्यात एकूण ९ विभागीय मंडळ कार्यरत आहेत.मंडळ कर्मचा-यांच्या बहती व बदल्यासाठी राज्य मंडळ प्रशासन व सर्व मंडळ कर्मचारी संघटना यांनी सहमतीने सन १९९३ मध्ये निकष तयार केलेले आहेत. त्यामध्ये वेळोवेळी आवश्यक त्या सुधारणा करण्यात आलेल्या असून त्यास मंडळाची सर्वोच्च समिती कार्यकारी परिषद यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसारच मंडळ कर्मचा-यांच्या बढती व बदली माहे नोव्हेंबर २०२५ पर्यत सुरळीत सुरु होत्या. तथापी माहे डिसेंबर २०२५ पासून आय.ए. एस. अधिकारी राज्य मंडळ अध्यक्ष म्हणून नियुक्त झाल्याने, मंडळ प्रशासनाने कर्मचारी संघटनासोबत कोणतीही चर्चा न करता कार्यकारी परिषदमध्ये ठराव घेवून सदर निकष मोडीत काढून शासकीय बदल्याचा विनियम २००९ लागू करण्याचा घाट घातलेला आहे. स्वायत्त माणि शैक्षणीक संस्थावर सदर अधिनियमाचा सक्तीचा अवलंब करण्याबाबत कोणतीही कायदेशीर तरतूद आढळून येत नाही. त्यामुळे मंडळ कर्मचा-यांवर अन्याय होत आहे. मंडळ कार्यालयात एकूण ५९१ पदापैकी ३८६ कनिष्ठ लिपिक पदे रिक्त असून हे पदे भरण्याबाबत प्रशासन उदासीन आहे. त्यामुळे कर्मचा-यांवर कामाचा अतिरिक्त ताण पडत आहे. तरीसुध्या कार्यरत कर्मचारी परीक्षेची व निकालाची कालमर्यादीत कामे निर्धारीत वेळेत पूर्ण करीत आहेत.उपरोक्त दोन्ही बाबीसंदर्भात मंडळ प्रशासनासोबत कर्मचारी संघटनांनी वेळोवेळी पत्रव्यवहार करुन कर्मचा-यांवर होणारा अन्याय दूर करावा व कनिष्ठ लिपीक पद भरती करणेबाबत वारंवार विनंती केलेली आहे, तथापी मंडळ प्रशासनाकडून कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याने मंडळ कर्मचा-यांना आंदोलनाचा प्रवित्रा घ्यावा लागत आहे.

# आज बडनेरा-भुसावळ मेमू रद्द!

## भुसावळ विभागात नॉन-इंटरलॉकिंग कामासाठी विशेष ब्लॉक

**अमरावती/का.प्र.**
भुसावळ विभागातील पारस-गायगाव-अकोलादरम्यान अप व डाउन दोन्ही मार्गावर ऑटोमॅटिक ब्लॉक सेक्शन कामाच्या संबंधात नॉन-इंटरलॉकिंग (एनआय) कामासाठी विशेष ब्लॉक चालवणार आहे. परिणामी गुरुवार २३ रोजी या ब्लॉकमुळे बडनेरा-भुसावळ मेमूसह चार मेमू गाड्या रद्द करण्यात आल्या असून दोन एक्स्प्रेस गाड्या सुमारे २ तास उशिरा धावणार आहेत. २३ रोजी गाडी क्र.११११२१ भुसावळ ते वर्धा मेमू, गाडी क्रमांक ६१११०२ बडनेरा ते भुसावळ ते बडनेरा मेमू, गाडी क्रमांक ११११२२ वर्धा ते भुसावळ मेमू या चारही गाड्या रद्द करण्यात आल्या क्रमांक २०८२० ओखा-पुरी आहेत. त्याचप्रमाणे गाडी एक्स्प्रेस शेगाव ते श्रीक्षेत्र नागझरीदरम्यान २ तास २५ मिनिटे नियमन करण्यात येईल, तसेच गाडी क्रमांक ११०४० गोंदिया-कोल्हापूर एक्स्प्रेस काटेपूर्णा ते शेगाव दरम्यान २ तास २० मिनिटे नियमन करण्यात येईल. या दोन्ही एक्स्प्रेस गाड्या रोखून ठेवल्या जाणार असल्यामुळे त्या उशिरा धावतील. रेल्वे प्रवाशांनी याची नोंद घ्यावी. हे ब्लॉक्स पायाभूत सुविधांच्या देखभालीसाठी आणि सुरक्षिततेसाठी आवश्यक आहे. प्रवाशांना विनंती करण्यात आली आहे की, त्यामुळे होणारा गैरसोयीबद्दल रेल्वे प्रशासनाला सहकार्य करावे, असे मध्य रेल्वेने कळवले आहे.

### शेगाव वारी करणाऱ्यांना त्रास

गुरुवारी शेगाव वारी करणाऱ्या अमरावती जिल्ह्यातील प्रवाशांची संख्या मोठी आहे. त्यामुळे गुरुवार २३ रोजीच हा ब्लॉक घेतल्याने शेगावला जाणाऱ्या व तेथून परत येणाऱ्या प्रवाशांना चांगलाच त्रास होणार आहे. कारण आधीच या मार्गावर गाड्यांची संख्या मर्यादित आहे, तसेच या दिवशी सूरत एक्स्प्रेससही नसते. बहुतेक गाड्या या सायंकाळी शेगावहून जातात किंवा तेथून परततात. त्यामुळे नियमित शेगाव वारी करणारे इतर पर्यायी वाहनांचा आधार घ्यावा.

# पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये 'अर्थ डे'



**अमरावती-** अर्थ डे (Earth Day) निमित्त पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या सहभागातून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी पृथ्वीचे महत्त्व, प्रदूषणाचे दुष्परिणाम आणि पर्यावरण रक्षणाची गरज यावर भाषणे सादर केली. काही विद्यार्थ्यांनी पोस्टर मेकिंग, घोषवाक्य लेखन व वृक्षसंवर्धन यांसारख्या उपक्रमांत सहभाग घेतला. शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक सवयी अंगीकारण्याचे आवाहन केले. 'पाणी वाचवा, झाडे लावा, प्लास्टिकचा वापर टाळा' असा संदेश विद्यार्थ्यांना देण्यात आला.कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांनी पर्यावरण रक्षणाची शपथ घेतली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये निसर्गाविषयी जागरूकता निर्माण झाली असून पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घेण्याची प्रेरणा मिळाली.

# एमआयडीसीत गतीरोधकांच्या अभावामुळे अपघात वाढले

**अमरावती/का.प्र.**
नांदगाव पेठ एमआयडीसी परिसरातील प्रताप कंपनीजवळील मुख्य चौफुली रस्त्यावर गतीरोधक नसल्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधत डिगरगव्हाणच्या प्रशासक जिलेश्वरी ठाकरे यांनी खा. बळवंतराव वानखडे यांच्याकडे निवेदन सादर करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

सदर चौफुली रस्ता हा डिगरगव्हाण, डवरगाव, कापुसतळणी, माळेगाव, गुरुकुंज मोझरी, माहुली जहांगीर तसेच राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ०६ या भागांना जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. त्यामुळे या रस्त्यावर जड वाहनांसह इतर वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. मात्र, गतीरोधक नसल्यामुळे वाहनचालक भरधाव वेगाने वाहन चालवतात आणि त्यामुळे वारंवार अपघात घडत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, आतापर्यंत या ठिकाणी आठ ते दहा अपघात झाले असून, त्यामध्ये चार ते पाच जणांना जीव गमवावा लागला आहे.

या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने या चौफुली रस्त्यावर योग्य आकाराचे चार गतीरोधक तात्काळ बांधण्यात यावेत, तसेच पांढरे पट्टे व इशारा फलक बसवण्यात यावेत, अशी मागणी प्रशासक जिलेश्वरी ठाकरे यांनी निवेदनातून केली आहे.

# 'मिशन लक्ष्यवेध' अंतर्गत सोमवारी कुस्ती, वेटलिफ्टिंगची निवड चाचणी

**अमरावती/क्रा.प्र.**
क्रीडा व युवक सेवा संचालनालयातर्फे 'मिशन लक्ष्यवेध' ही धोरणात्मक योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत कुस्ती आणि वेटलिफ्टिंग या खेळांसाठी अमरावती येथील विभागीय क्रीडा संकुल येथे खेळाडूंची निवड चाचणी सोमवार, २७ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आली आहे.

यात निवड झालेल्या खेळाडूंना निवासी स्वरूपात दर्जेदार व तंत्रशुद्ध क्रीडा प्रशिक्षण, क्रीडा साहित्य, निवास आणि भोजन व्यवस्था, क्रीडा विज्ञान विषयक सहाय्य, देश-विदेशातील क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागाची संधी, शासन मान्यतेनुसार वैद्यकीय विमा सुरक्षा आदी सोयी-सुविधा मिळणार आहे.

निवड चाचणीसाठी वयोमर्यादा ही दि. ३१ डिसेंबर रोजी २५ वर्षांखालील मुले व मुली असून खेळाडू महाराष्ट्र राज्यातील असावा. राज्यस्तरावरील पदक प्राप्त किंवा राष्ट्रीयस्तरावरील सहभागी खेळाडू हे निकष आहेत.

खेळाडूंना जन्म दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, आधार कार्ड, अधिवास प्रमाणपत्र, गेल्या २ वर्षातील कामगिरीची प्रमाणपत्रे, ३ पासपोर्ट फोटो, बोनाफाईड आणि पालकांचे संमती पत्र ही कागदपत्रे सादर करावी लागतील. तसेच शासनमान्य डॉक्टरांचे फिटनेस प्रमाणपत्र अनिवार्य आहे.निवड चाचणी ही विभागीय क्रीडा संकुलात दुपारी १२ वाजल्यापासून होणार आहे. अधिक माहितीसाठी सुशील मोहोड - ९७६३५७६५८८, अनुप वानखडे - ९८८१९८०२८२, सारंग ठाकरे – ९८३०१४६७०८, प्रीती देशमुख - ७९७२९४७३५२ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन उपसंचालक शेखर पाटील यांनी केले आहे.

# मधपाळांसाठी 'मधुमित्र' व 'मधुसखी' पुरस्कार ४ मेपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती/क्रा.प्र.**
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या वतीने २० मे रोजी जागतिक मधमाशी दिनाचे औचित्य साधून, राज्यातील यशस्वी मध उद्योजकांना 'मधुमित्र' व 'मधुसखी' पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. यासाठी इच्छुक उमेदवारांनी नामांकन अर्ज ४ मे पूर्वी मंडळाच्या जिल्हा कार्यालयात सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. मधमाशीपालन व्यवसायाला चालना देण्यासाठी आणि मधपाळांना प्रोत्साहन देण्यासाठी मंडळाने गेल्या तीन वर्षांपासून हा उपक्रम सुरू केला आहे.



मधमाशीपालन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मधपाळांना प्रथम पुरस्कार ११ हजार रुपये, द्वितीय पुरस्कार ७ हजार रुपये, तृतीय पुरस्कार ५ हजार रुपये पुरस्कार देण्यात येणार आहे. यातील एक पुरस्कार महिला मधपाळासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. या पुरस्कारांचे वितरण २० मे २०२६ रोजी पुणे येथील समारंभात केले जाणार आहे. अर्ज करण्यासाठी नामांकन अर्ज मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर www.mskvib.org उपलब्ध आहेत. तसेच, जिल्ह्यातील खादी मंडळाच्या जिल्हा कार्यालयातूनही अर्ज प्राप्त करता येतील. या पुरस्काराबाबत अधिक माहितीसाठी इच्छुकांनी जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, अमरावती ०७२१-२६६२७६२, ९४२०७७१५३५ किंवा संचालक, मध संचालनालय, महाबळेश्वर यांच्याशी ०२१६८-२६०२६४ संपर्क साधावा.मधमाशीपालन क्षेत्रात कार्यरत असलेल्या मधपाळांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी प्रदिप चेचरे यांनी केले आहे.

# गाजीपूर-रुदाळी ठराव दडपल्याचा आरोप

## तीन वनकार्यालयांच्या गलथान कारभारामुळे वन्यजीवांचा अधिवास धोक्यात

### बफर झोनमधून गावांना वगळले; प्रदूषणकारी उद्योगांना रान मोकळे

**ॲड.समीर ठाकूर**

**अकोला :** अकोट तालुक्यातील गाजीपूर आणि रुदाळी या गावांच्या ग्रामसभेने ७ मे २०१० रोजी बफर झोनमध्ये समावेशासाठी स्पष्ट ठराव करूनही आजपर्यंत या गावांना बफर झोनमध्ये स्थान मिळालेले नाही. उलट, या ठरावालाच दाबून टाकण्यात आल्याचा गंभीर आरोप पुढे आला असून, वन विभागातील तीन स्वतंत्र कार्यालयांच्या निष्क्रिय आणि जबाबदारी झटकणाऱ्या भूमिकेमुळे संपूर्ण परिसरातील वन्यजीवांचा अधिवास धोक्यात आल्याची संतप्त प्रतिक्रिया पर्यावरणप्रेमींकडून व्यक्त होत आहे.

सण १९७४ ला झालेल्या मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या स्थापनेपासून वन्यजीव संरक्षणाच्या नावाखाली कोट्यवधींचा खर्च, आदिवासींचे पुनर्वसन आणि कोअर झोनची निर्मिती करण्यात आली. त्यानंतर २०१० मध्ये बफर झोन अधिसूचना काढून गावांच्या सहभागातून संरक्षण व्यवस्था अधिक मजबूत करण्याचा दावा करण्यात आला. मात्र गाजीपूर आणि रुदाळी या गावांनी स्वतःहून ठराव देऊनही त्यांची नोंदच पुढे न गेल्याचे उघड होत आहे. विशेष म्हणजे, प्रादेशिक वनविभाग अकोलानेच एका अहवालात हे ठराव त्यांच्याकडे अकोट वन्यजीव विभागाच्या वतीने कधीच पाठविले गेले नसल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे अकोट वन्यजीव विभागाच्या तत्कालीन अधिकाऱ्यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

या गंभीर त्रुटीमुळेच गेल्या दीड दशकात या परिसरात खदान, स्टोन क्रशर आणि डांबर हॉट मिक्स प्लांटसारख्या प्रदूषणकारी उद्योगांनी अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. वन्यजीवांच्या अधिवासाच्या अगदी जवळच हे उद्योग सुरू राहिल्याने वायू व ध्वनी प्रदूषणाची पातळी वाढली असून, वन्यप्राणी स्थलांतराच्या उंबरठ्यावर असल्याची भीती व्यक्त होत आहे. बेकायदेशीर ब्लास्टिंगसाठी जिलेटीन आणि डिटोनेटरचा वापर होत असल्याचेही समोर आले आहे. यामुळे वन्यजीवांच्या हालचाली विस्कळीत होत असून संपूर्ण परिसंस्थेलाच तडा जात आहे.

गाजीपूर–रुदाळी परिसर नरनाळा अभयारण्यालगत आणि पोपटखेड धरणाच्या कुशीत वसलेला असल्याने जैवविविधतेच्या दृष्टीने अतिशय संवेदनशील मानला जातो. तरीही या भागाकडे उप वनसंरक्षक, पश्चिम मेळघाट (परतवाडा) कार्यालयाकडूनही पूर्ण दुर्लक्ष होत असल्याची चर्चा आहे. कोअर झोन, बफर झोन आणि सीमावर्ती क्षेत्र अशा तिन्ही स्तरांवर तीन वेगवेगळ्या कार्यालयांचा कारभार असताना समन्वयाचा पूर्ण अभाव दिसून येतो.



**■ स्वच्छ प्रशासनाच्या गप्पा; प्रत्यक्षात कारभार ढिसाळ**

एकीकडे सत्ताधारी भारतीय जनता पक्षाचे नेते स्वच्छ आणि पारदर्शक प्रशासनाचे गोडवे गात असताना, अकोट तालुक्यातील वनविभागाचा कारभार मात्र याच्या नेमक्या उलट असल्याचे चित्र आहे. ठराव दडपणे, उद्योगांना मोकळीक देणे आणि पर्यावरणीय नियमांकडे दुर्लक्ष करणे या प्रकारामुळे प्रशासनाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याहून गंभीर बाब म्हणजे स्थानिक लोकप्रतिनिधींनी या प्रकरणावर घेतलेली संशयास्पद चुप्पी. वन्यजीवांचा प्रश्न असो किंवा पर्यावरणीय हानी – जनतेच्या हिताच्या मुद्द्यांवर आवाज उठवण्याऐवजी लोकप्रतिनिधी गप्प का आहेत, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. राजकीय सोय साधण्यासाठीच ही मौनव्रती भूमिका घेतली जात आहे का, अशीही चर्चा रंगू लागली आहे.

**सूर्यास्तानंतरही खनिज उत्खननाचा धुमाकूळ व वाहतूक सुरू**

गाजीपूर–रुदाळी परिसरातील काही खदानी व क्रशर हे सूर्यास्तानंतरही सुरू असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. रात्रीच्या अंधारात खनिजाची वाहतूक, उशिरापर्यंत चालणारे क्रशर, अधूनमधून होणारी ब्लास्टिंग आणि त्यातून निर्माण होणारे ध्वनी व वायू प्रदूषण यामुळे वन्यजीव त्रस्त होत आहेत. वनविभाग, महसूल, प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि खणीकर्म विभाग यांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. शासनस्तरावर तक्रारी होऊनही कारवाई न झाल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर संशय व्यक्त केला जात आहे.

### अधिकारी ढिम्म, लोकप्रतिनिधींची मौनव्रती भूमिका

परिणामी जबाबदारी एकमेकांवर ढकलत अधिकारी मोकळे होत असल्याचे चित्र आहे.

विशेष म्हणजे, कोअर झोनच्या केवळ पाच किलोमीटर अंतरात खदानी आणि औद्योगिक प्रकल्प सुरू राहणे हे व्याघ्र प्रकल्पाच्या मूलभूत उद्देशालाच हरताळ फासणारे आहे. तरीही या सर्व प्रकाराकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याने संताप व्यक्त होत आहे. वन्यजीव संरक्षणाच्या नावाखाली कागदोपत्री योजना राबवणारा विभाग प्रत्यक्षात मात्र उद्योगांच्या सोयीसाठी नियमांवर पाय देत असल्याची टीका जोर धरत आहे.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच गाजीपूर आणि रुदाळी गावांचा बफर झोनमध्ये तात्काळ समावेश करून वन्यजीवांच्या अधिवासाचे संरक्षण करावे, अशी जोरदार मागणी आता पुढे येत आहे.

# उंबरीत दोन भावांच्या गोठयाना लावली आग

### आरोपीचे कृत्य सीसीटीव्हीत कैद, -१.३५ लाखांचे नुकसान

**अंजनगाव सुर्जी/ प्रतिनिधीः-** रहिमापुर चिंचोली पोलीस स्टेशनच्या हद्दीतील उमरी ममदाबाद येथे मध्यरात्रीच्या सुमारास दोन चुलत भावांच्या गोठ्यांना जाणीवपूर्वक आग लावल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी रहीमापूर पोलिसांनी आरोपी शामराव पुंडलिक ढोके (वय ५४) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता नुसार गुन्हा दाखल केला आहे.

तक्रारदार रोहन विश्वासराव वडतकर (वय २९) यांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २१ च्या मध्यरात्री १:३० ते २ वाजेच्या दरम्यान ही घटना घडली. रोहन वडतकर आणि त्यांचे चुलत भाऊ विकास सुरेश वडतकर यांचे राहत्या घराजवळच गोठे आहेत. जुन्या वादातून आरोपी ☞(पान २ वर)



# पिण्याच्या पाण्यापासून हातुर्णा पुनर्वसनग्रस्त वंचित

### प्रहारची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक



**अमरावती/प्रतिनिधीः-** हातुर्णा पुनर्वसन भागातील नागरिकांना पिण्याचे पाणी मिळत नाही. यामुळे त्यांना मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. या समस्येकडे लक्ष देऊन पिण्याचे पाण्याची समस्या लवकरात लवकर निकाली काढावी अन्यथा १ मे नंतर आंदोलनाचा इशारा प्रहार जनशक्ती पार्टीच्या वतीने जिल्हाधिकारी ☞(पान २ वर)

# आरोपी अयान अहमदची पोलिसांनी काढली धिंड

### मित्रांच्या घरून मोबाईल जप्त -परतवाडा लैंगिक शोषण प्रकरण





**परतवाडा/प्रतिनिधीः-** तरुणींच्या लैंगिक शोषणाचे धक्कादायक व्हिडिओ व्हायरल प्रकरणातील मुख्य आरोपी अयान अहमद तनवीर अहमद याला पोलिसांनी आज बुधवार २२ एप्रिल रोजी अचलपूरच्या समरसपुरा पोलीस ठाण्यात आणले. त्यानंतर पोलिसांनी त्याची भररस्त्यातून धिंड काढली. गुन्हेगारांमध्ये कायद्याचा धाक निर्माण करण्यासाठी पोलिसांनी हे पाऊल उचलल्याचे बोलले जात आहे. आरोपी अयान अहमद याला अचलपूर शहराच्या मुख्य भागातून फिरवत त्याची धिंड काढण्यात आली. समरसपुरा भागात राहणारा त्याचा मित्र नुमानच्या घरी त्याला पायदळ घेऊन ☞(पान २ वर)

# घरफोडी प्रकरणात सराईत टोळी जेरबंद

### आरोपींनी विकत घेतला नवीन ट्रॅक्टर, -९ लाखांहून अधिक मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** चांदूर रेल्वे परिसरात घरफोडी करून लाखो रुपयांचा मुद्देमाल लंपास करणाऱ्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश करत दोघांना अटक केली आहे. या कारवाईत तब्बल ९ लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, आणखी तिघे आरोपी फरार आहेत.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे सागर रतन पवार (वय ४५, रा. शिवाजी नगर, चांदूर रेल्वे) आणि रोहन चंदन पवार (वय १९, रा. तरोडा) अशी आहेत. तर ऋषी चंदन पवार, रुतेश मनीचरण भोसले आणि दुर्नेसिंग पवार (सर्व रा. तरोडा) हे तिघे आरोपी अद्याप फरार असून त्यांचा शोध सुरू आहे.



**दोन गुन्हे उघड**

या प्रकरणातील फिर्यादी अशोक गोमाजी पवार (रा. बागापूर, ता. चांदूर रेल्वे) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ८ एप्रिलच्या रात्री त्यांच्या घराच्या मागील दरवाज्याची कडी तोडून अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश केला. कपाटातील ५ लाख १५ हजार रुपये रोख रक्कम तसेच सोने-चांदीचे दागिने असा एकूण ७ लाख ७६ ☞(पान २ वर)

# रेल्वेच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

### बडनेरा येथील घटना



**अमरावती/प्रतिनिधीः-** रेल्वेच्या धडकेत तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना बडनेरा पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या सिपना इंजिनिअरिंग कॉलेजपासून काही अंतरावर घडली आहे. दीपक शामराव चौधरी (वय ४७,तापी कॉलनी) असे मृतक तरुणाचे नाव आहे. माहिती नुसार आज बुधवार २२ एप्रिल रोजी सकाळी सिपना कॉलेज जवळील रेल्वे लाईनवर एका तरुणाचा मृतदेह दिसला. याची माहिती तिथून जाणाऱ्या नागरिकांनी बडनेरा पोलिसांना दिली. माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले. त्यांनी घटना स्थळाचा पंचनामा केला. मृतकाची ओळख दीपक शामराव चौधरी ☞(पान २ वर)

# बेगमपुरा शाळेच्या इमारत बांधकामाचे नगराध्यक्षांच्या हस्ते भूमिपूजन

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर नगर परिषद हद्दीतील बेगमपुरा परिसरातील शाळेला नवसंजीवनी देणाऱ्या नव्या इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन नगराध्यक्षा रुपाली अभय माथने यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना अधिक सुसज्ज व सुरक्षित शैक्षणिक वातावरण उपलब्ध होणार असल्याने परिसरात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

वार्ड क्रमांक १० मधील नगरसेविका सुशिलाताई देविदास इंगळे व नगरसेवक चंद्रेश बहोरिया यांच्या संयुक्त प्रयत्नातून या शालेय इमारतीच्या बांधकामाला गती मिळाली. त्यांच्या पाठपुराव्यामुळे दीर्घकाळ प्रलंबित असलेले काम अखेर मार्गी लागल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. या भूमिपूजन ☞(पान २ वर)



# गायवाडी येथे अवैध रेती वाहतुकीवर कारवाई, दोन ट्रॅक्टर जप्त

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर तालुक्यातील गायवाडी येथे अवैध रेती वाहतूक करणाऱ्या दोन ट्रॅक्टर वाहनांवर महसूल प्रशासनाने आज (दि.२२) धडक कारवाई केली. या कारवाई दरम्यान दोन ट्रॅक्टर पकडून जप्त करण्यात आले. तहसिलदार यांच्या आदेशानुसार निवासी नायब तहसिलदार प्रमोद काळे, मंडळ अधिकारी राजेश मिरगे व तलाठी यांच्या पथकाने छापा टाकत ही यशस्वी कारवाई केली. अवैध गौण खनिज वाहतूक रोखण्यासाठी ☞(पान २ वर)



# मिरचीच्या ट्रकला भीषण आग

### चिंचभुवन परिसरात दोन तास वाहतुकीची कोंडी

**वर्धा/प्रतिनिधीः-** स्थानिक महामार्गावरील विमानतळाला लागून असलेल्या चिंचभुवन परिसरातील भारत पेट्रोलियम पेट्रोल पंपजवळ आज बुधवार २२ एप्रिलच्या दुपारी शॉर्टसर्किट मुळे मिरची वाहतूक करणाऱ्या ट्रकला अचानक आग लागली. सुदैवाने तातडीने आग आटोक्यात आल्याने मोठी दुर्घटना टळली.

मात्र या गोंधळात मिरचीने भरलेला ट्रक उलटल्याने वाहतूक पूर्णतः कोलमडून गेली. आधीच चिंचभुवन परिसरात उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. त्यामुळे वाहतूक कोंडी रोजचीच झाली आहे. मेट्रो विस्तारिकणाची कामे दोन्ही बाजूंना सुरू असल्याने हा मार्ग निमुळता झाला आहे. त्यात मिरचीची वाहतूक करणारा ट्रक आग लागल्या ☞(पान २ वर)



